# आपल्या सौम्य पित्याचे कार्य

## देवाचे चरित्र – या विषयावर एक नवीन प्रकाश

-------------------------

जय ए. शुलबर्ग

----------------------



# ***आपल्या सौम्य पित्याचे कार्य***

*देवाचे चरित्र- या विषयावर एक नवीन प्रकाश*

जय ए. शुलबर्ग

अहिंसक देवासाठी प्रकरणः
हा अभ्यास देव बद्दलगैरसमज दूर करण्यासाठी आहे.
हा अभ्यास आम्हाला परमेश्वरकडे पाहण्याचा वैकल्पिक दृष्टीकोन देखील देईल.

जय ए. शुलबर्ग

कॉपीराइट © 2017 जय ए. शुलबर्ग

सर्व हक्क राखीव. या पुस्तकाचा कोणताही भाग लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय खालील उल्लेख केलेल्या मार्गांनी वापरणे प्रतिबंधित आहे, ग्राफिक, इलेक्ट्रॉनिक किंवा यांत्रिक, फोटोकॉपी, रेकॉर्डिंग, टॅपिंग किंवा कोणत्याही माहिती स्टोरेज पुनर्प्राप्ती प्रणालीसह इत्यादी. याखेरीज लेख किंवा गंभीर पुनरावलोकन यांमध्ये संक्षिप्त अवतारणाचा वापर केला जाऊ शकतो.

शास्त्रवचनांचे अवतरण MARVBSI पवित्र शास्त्रामधून घेतलेले आहेत.

या पुस्तकाचे इंग्रजीतून मराठीत भाषांतर बंधू जोएल साळवी यांनी केले आहे. देवाचे खरे चरित्र जाणणाऱ्या बांधवांकडून हे कार्य पुढे नेण्यासाठी त्यांना खूप पाठिंबा मिळाला.

**हे पुस्तक फोर एंजल मीडियाने छापले आहे**

**www.fourangelsmedia.com**

एप्रिल 2024

प्रिय वाचक, या पुस्तकाचे मराठी भाषांतर प्रिय ख्रिस्तवासी विश्वास शंकर मोहिते याला समर्पित केले आहे. विश्वासच्या आई वडिलांना लग्नानंतर काही वर्ष बाळ होत नव्हते. आरोग्याच्या काही समस्यांमुळे त्यांना गर्भधारणा होणे अवघड आहे असे डॉक्टर म्हणाले. तरीहि, त्यांनी आणि सर्व नातेवाईकांनी देवाकडे त्यांच्यासाठी प्रार्थना चालूच ठेवल्या. प्रभूने त्यांची प्रार्थना ऐकली, भाऊ शंकर आणि आमचे सुनीताताई यांना ७ डिसेंबर २०११ रोजी, पुणे महाराष्ट्र येथे त्यांना विश्वास झाला. त्यांच्या कुटुंबा मध्ये सर्वजण त्याला चमत्काराचे बाळ असे बोलत. त्याच्या जन्मानंतर त्याच्या वडिलांना नोकरीच्या ठिकाणी पदोन्नती आणि बढती मिळून एक पुढारीपद मिळाले.





म्हणून, विश्वास त्यांच्यासाठी भाग्यवान आहे असा त्यांना विश्वास होता. काही वर्षांनी त्यांना आणखीन एक मुलगा झाला त्याचे नाव त्यांनी स्तवन असे ठेवले. विश्वास एका संयुक्तकुटुंबामध्ये जिथे त्याचे आई वडील, आज्जी, भावंडं, काका, काकू आणि त्यांची मुले एकत्र राहत होते. त्यांच्या घरातील सर्व लहान लेकरांमध्ये विश्वास खूप निराळा होता. खूप लहान वयामध्ये, त्याला देवावरचा विश्वास आणि देवाचे प्रेम समजले होते. चर्चला नियमित जाणे, प्रार्थनासभेला हजर राहणे आणि चर्चच्या सर्व कार्यक्रमात सहभागी राहणे हा त्याच्या जीवनाचा नित्यक्रम होता. देवाने या बाळाला संगीत आणि बोलण्याचे कौशल्य दिले होते. देवाचे प्रेम त्याच्या कुटुंबाला, शेजाऱ्यांना आणि अनोळखी लोकांना देखील सांगण्यास तो नेहमी उत्साही असायचा. देवाच्या गौरवासाठी तो धाडसाने न घाबरता नेहमी खरे बोलत होता. तो त्याच्या अभ्यासातही खूप चांगला होता.

त्याला नेहमी नवीन नातेसंबंध बनवायला आणि राखायला आवडत होते. नवीन नातं जोडायला त्याच्या समोर वय, संस्कृती, भाषा, दर्जा आणि स्त्री पुरुष हे कधीच आलं नाही. त्याचे प्रत्येकासोबत एक वेगळे आणि वयक्तिक नाते होते. ज्यांना तो ओळखत होता त्यांच्याशी तो खूप दयाळू होता. तो खुप साऱ्या कामात आपल्या कुटुंबाला स्वतःहुन मदत करत होता आणि आपल्या सर्व भावंडांची काळजी घेत होता. सर्व जण या बाळावर खूप प्रेम करत होते आणि त्यांच्या हृदयात त्याच्यासाठी एक विशेष जागा होती. दुर्दैवाने, ४ फेब्रुवारी २०२१ रोजी विश्वासचा अपघात झाला आणि त्याने अखेरचा स्वास सोडला.





प्रिय विश्वासच्या मृत्यूने त्याच्या कुटुंबाला प्रचंड मोठा धक्का बसला. परंतु देवकृपेने, या परिस्थितीमुळे त्यांचा देवावरील विश्वास तुटला नाही. या घटनेच्या काही महिन्या आगोदरच सर्व कुटुंबीयांनी या पुस्तकामध्ये नमूद केलेल्या देवाच्या चरित्रा विषयी संदेशाचा अभ्यास केला होता. या संदेशाचा अभ्यासाने त्यांना समजण्यास मदत केली कि देव प्रीती आहे आणि त्याचे प्रेम हे कधीही न बदलणारे आहे. त्यांना समजले कि "प्रत्येक उत्तम देणगी व प्रत्येक पूर्ण दान वरून आहे; ज्याला विकार नाहीं व जो फिरण्यानें छायेत जात नाही अशा ज्योतिमंडळाच्या पित्यापासून तें उतरतें." याकोब १:१७. याचा अर्थ असा, कि आपल्या जीवनात घडणाऱ्या वाईट घटना देवाकडून नाहीत किंवा कोणत्याही हानीला तो कारणीभूत नाही.

या अध्यायानाने त्यांना समजण्यास मदत झाली कि सैतान आपल्या विरुद्ध किती सक्रिय कार्य करत आहे, तोच सर्व त्रासाचा, दुःखाचा आणि मरणाचा जनक आहे.पण विशेषकरून या घटनेनंतर त्यांना अस्तित्वात असलेला महान संघर्ष, जो देवांमध्ये आणि सैतानाच्या राज्यामध्ये चालू आहे याची जाणीव झाली. तरीही, ते खंबीरपणे विश्वास ठेवतात कि ते ख्रिस्तामधील विजयाच्या बाजूने आहेत आणि जेव्हा प्रभू येशू पुन्हा येईल तेव्हा ते त्यांच्या प्रिय मुलाला लवकरच पाहतील.विश्वास एक प्रभावी आयुष्य जगला आणि आता ख्रिस्तामध्ये झोपी गेलेला आहे. हे कुटुंब सांगते कि या बालकाने आम्हाला खूप अध्यात्मिक धडे शिकवले आहेत आणि तो प्रभू येशू येईपर्यंत आमच्या अंतःकरणात नेहमी जिवंत राहील. निश्चितच तो एका सुरक्षित हातात आहे आणि आपण लवकरच त्याला भेटू. तो पर्यंत सर्व कुटुंब, मित्र, मंडळींचे सभासद आणि सर्व शेजारी आम्ही सर्व त्याची आठवण करीत आहोत. देव त्याला आशीर्वाद देवो.

## प्रस्तावना

## आपण कधी याबद्दल विचार केला आहे का?

कायदेशीर भाषेत, एक आपत्ती जी पूर्णपणे निसर्गाच्या शक्तीमुळे होते आणि यथार्थपणे रोखता येत नाही, ती देवाचे कार्य म्हणून संबोधले जाते. हा वाक्यांश बहुतेकदा विमा पॉलिसीमध्ये समाविष्ट केला जातो. आपल्या जगात घडणाऱ्या वाईट गोष्टींसाठी देव जबाबदार आहे ही कल्पना आपल्याला कोठे मिळाली?

तो नैसर्गिक आपत्ती निर्माण करतो का? काय तो अनियंत्रितपणे ठरवतो कि, भूकंप, चक्रीवादळ, पूर आणि इतर नैसर्गिक आपत्ती कुठे आणि कधी घडवावी? देव त्याचे इच्छित परिणाम घडवून आणण्यासाठी काहीतरी करतो का? त्या आणण्यासाठी तो नैसर्गिक जगामध्ये फेरफार करतो का? आणि जर नाही, तर तो ह्या जगात होणारा त्रास टाळण्यासाठी अधिक प्रयत्न का करत नाही? शेवटी, बायबल मध्ये आपण वाचलेल्या हिंसाचाराला देव जबाबदार होता का? त्याने स्वतः हिंसाचाराचा अवलंब केला का? बायबल या सगळ्या प्रश्नांची उत्तरे देते, पण ती शोधण्यासाठी आपल्याला वचनांना खोलवर पाहण्याची आवश्यकता आहे. आपल्याला हे देखील ऐकून घेण्याची आवशक्यता आहे कि देव स्वतःबद्दल काय म्हणतो आणि तो कसा कार्य करतो जरी ते त्याच्याबद्दल असलेल्या आपल्या विश्वासांना आव्हान देत असेल तरी पण, पुष्कळांचा असा विश्वास आहे की जेव्हा आपण त्याचे नियम पाळतो तेव्हा देव आपल्यावर प्रेम करतो परंतु आपल्या चुकीच्या कृत्यांमुळे तो क्रोधित होतो आणि जे त्याच्या आज्ञा विरुद्ध जातात त्यांना शिक्षा करतो. या अभ्यासाचा मुख्य उद्देश्य पवित्रशस्त्रामधून हे दर्शविणे आहे कि देवाने कधीच विनाशक म्हणून काम केले नाही परंतु केवळ एक निर्माता, पालनकर्ता आणि तारणहार म्हणूनच काम केले आहे.

**वरून येणारे ज्ञान हे मुळात शुद्ध असते; शिवाय ते शांतिप्रिय, सौम्य, समजूत होण्याजोगे, दया व सत्फळे ह्यांनी पूर्ण, अपक्षपाती, निर्दंभ (कळकळीचे) असे आहे. –याकोब** ३:१७

# अनुक्रमणिका

1. हे खरोखर महत्त्वाचे आहे का? ..... 7
2. आमच्यासाठी एक परिपूर्ण उदाहरण ..... 9
3. आपल्या जीवनाचा स्रोत ..... 11
4. त्याच्या प्रतिरूपात बनवलेले ..... 13
5. फसवणूक करणाऱ्यांचा पुढारी ..... 15
6. पाप म्हणजे काय? ..... 17
7. सैतान का आहे? ..... 20
8. नष्ट करणारा सर्प ..... 25
9. ईयोबाची बंदी ..... 28
10. पवित्र शास्त्र वाचताना आपण चुकीचा अर्थ का घेतो? ..... 32
11. आपण देवाचा गैरसमज का करतो ..... 34
12. देव कसा नष्ट करतो ..... 37
13. देवाचा क्रोध काय आहे? ..... 39
14. देव युद्ध कसे करतो? ..... 47
15. सदोम व गमोरा ..... 50
16. नोहाच्या काळातील पूर बद्दल तुमचे काय मत आहे? ..... 53
17. येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाची साक्ष ..... 57
18. देव अत्याचारी नाही ..... 59
19. आपला निर्माणकर्ता आणि सांभाळणारा ..... 64
20. आपण अनंतकाळचे जीवन कसे मिळवू शकतो? ..... 68
21. न्यायाच्या घटनेची आपण भीती बाळगावी का? ..... 73
22. देवाचा न्याय कसा आहे? ..... 79
23. देव नम्र आहे ..... 82
24. देव एक सेवक आहे, गुलामांचा मालक नाही ..... 84
25. देव आपल्यावर बिनशर्त प्रेम करतो ..... 86
26. देवाचे राज्य ..... 88
27. देव आम्हाला खरे स्वातंत्र्य देऊ पाहतो ..... 91

# 1. हे खरोखर महत्त्वाचे आहे का?

देव कसा आहे हे जाणून घेणे महत्वाचे का आहे? आपण देवाबद्दल काय विचार करतो याने काही फरक पडतो का? आपण त्याच्या बद्दल विचार करतो कि नाही याने खरच काही फरक पडतो का? ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे ह्या गोष्टींवर अवलंबून आहे कि आपण त्याच्या बद्दलची मौल्यवान माहिती शिकण्याची इच्छा ठेवतो का. देव आणि त्याचे चारित्र्यावर आमचा काय विश्वास आहे हे आपलं स्वतःचे चारित्र्य ठरवते- आणि आमचे चरित्र सर्व विश्वात असणाऱ्या सर्व भौतिक संपत्तींपेक्षा अधिक मौल्यवान आहे.

येशू म्हणाला, "मी व माझा पिता एक आहोत" (योहान 10:30) देव पिता आणि देवाचा पुत्र उद्देशाने आणि चरित्राने एक आहेत – त्यांचे नाते एक परिपूर्ण सुसंवाद आहे. हिब्रूचा लेखक घोषित करतो की येशू हा परमेश्वर पित्यासाठी त्याच्या "वैभवाची चमक आणि त्याच्या व्यक्तीमत्वाची स्पष्ट प्रतिमा आहे" (इब्री 1:3) देवाचे गौरव त्याच्या वैभवापेक्षा अधिक आहे; जे त्याचे चरित्र आहे. जेव्हा मोशेने देवाला आपला गौरव दाखवायला सांगितले, तेव्हा देव मोशेसमोरून गेला आणि त्याचे चरित्र घोषित केले:



परमेश्वर मोशेपुढून गेला व म्हणाला, मी याव्हे म्हणजे प्रभु आहे; मी दयाळू, कनवाळू, मंदक्रोध (लवकर राग न येणारा,) महान प्रेमाने पुरेपूर भरलेला व विश्वास ठेवण्यास पात्र असा देव आहे. परमेश्वर हजारो लोकांवर दया करतो; तो लोकांच्या वाईट कर्माची त्यांना क्षमा करतो; (निर्गम. 34:6-7)

देव खरोखर जसा आहे तसेच जर आपण त्याला ओळखले तर खरोखर आपला समेट देवाशी घडून येतो. हे ज्ञान, बरे करणारे आणि जीवन देणारे आहे. येशू प्रार्थना करताना आपल्या पित्याला काय म्हणाला हे ऐका: सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच, खरा देव त्या तुला, आणि ज्याला तू पाठविलेस त्या येशू ख्रिस्ताला ओळखावे." (योहान 17:3). येशूने आपल्या शब्दांद्वारे व जीवनातून हे सिद्ध केले कि देव पिता कसा आहे. तो म्हणाला, "मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, पुत्र पित्याला जे काही करताना पाहतो त्यावाचून त्याला स्वतः होऊन काहीही करता येत नाही; कारण जे काही तो करतो ते पुत्रही तसेच करतो." (योहान 5:19)

जेव्हा आपण जाणू की देव सतत प्रेमळ आणि दयाळू आहे, आपण त्याच्याकडे प्रेम आणि विश्वासाने आकर्षित होऊ. देवाच्या प्रेमाची आणि आमच्या प्रती नेहेमीच त्याची चांगली इच्छा असण्याची आम्हाला नक्कीच खात्री आहे, कारण त्याचे मार्ग कधीही बदलत नाहीत. देव (मलाखी ३:६), मध्ये जाहीर करतो, "कारण मी परमेश्वर आहे, मी बदलणारा नाही." तो आपल्यासारखा म्हणजे मनुष्याप्रमाणे बदलणारा नाही. जोपर्यंत आपल्याशी योग्य वागणूक केली जाते तोपर्यंत आपण दयाळू, प्रेमळ आणि विचारशील असतो, परंतु जेव्हा आपण आपले नुकसान व हानी करणाऱ्या लोकांशी सामना करतो, तेव्हा रागावणे अथवा सूड घेणे अशी इच्छा आपणास होते. देव कधीही रागाने किंवा सूडबुद्धीने प्रतिसाद देत नाही.

देवाचे वचन याचे समर्थन करते की येशू बदलत नाही आणि पिता देखील बदलत नाही, "येशू ख्रिस्त काल, आज आणि युगानुयुगे सारखाच आहे." (इब्री लोकांस 13:8). प्रत्येक उत्तम व परिपूर्ण देणगी वरून येते. स्वर्गीय प्रकाश ज्याने निर्माण केला त्या पित्यापासून ती येते. आणि ज्याच्यावर तारांगणाच्या हालचालीचा काहीही परिणाम होत नाही, अशा पित्यापासून ती देणगी येते. (याकोब 1:17) हे शब्द आपल्याला खात्री देतात की आपल्या सौम्य देवाला हिंसक बाजू नाही.

*"**शब्द मनुष्य झाला आणि आमच्यामध्ये राहिला. आम्ही त्याचे गौरव पाहिले. ते देवपित्याच्या एकमेव अशा पुत्राचे गौरव ख्रिस्ताशिवाय दुसरे असू शकत नाही. तो शब्द कृपा (दयाळूपणा) आणि सत्य यांनी पूर्णपणे भरला होता.** "–**योहान** १:१४*

## 2. आमच्यासाठी एक परिपूर्ण उदाहरण

डोंगरावरील प्रवचनात येशू ह्या (विरोधी) प्रतिकूल जगात जगण्याचा अचूक नमुना आपल्याला शिकवितो:

असे सांगिलते होते की, आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करा अणि आपल्या शत्रूचा द्वेष करा, असे तुम्ही ऐकले आहे. पण मी तुम्हांला सांगतो, तुमच्या शत्रूवर प्रेम करा. तुमचे जे वाईट करतात त्यांच्यासाठी प्रार्थना करा. जर तुम्ही असे कराल, तर तुम्ही तुमच्या स्वर्गातील पित्याचे खरे पुत्र व्हाल. तुमचा पिता चांगल्यावर आणि वाईटावर अशा दोघांवरही सूर्य उगवितो. चांगल्यावरही आणि वाईटावरही पाऊस पाडतो. कारण जे तुमच्यावर प्रीति करतात त्यांच्यावर तुम्ही प्रीति करीत असाल तर तुम्हांला प्रतिफळ मिळणार नाही. जकातदारही असेच करतात. आणि जर तुम्ही तुमच्या मित्रांशी चांगले वागत असाल तर तुम्ही इतरांपेक्षा फार चांगले आहात असे समजू नका. देवाला न मानणारे लोकही असेच करतात. म्हणून जसा तुमचा स्वर्गातील पिता परिपूर्ण आहे तसे तुम्हीही परिपूर्ण व्हा. (मत्तय.5:43 - 48)

हा परिच्छेद आपल्याला देवाबद्दल काय शिकवतो? येशू म्हणतो, "तुमच्या शत्रूवर प्रेम करा" आणि पुढे म्हणतो "जर तुम्ही असे कराल, तर तुम्ही तुमच्या स्वर्गातील पित्याचे खरे पुत्र व्हाल, " आणि तो समारोप करतो, "म्हणून जसा तुमचा स्वर्गातील पिता परिपूर्ण आहे तसे तुम्हीही परिपूर्ण व्हा." येशू आपल्या शत्रूंस योग्य वागणूक देण्यास सांगत आहे ज्याप्रमाणे आपला स्वर्गीय पिता त्याच्या शत्रूंशी योग्य वागतो. त्याला पाहिजे की आपण समजून घ्यावे जी उंच तत्त्वे तो आमच्यासमोर ठेवतो ती मिळवणे शक्य आहे, पण तेव्हाच जेव्हा आपण विश्वास ठेवू कि हि तत्वे स्वतः परमेश्वरापासून उत्पन्न होतात.

येशूच्या जीवनातून आपण आपल्या शत्रूंशी कसे वागावे यासाठी आपल्याला आदर्श नमुना सापडतो. ज्यांनी त्याच्यावर अन्याय केला होता त्या सर्व लोकांविरूद्ध त्याने कधीच सूड घेतले नाही. त्याच्या विश्वासघात व अटक पासून वधस्तंभावर खिळले तोपर्यंत त्यानी केवळ प्रेमाचे प्रदर्शन केले. त्याने आपल्या छळ करणार्यांना क्षमा करावी अशी विनंती केली. "नंतर येशू म्हणाला, "हे बापा, त्यांची क्षमा कर, कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही." (लूक 23:34)

जेव्हा शोमरोनी गावात येशूचे स्वागत झाले नाही, तेव्हा त्याचे शिष्य याकोब आणि योहान यांना वाटले की ते गाव अग्नीद्वारे नष्ट करावे: "हे प्रभू, एलीयाने केले होते तसेच आकाशांतून अग्नीनें पडून त्याचा नाश करावा म्हणून आम्ही आज्ञा करावी, अशी तुझी इच्छा आहे काय? परंतु त्याने वळून त्यांना धमकावले आणि म्हटले, तुम्ही कोणत्या आत्म्याचे आहा हे तुम्हास ठाऊक नाही; कारण मनुष्याचा पुत्र माणसांच्या जिवांचा नाश करायला आला नाही, तर त्यांना तारायला आला आहे" (लूक 9:54-56)

देव कसा आहे हे जाणून घेण्याचा उत्तम मार्ग म्हणजे येशूच्या जीवनाचा अभ्यास करणे. त्याने कुणालाही मारले नाही किंवा धमकावले नाही. येशूने कधीही कोणालाही इजा केली नाही. त्याने कोणाचाही निषेध केला नाही. जेव्हा फिलिप्प शिष्यांच्या वतीने येशूला म्हणाला आम्हाला स्वर्गीय पिता दाखवा, तेव्हा त्याने उत्तर दिले: "

"येशूने त्याला म्हटले, फिलिप्पा, मी इतका वेळ तुमच्याजवळ असताना तू मला ओळखले नाहीस काय? ज्याने मला पाहिले आहे, त्याने पित्याला पाहिले आहे, तर मग "आम्हांला पिता दाखव" असे तू कसे म्हणतोस? मी पित्यामध्ये आहे

व पिता मजमध्ये आहे, असा विश्वास तू धरत नाहीस काय? ज्या गोष्टी मी तुम्हांला सांगतो त्या माझ्या स्वतःच्या नाहीत तर माझ्यामध्ये जो पिता आहे तो स्वतः कामे करतो." (योहान 14:9-10)

धर्मशास्त्रीय स्थितीला आव्हान देणारा अभ्यास सुरू करताना, आपण येशूचे शब्द आणि त्याचे परिपूर्ण उदाहरण आपल्या मनात ठेवण्याचा निर्धार करूया.

# 3. आपल्या जीवनाचा स्रोत

देव सातत्याने प्रेम करतो हे सत्य प्रस्थापित करण्यासाठी काही प्राथमिक कारणास्तव, आपण बायबलमध्ये देवाच्या कृत्यांचे परीक्षण करू जे येशूच्या शिकवलेल्या तत्वांपेक्षा भिन्न असल्याचे दिसते. यशयाच्या पुस्तकात देवाच्या मार्ग आणि विचारांबद्दल आपल्याला सखोल अंतर्दृष्टी आढळते.

परमेश्वर म्हणतो, कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. (यशया ५५:८-९)

देवाचे मार्ग आणि विचार आपल्या मार्ग आणि विचारांपेक्षा हेतू आणि चारित्र्याने अमर्यादपणे उच्च आहेत. देवाबद्दल हे निश्चित सत्य आपल्याला आकलन करणे कठीण आहे. स्वतःला न्याय देण्याच्या आपल्या निर्धाराने आपण कल्पना करतो की देव आपल्यासारखा आहे. आम्हाला राग येतो, म्हणून आम्हाला वाटते की आपल्याप्रमाणेच देव रागावला पाहिजे. जेव्हा आपल्यावर अन्याय होतो, आपण सूड उगवण्यास पुढे जातो, तेव्हा आम्हाला वाटते कि जेव्हा देवावर अन्याय होतो, तेव्हा देवानेहि तशिच सुडाची भावना दाखविली पाहिजे. पण परमेश्वर म्हणतो:

तुम्ही वाईट गोष्टी करता आणि तरीही मी गप्प राहिलो. मी तुझ्यासारखा आहे असे तुला वाटले, परंतू मी तुझा निषेध करणार आणि तुझ्या डोळ्यापुढे ओळीने सर्वकाही मांडणार. (स्तोत्रसंहिता ५०:२१)

जेव्हा देवाने आपले जग निर्माण केले तेव्हा त्याचा हेतू हा नव्हता कि जगाने स्वतः कार्य करावे. देवाचा आपल्या जगाशी संबंध नसणे हे केवळ त्याच्या उद्देशाच्या विरोधात नाही, तर याचा अर्थ असा होतो की आपल्या ग्रहावर जीवन चालू राहू शकत नाही- "कारण आपण त्याच्या ठायी जगतो, वागतो, व आहो तसेच तुमच्या कवीपैकीही कित्येकांनी म्हटले आहे की, आपण वास्तविक त्याचा वंश आहो." (प्रेषितांचीं कृत्यें १७:२८) आपण घेत असलेल्या प्रत्येक श्वासात देव आपल्याला सांभाळतो.

देव सर्व जीवनाचा उगम आणि पालनकर्ता आहे. तथापि, एक गोष्ट जी आपल्याला देवपासून विभक्त करू शकते - ते म्हणजे पाप. पण पाप म्हणजे काय? आम्ही बऱ्याचदा विचार करतो कि आपण केलेल्या वाईट गोष्टी किंवा देवाची आज्ञा न पाळणे म्हणजे पाप. विचार असा आहे की पाप कसे तरी मोजले जाऊ शकते, आपल्यापैकी बऱ्याच जणांकडे मोठ्या प्रमाणावर आणि इतरांकडे थोड्या किंवा कोणाकडे अगदी कमी. बायबलमध्ये, आपण शिकतो की आपण करत असलेल्या वाईट गोष्टी ही एका गंभीर आजाराची लक्षणे आहेत जी आपल्याला आपल्या पहिल्या पालकांकडून वारशाने मिळाली आहेत. हा आजार म्हणजे असा खोटा विश्वास कि देव सगळे काही स्वतःच्या भल्यासाठी करतो. एदेन बागेत सैतानाचा हा खोटा विश्वास मानवी वंशात प्रस्थापित केलेला होता. आणि तेव्हापासून त्याने देवाचे चित्र विकृत केले आहे.

जेव्हा देवाने आदाम आणि हव्वा यांची निर्मिती केली आणि त्यांना बागेत ठेवले, तेव्हा त्यांना एक निर्बंध देण्यात आला आणि फक्त एक:

तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला अशी आज्ञा दिली की, “बागेतील वाटेल त्या झाडाचे फळ यथेच्छ खा; पण बऱ्यावाइटाचे ज्ञान करून देणाऱ्या झाडाचे फळ खाऊ नको; कारण ज्या दिवशी त्याचे फळ तू खाशील त्या दिवशी तू खास मरशील.“ (उत्पत्ति २:१६–१७)

देवाने बागेत „जीवनाचे झाड“ (उत्पत्ती २:९) का ठेवले हे समजणे सोपे आहे, परंतु त्याने “चांगल्या व वाईटाच्या ज्ञानाचे झाड“ त्या परिपूर्ण जागेत का ठेवले हे समजून घेणे आपल्यासाठी कठीण आहे. प्रथम विचार करताना, आपण कदाचित पाहू कि त्या झाडाची उपस्थिती, व त्यातून काही न खाण्यापासूनची चेतावणी जणू एका मोठ्या आपत्तीला आमंत्रण देण्यासारखे आहे.

## 4. त्याच्या प्रतिरूपात बनवलेले



उत्पत्तीमध्ये आपल्याला आपला वारसा सापडतो: “मग देव बोलला, आपण आपल्या प्रतिरूपाचा आपल्या सारखा मनुष्य निर्माण करु; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, सर्व वनपशू, मोठी जनावरे व जमिनीवर सरपटणारे सर्व लहान प्राणी यांच्यावर ते सत्ता चालवितील. तेव्हा देवाने आपल्या प्रतिरुपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरुप असा तो निर्माण केला; नर व नारी अशी ती निर्माण केली. “ (उत्पत्ति १:२६-२७). देवाच्या प्रतिमेमध्ये बनवलेले याचा अर्थ काय आहे आणि देवाची प्रतिमा काय आहे? देवाची प्रतिमा काय आहे ह्याचा शोध आपल्याला तेव्हा लागेल जेव्हा आम्हाला देव कोण आहे याचे वर्णन करणारी व्याख्या सापडेल. तंतोतंत व्याख्या (१ योहान ४:८) मध्ये आढळते “देव प्रीती आहे.“ लक्षात घ्या की वचन केवळ ‘देव प्रेमळ’ असे म्हणत नाही, जणूकाही प्रेम हे त्याच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी एक आहे, परंतु ते सरळपणे म्हणते, ‘देव प्रेम आहे.’ देवाविषयी आपण जे काही जाणून घेऊ शकतो ते या व्याख्येशी सुसंगत असले पाहिजे. म्हणून जसा देव परिपूर्ण आहे तसेच आम्ही ठळकपणे निष्कर्ष काढू शकतो कि देवाचे प्रेम देखील परिपूर्ण आहे, ज्यात कोणताही स्वार्थ नाही. शिवाय, त्याचे प्रेम कधीही न बदलणारे पाहिजे जसा तो कधी बदलत नाही.

जर आपण देवाच्या प्रतिमेमध्ये बनलेले आहोत तर आपण प्रेमाचा अनुभव घेण्यासाठी देवाद्वारे निर्माण केले गेलो आहोत, नाही का? आता प्रेम, प्रेम असण्यासाठी कोणत्याही प्रकारची सक्ती किंवा हुकूम करता येत नाही. हे केवळ निवड म्हणून स्वत्रंतपणे दिले जाऊ शकते. आपण हे सहजपणे समजून घेऊ शकतो जर कल्पना केली कि एक प्रेमाचा आतुर असलेला एक व्यक्ती बस मधे चढून लोकांना बंदूक दाखवून धमकीदवारे त्याच्या कडून प्रेम मिळवण्याचा प्रयन्त करत आहे, काय हि पद्धत लोकांच्या मनात त्याच्यासाठी प्रेम निर्माण करेल काय?

समजा आपण प्रेम मिळवण्याच्या एक कमी कठोर मार्ग वापरून एक रोबोट बनवला जो जेव्हा पण आपण त्याच्या उपस्थितीत येऊ तेव्हा तो आपल्याला म्हणेल 'मी तुझ्यावर प्रेम करतो'. ह्याचा परिणाम समाधानकारक आणि अर्थपूर्ण प्रेम-आधारित नात होईल का? या पद्धती, जे आपल्यावर प्रेम मिळवण्यात अयशस्वी ठरतील, देवासाठी कार्य करू शकतात?

चला आपण एदेनच्या बागेत आणि त्या गोंधळात टाकणाऱ्या निषिद्ध झाडाकडे परत जाऊयात. जर देवाने ते झाड बनवले नसते तर मानवजातीला देवासारखे प्रेम करणे शक्य झाले असते का? प्रेम अनुभवण्यासाठी, किंव्हा प्रेम करण्यासाठी मोकळिकता दिली जाणे महत्वाचे आहे. प्रेम मुक्तपणे देण्यासाठी, आपल्याला प्रेम न करण्याचे स्वातंत्र्य देखील असले पाहिजे. प्रेम नेहमीच एक निवड असते, प्रेमात आज्ञा किंवा जबरदस्ती केली जाऊ शकत नाही.

जर देवाने आपल्या पहिल्या पालकांना निर्माण करून त्यांना काही ठोस स्पर्श करण्या सारखे मार्ग न देता त्यांना बागेत ठेवले असते ज्याद्वारे त्यांनी देवावर प्रेम आणि विश्वास न ठेवण्याचे निवडू शकले असते, तर देव जसा प्रेम करतो तसे प्रेम करणे त्यांना शक्य झाले नसते. ज्याप्रमाणे देव आपला जीवनाचा स्रोत आहे, तसाच तो खऱ्या प्रेमाचा देखील स्रोत आहे - जीवन आणि प्रेम अविभाज्य आहेत. देवाच्या प्रतिमेत निर्माण होण्यामुळे आपल्यापैकी प्रत्येकाला आपल्या निर्मात्याचा एक प्रेमळ मित्र होण्याची क्षमता मिळते. देवाने चांगल्या आणि वाईटाच्या ज्ञानाचे झाड आपल्या आज्ञाधारकपणाची अनियंत्रित चाचणी पाहण्यासाठी लावले नाही, पण त्याने ते झाड एक आश्वासन म्हणून लावले कि तो आपल्या निवडीच्या स्वातंत्र्याला इतके महत्त्व देतो कि तो हि जोखीम घेण्यासाठी तयार होता कि आपण त्याच्यापासून दूर जाण्याची निवड करू. जेव्हा आपण देवाने निषिद्ध झाड बागेत का ठेवले याचे कारण समजून घेऊ, तेव्हा आपण त्याच्यावर स्व-सेवा करणारा हुकुमशहा असल्याचा आरोप करणार नाही. पण एक जण मात्र होता, जो देवावर आरोप करण्यास तयार होता.

## 5. फसवणूक करणाऱ्यांचा पुढारी



१परमेश्वर देवाने केलेल्या सर्व वनचरांत सर्प फार धूर्त होता. तो स्त्रीला म्हणाला, "तुम्ही बागेतल्या कोणत्याही झाडाचे फळ खाऊ नये असे देवाने तुम्हांला सांगितले हे खरे काय?" २स्त्रीने सर्पाला म्हटले, "बागेतल्या झाडांची फळे खाण्याची आम्हांला मोकळीक आहे; ३पण बागेच्या मध्यभागी असलेल्या झाडाच्या फळाविषयी देवाने सांगितले आहे की ते खाऊ नका; त्याला स्पर्शही करू नका, कराल तर मराल." ४सर्प स्त्रीला म्हणाला, "तुम्ही खरोखर मरणार नाही; ५कारण देवाला हे ठाऊक आहे की तुम्ही त्याचे फळ खाल त्याच दिवशी तुमचे डोळे उघडतील. आणि तुम्ही देवासारखे बरेवाईट जाणणारे व्हाल." (उत्पत्ती ३:१-५)

प्रथम, या बोलणाऱ्या सापाची ओळख निश्चित करूयात. कोण आहे हा सर्प? "तो मोठा अजगर, सैतान म्हटलेला तोच तो जुनाट साप होय. तो संपूर्ण जगाला फसवतो. त्या सापाला त्याच्या दूतांसह पृथ्वीवर टाकण्यात आले." (प्रकटीकरण १२:९) हव्वा फक्त एका बुद्धिमान सर्पा सोबत बोलत नव्हती , परंतु सैतान - जो स्वत:फसवेगिरीचा गुरु आहे त्यासोबत बोलत होती.

सर्पाने सूक्ष्म अंतःकरणाने देवावर आदाम आणि हव्वेशी खोटे बोलण्याचा आणि त्यांच्यापासून काहीतरी चांगले रोखल्याचा आरोप केला. यापुढे जर ते हे फळ खातील तर त्यांचे डोळे उघडले जातील, आणि ते “देवासारखे, चांगले आणि वाईट जाणणारे“ होतील असे म्हटला .स्त्रीने कोणावर विश्वास ठेवायचे निवडले, देव की सैतान?

६त्या झाडाचे फळ खायला चांगले, दिसायला मनोहर आणि शहाणे करायला इष्ट आहे असे त्या स्त्रीला दिसून आले; तेव्हा तिने त्याचे फळ काढून खाल्ले, आणि आपल्याबरोबर आपल्या पतीलाही ते दिले व त्याने ते खाल्ले. ७तेव्हा त्या उभयतांचे डोळे उघडले आणि “आपण नग्न आहोत“ असे त्यांना कळून आले; तेव्हा त्यांनी अंजिराची पाने शिवून आपणासाठी कटिवेष्टने केली. ८ह्यानंतर शिळोप्याचा वारा सुटला असता परमेश्वर देव बागेत फिरत होता, त्याचा आवाज त्यांना ऐकू आला, तेव्हा परमेश्वर देवाच्या दृष्टीपुढून आदाम व त्याची स्त्री बागेतील झाडांमध्ये लपली. ९तेव्हा परमेश्वर देवाने आदामाला हाक मारून म्हटले, “तू कोठे आहेस?“ (उत्पत्ति ३:६-९)

जेव्हा आदाम आणि हव्वा यांनी निषिद्ध वृक्षाचे फळ खाल्ले, तेव्हा त्यांचे डोळे उघडले (ते आत्म-जागरूक झाले) आणि ते स्वतःला देवापासून लपवण्यास पाहू लागले. देवाची प्रतिक्रिया काय होती? तो त्यांचा शोध घेत आला. त्याचे पहिले शब्द होते, “तू कुठे आहेस?“ तो आपल्या हरवलेल्या लेकरांशी समेट घडवण्याचा प्रयत्न करत होता.

***कारण मनुष्याचा पुत्र जे हरवले आहे ते सर्व मिळविण्यास व वाचविण्यास आला आहे. येशू (लूक १९:१०)***

# 6. पाप म्हणजे काय?

आता या प्रश्नाकडे परत येऊया: पाप काय आहे? योग्य व्याख्या शोधण्यासाठी, आपण प्रथम हे ओळखणे महत्वाचे आहे कि 'बऱ्या आणि वाईटाच्या ज्ञानाच्या झाडाजवळ नेमकी काय चूक झाली? उत्पत्ति ३:६ मध्ये, स्त्रीला त्या झाडाचे तीन इस्ट गुण दिसले.

१. "झाड अन्नासाठी चांगले होते". सहजरित्या पाहता हे खरे दिसून येते, परंतु त्या झाडाला अन्नाचा स्त्रोत म्हणून निषिद्ध करण्यात आले होते. समस्या फळाचीच नव्हती तर ती स्त्री त्याकडे एक चांगली गोष्ट म्हणून बघत होती.

२. ते वृक्ष "डोळ्यांना आनंददायक" वाटत होते. देवाने बागेत जे काही निर्माण केले ते सगळे परिपूर्ण होते, खरं तर म्हणूनच ते झाडही "डोळ्यांना आनंददायी" वाटत होते. त्या स्त्रीने झाडाची आणखी एक इष्ट गुणवत्ता पहिली.

३. एखाद्याला शहाणा बनवणारं झाड. खरोखर? काय या झाडामध्ये गूढ गुण होते का? सर्प खरे बोलत होता का? चांगल्या आणि वाईट गोष्टींचे ज्ञान असणे खरोखर हिताचे आहे का? तसेच चांगल्या आणि वाईट गोष्टींचे ज्ञान असणे म्हणजे काय? किंबहुना हि माहिती फक्त प्राप्त करण्यासारखी आहे?

या वचनाचा असा शेवट होतो कि "तिने त्या झाडाचे फळ तोडून घेतले व खाल्ले. आणि तिच्याबरोबर तिच्या पतीलाही दिले व त्याने ते खाल्ले"; हे सहसा मानवतेचे पहिले पाप असल्याचे समजले जाते, परंतु पाप काय आहे? प्रथम काय आले फळ खाणे कि सर्पाने देवाबद्दल बोललेल्या खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवणे?

प्राथमिक समस्या ही होती जेव्हा हवेला सर्पाच्या खोट्या बोलण्यावर विश्वास ठेवला की देव स्वार्थीपणाने त्यांच्यापासून काहीतरी चांगले रोखत आहे. पाप म्हणजे केवळ क्रियाच नव्हे तर जणू काही पाप हि एक मोजण्यायोग्य वस्तू आहे. पाप, त्याच्या मुळाशी, एक मनाची शारीरिक स्थिती आहे ज्यात आपण हे बघतो कि देव आत्मकेंद्रित आहे आणि म्हंणून त्याच्यावर विश्वास ठेवण्यास आपण असमर्थ होतो.

पापाची तुलना एका रोगाशी केली जाऊ शकते. एखाद्या आजारात काही मुलभूत कारणे असतात जसे कि जिवाणू संसर्ग, एक चयापचय विकार किंवा रोगप्रतिकारक शक्ती बिघडणे. ही प्राथमिक कारणे एक किंवा अधिक लक्षणांना दिसतात: ताप, मळमळ, वेदना, चक्कर येणे, सुस्ती इ. पापासह, मुख्य कारण म्हणजे देवाबद्दलच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवणे, परिणामी, ज्याचे प्रेम इतर-केंद्रित आहे त्याच्यापासून स्वतःस दूर करणे. आपली बाह्य पापे म्हणजे लक्षणे ही देव स्वार्थी आहे असा विश्वास ठेवण्याचे परिणाम आहेत हा शारीरिक विकार. येशूने शास्त्री व परुशी यांच्याशी केलेल्या संभाषणात हि सदृश्य समानता दाखवले कि, पाप हा एक असा रोग ज्याला उपचाराची अत्यंत गरज आहे.
तेव्हा काही नियमशास्त्राचे शिक्षक जे परूशी होते त्यांनी येशूला पापी व जकातदारांबरोबर जेवताना पाहिले. ते त्याच्या शिष्यांना म्हणाले, "हा पापी व जकातदार यांच्याबरोबर का जेवतो?" हे ऐकून येशू त्यांना म्हणाला, "निरोग्यांना वैद्याची गरज नसते, तर रोग्यांना असते. मी नीतिमान लोकास नाही, तर पाप्यांना बोलावण्यास आलो आहे." (मार्क २:१६-१७)

पाप प्राणघातक आहे कारण ते आपल्याला देवापासून जो सर्व जीवनाचा स्त्रोत आहे त्यापासून विभक्त करते. या विभक्तीत देव कधीच स्वतःला आपल्यापासून विभक्त करत नाही, तर आपण त्याला आपल्यापासून विभक्त करतो. आदाम आणि हव्वेला सैतान, ज्याला त्यांनी घाबरायला पाहिजे होते त्यापेक्षा त्यांना देवाची भीती वाटू लागली. फळ खाल्ल्यानंतर बायबल म्हणते, संध्याकाळी परमेश्वर बागेत फिरत होता. त्यावेळी आदामाने आणि त्याच्या बायकोने परमेश्वराचा आवाज ऐकला. आणि त्याच्या नजरेस पडू नये म्हणून ते दोघे परमेश्वरापासून बागेच्या झाडात लपले. (उत्पत्ति ३:८) त्या दिवसापासून आपण आपल्या सौम्य देवापासून लपत आहोत.

आपण हे लक्षात घेतले पाहिजे कि जेव्हा देवाने आदम आणि हव्वा यांना निषिद्ध झाडाचे फळ न खाण्याची चेतावणी दिली, तेव्हा तो असे नाही म्हणाला कि, "ज्या दिवशी तुम्ही ह्या झाडाचे फळ खाल, मी तुम्हाला मारून टाकेन." तो म्हणाला, "ज्या दिवशी तू ते खाशील, तर तू नक्की मरशील!" जेव्हा माणूस आणि त्याच्या पत्नीने झाडाचे फळ खाल्ले, त्यांच्यात मरणाची प्रक्रिया सुरु झाली कारण त्यादिवशी त्यांनी स्वतःला त्यांच्या जीवनस्त्रोतापासून वेगळे केले. हे पाप आहे (ह्या खोट्यावर विश्वास ठेवणे कि देव स्वार्थी आणि अविश्वसनीय आहे) जे प्राणघातक आहे, देव नाही: "कारण पापाचे वेतन मरण आहे" (रोमकरांस पत्र.६:२३).



देव पापाच्या भागीदारीत येत नाही आणि तो पापाची मजुरीहि देत नाही. हे देखील उघड आहे की जेव्हा आदाम आणि हव्वेने निषिद्ध वृक्षाचे फळ खाल्ले, त्यांना बऱ्या आणि वाईट गोष्टींच्या मुख्य ज्ञानापेक्षा बरेच काही कळले. त्यांनी नकळत स्वतःला आणि त्यांच्या वंशजांना बऱ्या आणि वाईटाच्या ज्ञानाचा अनुभव घेण्यासाठी वचनबद्ध केले. त्यांना फक्त वाईटाबद्दल माहिती राहणार नाही तर ते वाईटाबद्दल विचार करतील, ते वाईट जीवन जगतील, ते वाईटाचे गुलाम बनतील, आणि परिणामी त्यांना वेदना, दुःख, भीती आणि मृत्यू हे मिळेल.

जेव्हा पापाने आपल्या जगात प्रवेश केला, तेव्हा त्याचे अपरिहार्य परिणाम भोगायला मानवजात एकटी नव्हती. आदाम आणि हवेच्या पापाने निर्मिती व निर्माता ह्यामध्ये विसंगती आणली, आणि ह्या विसंगतीचा परिणाम पूर्ण निसर्गवावर पडला. कारण आपल्याला माहीत आहे की, आजपर्यंत, निर्माण केलेले संपूर्ण जग कण्हत, व वेदना भोगीत आहे (रोमकरास पत्र ८:२२).

पृथ्वी ही मानवजात आणि प्राण्यांसाठी एक धोकादायक जागा बनली आहे. नोहाच्या दिवसाचा पूर आल्यापासून, पृथ्वी हिंसक हवामान, भूकंप, ज्वालामुखी आणि इतर नैसर्गिक आपत्ती यांच्या आधीन आहे. निसर्गात ज्या हिंसक गोष्टी आहे, त्या देवाकडून नाही; त्या अस्तित्वात आहे कारण आम्ही देवाला स्वतःपासून दूर अंतरावर ठेवले आहे.

# 7. सैतान का आहे?



देवाच्या विरोधात अस्तित्वात असलेल्या, शब्दशः अर्थाने आध्यात्मिक अशा सजीवाचा संदर्भ यापूर्वीच दिला गेला आहे. बायबल मध्ये ह्या सजीवाचा उल्लेख आहे सैतान, सर्प, लिव्हियाथान, आणि ल्युसिफर तसेच इतर अनेक शीर्षकांने केला आहे.

आज पाश्चात्य सभ्यतेत, दोनशे वर्षांपूर्वीच्या तुलनेत खूपच कमी टक्के लोकांचा शाब्दिक सैतान या संकल्पनेवर विश्वास आहे. आपल्या आधुनिक संस्कृतीत सैतान बऱ्याचदा अंधश्रद्धा आणि अज्ञानाचे क्षेत्राशी संबंधित असतो. हा विचार मनात ठेऊन आणि प्रश्नाच्या उत्तराकरिता सैतानासंबंधी बाइबलद्वारे दिलेल्या अहवालाचे परीक्षण करूयात.

बायबलमध्ये सैतानाची ओळख खाली पडलेला देवदूत म्हणून दिली आहे. "खाली पडलेला" या शब्दाचा अर्थ असा होतो कि सैतान हा मूळतः निष्पापी प्राणी होता पण त्याने आपल्या निर्मात्याविरुद्धः बंड करणे निवडले. त्याने देवाविरुद्ध बंड का केले? स्वर्गातील परिपूर्ण वातावरणात असताना सुद्धा त्याने देवाशी बंड करायचे का ठरविले हे एक गूढ आहे. तो सगळ्या देवदुतांमध्ये सन्माननिय आणि प्रभावी पदावर होता. कालांतराने त्याच्या मनात अभिमानाचे बीज अंकुरले आणि वाढले आणि परिणाम स्वरूप त्याच्या स्थानाबद्दल असंतोषाची भावना उत्पन्न झाली. आणि अंततः याचे रुपांतर देवाविरुद्ध उघड बंडखोरीत झाले.

सैतान त्याच्या बंडखोरीमध्ये एकटा नव्हता. तो इतर बहुतेक देवदूतांकडून पाठिंबा मिळवू शकला, तरी बहुसंख्य देवदूतांनी देवाशी एकनिष्ठ राहण्याचे निवडले. सैतान आणि त्याच्या अनुयायांच्या या बंडखोरीच्या परिणामस्वरूप जे युद्ध

जन्माला आले त्यात शस्त्र-अस्त्र हत्यारे नव्हते जसे जागतिक संघर्षात वापरले जाते. देव या स्वर्गीय युद्धामध्ये स्वार्थाविरूद्ध प्रेम, फसवणूकीविरूद्ध सत्य, गुप्ततेविरूद्ध पारदर्शकता, असमंजसपणाविरूद्ध समंजस, निराशाविरूद्ध संयम आणि संशयाविरूद्ध विश्वास या नीती वापरून विजयी झाला.

ह्या गोष्टीवर विश्वास ठेवणे योग्य आहे कि एदेन बागेत हवेला देवापासून अलिप्त करतांना सैतानाने ज्या रिती वापरल्या, त्या त्याच होत्या ज्या त्याने स्वर्गात देवदूतांना त्याचे अनुयायी बनवण्यासाठी वापरल्या होत्या. तोपर्यंत, स्वर्गीय देवदूतांसमोर देवाच्या नितीमत्तेविषयी कधीच प्रश्न आणला गेला नव्हता. देवावर असलेल्या सैतानाच्या आरोपांमध्ये काही सत्यता आहे किवा नाही, हे समजण्याचा कोणताच मार्ग नव्हता. या कारणास्तव सैतानाला त्याच्या शासनाची मार्ग दाखविण्याची संधी दिली गेली आहे.

आपण असा प्रश्न विचारू शकतो की देवाने त्याच्या विरोधकाला बंडाच्या सुरुवातीसच का नष्ट केला नाही? जर देवाने सैतानाचा नाश केला असता, तर त्याने या प्रकारे बंडखोरीची वाढ रोखली नसती का? नाही, तसे केले असते तर देवदूतांना पुष्टी झाली असती की सैतानाने देवाविरुद्ध केलेले आरोप वैध आहेत. जर देवाने सैतानाचा नाश केला असता तर त्याच कृत्यामुळे स्वातंत्र्याकडे दुर्लक्ष झाले असते. याखेरीज आणखीही काहीतरी आहे. बायबल अभ्यास सत्यात आणत असताना आपणास पुरावे हेच दर्शवितात कि देव कधीही नष्ट करत नाही तर पाप नष्ट करते. शेवटी सैतान हा नष्ट होईल हे निश्चित आहे. हा नाश देवाकडून होणार नाही, परंतु सैतानाच्या स्वतःच्या पापातून होईलः

पुन्हा परमेश्वराचे वचन मला प्राप्त झाले की, “मानवपुत्रा, सोरेच्या राजाविषयी विलाप करून त्याला सांग, प्रभू परमेश्वर म्हणतो, तू पूर्णतेची मुद्राच आहेस; तू ज्ञानपूर्ण व सर्वांगसुंदर आहेस. देवाचा बाग एदेन ह्यात तू होतास; अलाक, पुष्कराज, हिरा, लसणा, गोमेद, यास्फे, नीलमणी, पाचू, माणिक, व सोने असे अनेक तऱ्हेचे जवाहीर तुझ्या अंगभर होते; खंजिऱ्या व बासऱ्या ह्यांचे कसब तुझ्या येथे चालत असे; तुला निर्माण केले त्या दिवशी त्यांची योजना झाली. तू पाखर घालणारा अभिषिक्त करूब होतास; मी तुझी तशी योजना केली होती; तू देवाच्या पवित्र पर्वतावर होतास; तू अग्नीप्रमाणे झगझगणाऱ्या पाषाणांतून हिंडत असायचास. तुला निर्माण केले त्या दिवसापासून तुझ्या ठायी अधर्म दिसून येईपर्यंत तुझी चालचलणूक यथायोग्य होती. तुझा व्यापार मोठा असल्यामुळे तुझ्या हृदयात अपकारबुद्धी शिरून तू पातक केलेस; म्हणून मी तुला भ्रष्ट समजून परमेश्वराच्या पर्वतावरून लोटून दिले. हे पाखर घालणाऱ्या करूबा! त्या अग्नीप्रमाणे झगझगणाऱ्या पाषाणांमधून काढून मी तुझा नाश केला आहे. तुझ्या सौंदर्याच्या अभिमानाने तुझे हृदय उन्मत्त झाले, तुझ्या वैभवाने तुझी बुद्धी भ्रष्ट झाली; मी तुला भूमीवर आदळले, राजांनी तुझा तमाशा पाहावा म्हणून त्यांच्यापुढे तुला टाकले. खोटा व्यापार चालवून तू बहुत पातके केलीस, त्यांनी तू आपली पवित्रस्थाने विटाळलीस म्हणून तुझ्यातून अग्नी निघून तुला खाऊन टाकील, असे मी केले आहे आणि तुला पाहणाऱ्यांच्या डोळ्यांदेखत मी पृथ्वीवर तुझी राखरांगोळी केली आहे. राष्ट्रांमध्ये तुझ्या ओळखीचे सर्व तुला पाहून विस्मय पावले आहेत, तुझी दशा पाहून लोकांना दहशत पडली आहे, तू कायमचा नष्ट झाला आहेस.“ (यहेज्केल.२८:११ᳲ१९)

या वचनात टायरसचा राजा योग्य प्रकारे सैतानाला दर्शवितो. सैतान परिपूर्ण तयार केला गेला, त्याच्यात अभिमान किंवा स्वार्थाचा मागमूसही नव्हता. परिपूर्णतेतून त्याचे पडणे हे त्याचे स्वतःचे कार्य होते आणि ह्या अवलंबलेल्या कार्याला त्याच्याकडे काहीच कारण किंवा निम्मित नव्हते. त्याच्या सौंदर्यामुळे तो अभिमानी झाला. सैतानाचा नाश करणारी “आग“

बाहेरील स्त्रोतांकडून येणार नाही; ती सैतानाच्या आतून येईल. ही आग त्याचा स्वार्थ आहे. हि त्याने स्वतः निर्माण केलेली आग आहे जी त्याला खाऊन टाकेल. सैतानाचे अस्तित्व राहणार नाही – "यापुढे तू कधीही राहणार नाहीस."

हे देदिप्यमान ताऱ्या, प्रभातपुत्रा, तू आकाशातून कसा पडलास! राष्ट्रांना लोळवणाऱ्या तुला धुळीत कसे टाकले! जो तू आपल्या मनात म्हणालास, "मी आकाशात चढेन, देवाच्या तारांगणाहून माझे सिंहासन उच्च करीन, उत्तर भागातील देवसभेच्या पर्वतावर मी विराजमान होईन; मी मेघांवर आरोहण करीन, मी परात्परासमान होईन." (यशया १४:१२–१४)

ल्यूसिफर (सैतानाचे मूळ शीर्षक) पडला कारण त्याने स्वतःला उंच करण्याचा प्रयत्न केला. येशूने आपल्या अनुयायांना शिकवले, जो स्वतःला मोठा समजेल त्याला कमी लेखले जाईल. स्वतःला लहान समजणारा प्रत्येक जण मोठा गणला जाईल. (मत्तय २३:१२) ल्युसिफरने स्वतःच स्वतःला खाली आणले. "मी परात्परासमान होईन" असे त्याचे शब्द म्हणजे त्याने केवळ देवाच्या पदाची लालसा केली. ईश्वराचे चरित्र प्रतिबिंबित करण्याप्रती त्याला थोडा हि उत्साह नव्हता. देवाचे चरित्र प्रकट करणे हा केवळ एकमेव मार्ग आहे ज्याने मनुष्य देवा सारखे होऊ शकतो.

या वचनांची तपासणी करताना हे देखील लक्षात घेतले पाहिजे की देवाबाबत व्यक्त केलेले विचार हे ल्युसिफरचे आहेत आणि ते देवाच्या हेतूंचे अचूक वर्णन नाही. ल्युसिफर, त्याच्या स्वतःच्या उच्च पदाच्या लालसेपोटी, देवाचीही कल्पना स्वतः सारखीच करू लागला कि, देवालापण उच्च पदी राहण्याची लालसा आहे.

मग स्वर्गात युद्ध सुरू झाले; "मीखाएल" व त्याचे दूत अजगराबरोबर "युद्ध करण्यास" निघाले, आणि त्यांच्याबरोबर अजगर व त्याचे दूत लढले; तरी त्यांचे काही चालले नाही, आणि स्वर्गात त्यांचे ठिकाणही उरले नाही. मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट "साप" खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रकटी१२:७–९)

वरील वचन स्वर्गातील युद्धाचे दस्तऐवज आहे जेथे सैतानाने त्याच्या फसवणूकीचे काम सुरु केले. त्याचे काम आपल्या ग्रहाच्या कुठल्या कोपर्यापर्यंत मर्यादित राहिलेले नाही.; त्याने "संपूर्ण जगाला" फसवले आहे.

तेव्हा तो त्यांना म्हणाला, मी सैतानाला आकाशातून विजेसारखे पडताना पाहिले! (लूक १०:१८)

येशू येथे सैतानाच्या निष्ठेपासून बंडखोरीस पडण्याच्या वेगाबद्दल बोलत आहे.

कारण मला वाटते, देवाने आम्हा प्रेषितांना शेवटल्या जागेवरचे आणि मरणास नेमलेल्यांसारखे करून पुढे ठेवले आहे, कारण आम्ही जगाला म्हणजे देवदूतांना व माणसांना जणू तमाशा असे झालो आहोत! (१करिंथ.४:९)

त्यांना असे प्रकट करण्यात आले होते की, स्वर्गातून पाठवलेल्या पवित्र आत्म्याच्या द्वारे तुम्हांला सुवार्ता सांगणाऱ्यांनी त्या गोष्टी तुम्हांला आता सांगितल्या आहेत. त्या गोष्टी कळवण्याची सेवा ते स्वतःसाठी नव्हे, तर तुमच्यासाठी करत होते; त्या गोष्टी न्याहाळून पाहण्याची उत्कंठा देवदूतांना आहे. (१ पेत्र १:१२)

जेव्हा सैतानाने देवाविरुद्ध बंड केले आणि एक तृतीयांश देवदूतांना घेऊन स्वर्ग सोडले, तेव्हा देवाच्या बाजूने उरलेल्या एकनिष्ठ देवदूतांना काय होत आहे आणि का होत आहे हे ते समजू शकले नाही. सुवार्ता संदेश आपल्यासाठी आहे, तसेच ते देवाचे देवदूत त्यांच्यासाठी देखील आहे आणि ते मानवजातीच्या स्वतःच्या नाशापासून तारणासाठी देवाच्या निस्वार्थ प्रयत्नामध्ये स्वारस्य आहे. "सार्वकालिक सुवार्ता" (प्रकटी.१४:६) म्हणजे खात्री आहे कि हे विश्व सार्वकालिक देवाच्या विश्वासूपणाबद्दल कोणत्याही शंका पासून सुरक्षित असेल: 'परमेश्वराविषयी तुम्हांला काय वाटते? तो पुरापुरा अंत करील; विपत्ती दुसऱ्यांदा येणे नकोच. - नहूम १:९

तेव्हा सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला अरण्यात नेले. मग त्याने चाळीस दिवस व चाळीस रात्री उपास केला. त्यानंतर त्याला भूक लागली. तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्यात अशी आज्ञा कर. परंतु त्याने उत्तर दिले की, मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या वचनाने जगेल, असा शास्त्रलेख आहे. मग सैतानाने त्याला पवित्र नगरीत नेऊन मंदिराच्या शिरोभागी उभे केले; आणि त्याला म्हटले, "तू देवाचा पुत्र आहेस तर खाली उडी टाक, कारण असा शास्त्रलेख आहे की, तो आपल्या दूतांना तुझ्याविषयी आज्ञा करील, आणि तुझा पाय धोंड्यांवर आपटू नये म्हणून ते तुला हातांवर झेलून धरतील. येशूने त्याला म्हटले, आणखी असा शास्त्रलेख आहे की, परमेश्वर जो तुझा देव त्याची परीक्षा पाहू नकोस. पुढे सैतानाने त्याला एका अतिशय उंच डोंगरावर नेऊन त्याला जगातील सर्व राज्ये व त्यांचे वैभव दाखवले, आणि त्याला म्हटले, तू पाया पडून मला नमन करशील तर मी हे सर्वकाही तुला देईन. तेव्हा येशू त्याला म्हणाला, अरे सैताना, चालता हो, कारण असा शास्त्रलेख आहे की, परमेश्वर तुझा देव ह्याला नमन कर, व केवळ त्याचीच उपासना कर. मग सैतान त्याला सोडून गेला आणि पाहा, देवदूतांनी येऊन त्याची सेवा केली. (मत्तय ४:१-११,)

सैतान येशूला मोहात पाडण्याकरिता आला; त्याचे उघड ध्येय येशूचा विश्वास आणि पित्यावर अवलंबून राहणे सोडावे हाच होता. असाच दृष्टिकोन वापरून एदेन बागेत सैतानाने हवेला मोहात पडून यश संपादन केले होते. येशूचा पृथीवर मानवजातीला वाचविण्याचा उद्देश्य डावळण्याचा सैतानाने द्रुढ संकल्प केला होता ह्याकरिता सैतानाने येशूला स्वतःचा फायदा करण्यासाठी त्याच्या दैवी सामर्थ्याचा उपयोग करण्यास मोहित केले. देवाचा निस्वार्थपणा प्रकट करणे हे येशूचे ध्येय होते, आश्याने सैतानाचा खोटारडेपणा हि उघडकीस आला असता आणि ह्याकरिता येशूला त्याच्या ध्येयापासून सैतान रोखण्याकरिता बैचेन होता.

येशूच्या अरण्यातील परिक्षेमधील एका मोहात सैतानाने येशूला "जगातील राज्ये" देण्याचा प्रस्ताव मांडला, जर येशू फक्त खाली पडून त्याची उपासना करण्यास तयार असता. हे लक्षात घेण्यासारखे आहे की येशूने सैतानाच्या दाव्याची स्पर्धा केली नाही. देवाने जेव्हा प्रथम मनुष्याला बनविले, तेव्हा त्याने त्यांना पृथ्वीवरील इतर सर्व गोष्टी वर त्यांना सत्ता दिली. (उत्पत्ती १:२६), पण जेव्हा आदाम आणि हवेने त्यांच्या निर्मात्याबद्दल सैतानाने सांगितलेल्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवला तेव्हा त्यांना दिलेल्या सर्व अधिकार हे सैतानाच्या हाती गेले. आपण जगातील सैतानी राज्यात फसवणूक, जुलूम, जबरदस्ती आणि असमानता ह्या सगळ्या गोष्टी बघतो.

देवच्या राज्यात कुठल्याही प्रकारची जबरदस्ती कोणत्याही परिस्थितीत वापरले जात नाही. त्याचे राज्य आणि या राज्यांत काहीच समानता नाही. जग जे प्रीतीच्या नियमाच्या अनुसार नसून कायद्याच्या नियमानुसार चालते.

ह्यापुढे मी तुमच्याबरोबर फार बोलणार नाही, कारण जगाचा अधिकारी येतो; तरी माझ्यावर त्याची काही सत्ता नाही; (योहान १४:३०)

येशू खात्रीने सांगितले की सैतानच "या जगाचा राजा आहे". आपण जेव्हा सैतानाचे अस्तित्व आणि त्याच्या जगात दूरवर पसरलेल्या प्रभावला नाकारतो तेव्हा आपण अजाणतेपणाने आपल्या त्रासासाठी देवाला जबाबदार ठरवतो.

सावध असा, जागे राहा; तुमचा शत्रू सैतान हा गर्जणाऱ्या सिंहासारखा कोणाला गिळावे हे शोधत फिरतो. (१पेत्र ५:८)

आपला विरोधी हा सैतान आहे देव नाही आणि कधीही नसणार.

सैतानाच्या डावपेचांपुढे तुम्हांला टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री धारण करा. कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे. (इफिस ६:११-१२)

जेव्हा आपणास कळते की आपण सर्व देवाविरुद्ध फसवणूकीच्या बंडाचे बळी आहोत, तेव्हा आपण इतर लोकांकडे आपले शत्रू म्हणून पाहणार नाही परंतु या मोठ्या फसवाणूकीमध्ये आमचे सहकारी बळी किंवा चुकीच्या विचारांनी पीडित झालेले म्हणून बघू.

अथांग डोहाचा दूत हा त्यांच्यावर राजा आहे; इब्री भाषेतील त्यांचे नाव अबद्दोन, आणि हेल्लेणी भाषेतील त्याचे नाव अपल्लूओन (विध्वंसमूलक) आहे. (प्रकटी.९:११)

"अथांग डोहाचा दूत" सैतानाला सूचित करतो. अपोलीऑन, त्याला येथे दिलेले नाव म्हणजे ग्रीकमधील विध्वंसक. सैतान विनाशक आहे. आपल्या सभ्य देवाला हे शीर्षक देण्यास प्रभावीपणे आमच्याकडे कोणतेही औचित्य आहे का? चोर येतो तो केवळ चोरी, घात व नाश करायला येतो; मी तर त्यांना जीवनप्राप्ती व्हावी व ती विपुलपणे व्हावी म्हणून आलो आहे.- येशू (योहान १०:१०)

# ८. नष्ट करणारा सर्प



देवाने मिसर लोकांवर पाठवलेली पीडा हे देवाचे सर्वात जास्त जाणूनबुजून नाश करण्याच्या कृत्यांपैकी एक आहे असे वाटते. जेव्हा आपण बायबल वर वर वाचतो, बायबलमध्ये या घटनांचा अर्थ लावण्याचा दुसरा कोणताही मार्ग दिसत नाही. आपण आधी वाचलेले वचन आठवा परमेश्वर म्हणतो, “कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो.” (यशया ५५:८)

इस्रायली लोकांना मिसरी लोकांच्या बंधनातून मुक्त करण्यासाठी देवाने मोशेला नेमले होते. त्यांच्या देशात येणाऱ्या आपत्तींचा इशारा देण्यासाठी तो फारो समोर जाणार होता. जेव्हा देव मोशेला वाळवंटात भेटला तेव्हा त्याने त्याला एक वस्तुनिष्ठ धडा दिला जो मोशे आणि अहरोन नंतर फारोसमोर दाखवून देतील, ज्यामुळे येणाऱ्या आपत्तीजनक घटनांमध्ये देवाची भूमिका नेमकी काय असेल.

तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, “तुझ्या हातात ते काय आहे?” तो म्हणाला, “काठी आहे.” त्याने म्हटले, “ती जमिनीवर टाक.” ती त्याने टाकताच तिचा साप झाला; त्याला पाहून मोशे पळाला, परमेश्वराने मोशेला सांगितले, आपला हात पुढे करून त्याचे शेपूट धर - त्याने हात पुढे करून ते धरले, तेव्हा त्या सापाची त्याच्या हातात काठी झाली; (निर्गम.४:२-४)

लेवी अहरोन हा तुझा भाऊ नाही काय? त्याला चांगले बोलता येते हे मला ठाऊक आहे. पाहा, तो तुला भेटायला येत आहे; तुला पाहून त्याला मनात आनंद होईल. तो तुझ्यातर्फे लोकांशी बोलेल; तो तुझे मुख होईल आणि तू त्याला देवाच्या ठिकाणी होशील. तू आपल्या हातात ही काठी घे; हिने तू चिन्हे करून दाखवशील. (निर्गम.४:१४-१६,१७)

देवाचा प्रतिनिधी म्हणून मोशेला फारोपुढे जायचे होते. या प्रात्यक्षिकात देवाचा उद्देश त्याची शक्ती प्रदर्शित करण्याचा नव्हता, तर फारोने खरा विनाशकर्ता ओळखला पाहिजे हा होता. देवाचा प्रतिनिधी म्हणून जेव्हा मोशेने हातात काठी पकडली, हे ईश्वराच्या अधीन असलेल्या निसर्गाच्या शक्तींचे प्रतीक म्हणून प्रतीत झाले. जोपर्यंत देव संरक्षक हातांनी निसर्गाच्या विध्वंसक शक्तींना मागे ठेवले होते तो पर्यंत मिसरदेशाला कोणतीही इजा पोहोचू शकत नव्हते. मोशेने जेव्हा काठी जमिनीवर टाकली, तिचा सर्प झाला, जो कि सैतान आणि विध्वंसक शक्तींचा प्रतिक आहे. हे देवाच्या नियंत्रणाबाहेरील आणि सैतानाच्या नियंत्रणाखाली असलेल्या निसर्गाच्या शक्तींचे प्रतीक होते.

शेकडो वर्षांपूर्वी, मोशेच्या आणि योसेफाच्या (ज्याला त्याच्या भावांनी गुलाम म्हणून विकले होते) काळाच्या आधी फारोच्या त्रासदायक स्वप्नांचा अर्थ लावल्या नंतर, मिसर देशात इस्राएल लेकरांसाठी खूप चांगली व्यवस्था झाली होती. योसेफाने फारोच्या भविष्यसूचक स्वप्नाचा अर्थ लावला आणि दूरदृष्टीने पुढे येणाऱ्या सात वर्षे लांब दुष्काळाला सामोरे जाण्यासाठी जी तयारी करण्यास सांगितली, ह्या कारणामुळे  फारोने योसेफला एका उच्च आणि सन्माननिया पदावर बसवले. योसेफाच्या कुटुंबाचे स्वागत झाले. मिसरी लोकांनी योसेफ आणि त्याचा उपासक देव यांचे कौतुक केले. देव त्या देशाला विपुल आशीर्वाद देण्यास सक्षम होता. बऱ्याच वर्षांनी, योसेफाच्या मृत्यूनंतर, मिसरी लोक योसेफ व त्याच्या देवाला विसरले आणि मिसरी देशातील इस्रायली लोक ज्यांनी खूप प्रगती करून जमीन व्यापली होती, त्यांना गुलाम केले.  मिसरी लोक त्यांच्या कृतीतून हे दर्शवित होते कि त्यांना देवाच्या उपस्थितीची इच्छा नव्हती. त्यांचे स्वतःचे देव होते आणि त्यांना त्यांच्या गुलामगिरीत असलेल्या लोकांच्या देवाची ओळख पटून घ्यायची नव्हती. देव यापुढे त्याचे आशीर्वाद आणि संरक्षण पूर्ण करण्यास सक्षम नव्हता, आणि त्याच वेळी मिसरी लोकांना त्याच्यापासून वेगळे होण्याचे स्वातंत्र्य दिले.

पीडा सुरू झाल्यानंतर कोणत्याही वेळी जर फारो त्याच्या दुष्कृत्याकडून फिरला असता, आणि इस्राएल लोकांना जाऊ दिले असते, तर देवाने पुन्हा निसर्गाच्या शक्तींवर नियंत्रण ठेवले असते आणि त्या पिडांनवर अंत आणला असता. हट्टी शासकाने तसे केले नाही, आणि मिसर उध्वस्त झाले. मिसरच्या पीडे मध्ये देवाची स्पष्ट भूमिका तेव्हाच दिसून येते, जेव्हा देवाने काठी आणि सर्प ह्यांच्या प्रतिकात्म संदेश समोर ठेवला.

नैसर्गिक घटकांनी केलेल्या विनाशाच्या शुल्कातून देवाला निर्दोष घोषित करण्याचे अतिरिक्त समर्थन  १ राजे ह्या पुस्तकात आढळते. एलीया संदेष्टा त्याच्या सेवेच्या बिकट परिस्थितीत राणी ईजबेलपासून बचावासाठी गुहेमध्ये लपला होता कारण तिने त्याला जीवे मारण्याची धमकी दिली होती. देव त्याच्या संदेष्ट्याला भेटायला आला जो घाबरून पळून गेला होता.

तो तेथे जाऊन एका गुहेत राहिला; तेव्हा पाहा, परमेश्वराचे वचन त्याला प्राप्त झाले. तो त्याला म्हणाला, “एलीया, तू येथे काय करीत आहेस?“ तो म्हणाला, "सेनाधीश देव परमेश्वर ह्याच्याविषयी मी फार ईर्ष्यायुक्त झालो आहे; कारण इस्राएल लोकांनी तुझा करार पाळण्याचे सोडले, तुझ्या वेद्या मोडून टाकल्या, तुझे संदेष्टे तलवारीने वधले; मीच काय तो एकटा

उरलो आहे; आणि आता ते माझाही जीव घेऊ पाहत आहेत. त्याने त्याला म्हटले, तू येथून बाहेर निघून जा; पर्वतावर परमेश्वरासमोर उभा राहा. तेव्हा पाहा, परमेश्वर जवळून जात असताना त्याच्यासमोरून मोठा सुसाट्याचा वारा सुटून डोंगर विदारत व खडक फोडत होता; पण त्या वाऱ्यात परमेश्वर नव्हता. वारा सुटल्यानंतर भूमिकंप झाला; पण त्या भूमिकंपातही परमेश्वर नव्हता. भूमिकंपानंतर अग्नी प्रकट झाला; पण त्या अग्नीतही परमेश्वर नव्हता; त्या अग्नीनंतर शांत, मंद वाणी झाली. (१ राजे १९:९-१२)

आपला सौम्य देव अजूनही अगदी लहान आवाजात श्रवणीयपणे बोलतो.

# 9. ईयोबाची बंदी

ईयोबाच्या पुस्तकामध्ये दु:ख आणि नाश जे सैतानाच्या भूमिकेचे कार्य आहे हे स्पष्ट दिसते. आपल्याला देव आणि सैतान यांच्यामधील आध्यात्मिक लढाईच्या पडद्यामागील दृश्याची एक झलक देखील सापडते. ईयोब हा सात्त्विक, सरळ, देवाला भिऊन वागणारा व पापापासून दूर राहणारा मनुष्य (ईयोब १:८). या अध्यात्मिक लढाईच्या कठीण टप्प्यावर ईयोब स्वतःला तीव्र हल्ल्यामध्ये अडकलेला पाहतो.

एक दिवस असा आला की, त्या दिवशी देवपुत्र परमेश्वरापुढे येऊन उभे राहिले, व त्यांच्यामध्ये सैतानही आला. परमेश्वर सैतानाला म्हणाला, "तू आता कोठून आलास?" सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले, "मी पृथ्वीवर इकडेतिकडे हिंडून-फिरून आलो आहे." परमेश्वराने सैतानाला विचारले, "माझा सेवक ईयोब ह्याच्याकडे तुझे लक्ष गेले होते काय? भूतलावर त्याच्या तोडीचा सात्त्विक, सरळ, देवाला भिऊन वागणारा व पापापासून दूर राहणारा असा दुसरा कोणी नाही." सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले की, "ईयोब देवाचे भय काय फुकट बाळगतो? तो, त्याचे घर व त्याचे सर्वस्व ह्याभोवती तू कुंपण घातले आहेस ना? तू त्याच्या हाताला यश दिले आहेस ना? व देशात त्याचे धन वृद्धी पावत आहे ना? तू आपला हात पुढे करून त्याच्या सर्वस्वास लावून तर पाहा, म्हणजे तो तुझ्या तोंडावर तुझा अव्हेर करील." परमेश्वर सैतानाला म्हणाला, "पाहा, त्याचे सर्वस्व तुझ्या हाती देतो; त्याला मात्र हात लावू नकोस." मग सैतान परमेश्वरासमोरून निघून गेला. (ईयोब १:६ -१२)

सैतान ताबडतोब ईयोबाचे पुत्र व कन्यांसहित त्याचे जे काही होते, ते सर्व उद्ध्वस्थ करण्यास तो निघाला. जो विध्वंस झाला तो असा, 'सैतानाने हल्ला करणासाठी शत्रूंचा उपयोग केला, वचन १५ मध्ये शबाई लोकांच्याद्वारे, वचन १६ मध्ये अग्नीच्याद्वारे, वचन १७ मध्ये खास्द्यांच्याद्वारे आणि वचन १९ मध्ये रानातून आलेल्या प्रचंड वाऱ्याच्याद्वारे.

ईयोबाच्या पुस्तकात विध्वंस करणारा कोण आहे हे स्पष्ट झाले आहे.तरीही बरेच वाचक, ईयोबाच्या दुःखामुळे अजूनही विचलित आहेत. कारण असे मानले जाते की, देवाने सैतानाला ईयोबाला त्रास देऊ दिला.इथे विचार असा येतो कि, देव सर्वशक्तिमान असल्याने, त्याने ईयोबावर हल्ले करणाऱ्या सैतानाला रोखले पाहिजे होते. तथापि, हे कधीहि देवाच्या शक्तीशी संबंधित नव्हते;

देवाच्या प्रशासनाची तत्त्वे धोक्यात होती आणि नेहमीच असणार. देव त्याने निर्माण केलेल्या हुशार मानवांना सातत्याने स्वातंत्र देत नाही का? देवाने मानवाला दिलेले स्वातंत्र्य हे अपरिवर्तनीय आहे, जे कोणत्याही परिस्थितीत बदलले जात नाही.

ईयोबाच्या बाबतीत, देवाच्या प्रतिष्ठेशिवाय आणखी काहीतरी धोक्यात होते.ते म्हणजे "आपली पृथ्वी" सैतान आमचे जग हे त्याचे स्वतःचे सार्वभौम राज्य (शत्रूने ताब्यात घेतलेला प्रदेश) दाखवून जप्त करण्याचे धोरण आखत

होता. परमेश्वर सैतानाला म्हणाला, “तू आता कोठून आलास?” सैतानाने परमेश्वराला उत्तर दिले, “मी पृथ्वीवर इकडेतिकडे हिंडून-फिरून आलो आहे.” (ईयोब १:७)

जर आपण विचार-पूर्वक वाचण्याचे स्वातंत्र्य घेतले तर, सैतान मूलतः देवाला म्हणत होता, “मी संपूर्ण पृथ्वीवर फिरत आहे आणि असे दिसते की, माझ्या हेतूला माझा एकमताने लोकांचा पाठिंबा आहे; मी पृथ्वीवर पूर्ण राज्य करण्याचा माझा हक्क दावा करतो.” त्यानंतरच्या संपूर्ण संभाषणात, देव (कृतज्ञतापूर्वक) सैतानाच्या एक पाऊल पुढे राहिला व देव त्याच्या विश्वासू सेवकाला ओळखत होता. पवित्र शास्त्रा मध्ये नोंदवलेल्या दुसऱ्या सर्वांत भयंकर सैतानाच्या हल्ल्याचा सामना करूनही ईयोब देवाला विश्वासू राहिला. शेवटी देवाने ईयोबाच्या जीवाचे रक्षण केले आणि “ईयोबाने आपल्या मित्रांसाठी प्रार्थना केली, तेव्हा परमेश्वराने ईयोबाच्या दुःखाचा परिहार केला; पूर्वी ईयोबाची जी मालमत्ता होती तिच्या दुप्पट परमेश्वराने त्याला दिली.” (ईयोब ४२:१०) त्याचे मित्र खरंच ईयोबापेक्षा जास्त धोकादायक स्थितीमध्ये होते, कारण ते देवाला ओळखत नव्हते.

जेव्हा आपण हे शिकतो की देव आपल्या इच्छेचा कसा आदर करतो आणि तरीही तो आपल्या सर्वांसोबत कार्य करत राहतो, तेव्हा आपल्याला प्रत्येक मिनिटाला त्याच्यासमोर येणाऱ्या आव्हानांबद्दल थोडेसे समजू लागते.

बुद्धिमान प्राणी म्हणून आपण आपल्या जगात एकटे नाही. सैतान आणि त्याच्या पडलेल्या देवदूतांच्या सैन्यांसोबत आपली जागा सामायिक करणारे असंख्य आध्यात्मिक प्राणी आहेत. आपला वैयक्तिक स्वार्थी स्वभाव आणि आसुरी घटकांचे स्वरूप लक्षात घेता, आपली पृथ्वी रोजच्यारोज, स्व-केंद्रित मुक्त इच्छांच्या अनेक टक्करांची अवस्था आहे. सैतान आणि त्याचे सैन्य देवाला कसे अडवू शकते किंवा त्याचा प्रतिकार करू शकते हे समजून घेणे आपल्यासाठी विशेषतः कठीण आहे.

आपल्या पृथ्वी वरील प्रत्येक गोष्टीवर देवाचे संपूर्ण नियंत्रण आणि अधिकार नाही, हे जेव्हा आपल्याला समजते, तेव्हा आपल्यासाठी हे अस्वस्थ होऊ शकते. तथापि, देवाला आपल्या वैयक्तिक जीवनावर नियंत्रण ठेवण्याची इच्छा नाही, किंवा तसे करणे त्याच्या स्वभावात नाही; त्याने आपल्याला कठ-पुतळी नव्हे तर मुक्त बुद्धिमान प्राणी होण्यासाठी निर्माण केले.

ईयोबाच्या पुस्तकाच्या सुरुवातीला, तीन मध्यवर्ती सहभागींना समोर आणले आहे: देव, सैतान आणि ईयोब. पुस्तकाच्या शेवटी सैतान नावाचा उल्लेख नाही. देवासोबतच्या या ऐतिहासिक भेटीच्या निर्णायक समारोपाच्या वेळी तो अनुपस्थित का असेल?

ईयोबाचा संपूर्ण एकेचाळीसावा अध्याय, अशा रहस्यमयी प्राण्यावर लक्ष केंद्रित करतो, ज्याला देवाने ‘लिविथान’ या नावाने संबोधले आहे. काय किंवा कोण आहे लिव्याथान? बायबल आपल्याला काही संकेत देईल का ह्या प्राण्याला ओळखण्यासाठी?

त्या दिवशी परमेश्वर आपल्या दुःखकर, महान व बलवान खड्ग्गाने(तालवारीने )चपल सर्प लिव्याथान व वक्र सर्प लिव्याथान ह्यांचे पारिपत्य करील; समुद्रातील अजगराला ठार मारील. (यशया.२७:१) मग तो मोठा अजगर खाली टाकण्यात आला, म्हणजे सर्व जगाला ठकवणारा, जो दियाबल एक व सैतान म्हटलेला आहे तो जुनाट "साप" खाली पृथ्वीवर टाकण्यात आला व त्याच्याबरोबर त्याच्या दूतांना टाकण्यात आले. (प्रकटीकरण १२:९ ) चला, या प्राण्याच्या वर्णनातील सैतानाचे गुण तपासण्यासाठी, डोळ्यासमोर असलेला ईयोबाचा एकेचाळीस अध्याय तपासू या.

"लिव्याथानास गळ घालून तुला ओढता येईल काय? दोरीने त्याची जीभ तुला दाबून धरता येईल काय? त्याच्या नाकात लव्हाळ्याची वेसण तुला घालता येईल काय? त्याच्या जबड्यात गळ रोवता येईल काय? तो तुझे आर्जव (विनंती) करीत राहील काय? तो तुला लाडीगोडी लावील काय? मी तुझा सतत दास होऊन राहीन, अशी आणभाक तो तुझ्याशी करील काय? लहान पक्ष्याशी खेळतात तसा तू त्याच्याशी खेळशील काय? त्याला बांधून तुझ्या कुमारीस तो खेळायला देशील काय? धीवरांचे संघ त्याचा व्यापार करतील काय? त्याला विभागून ते व्यापाऱ्यांना देतील काय? त्याच्या कातडीत तू शूळ रोवशील काय? मासे मारण्याच्या बरच्या त्याच्या डोक्यात खुपसशील काय? तू त्याला हात लावून तर पाहा, ह्या झटापटीची आठवण तुला पक्की राहील; आणि पुन्हा तू तसे करणार नाहीस. पाहा, त्याला धरू पाहणाऱ्याची आशा निष्फळ होते; त्याला पाहूनच एखादा गांगरून जाणार नाही काय? त्याला चिडवण्याचे धाडस कोणी करणार नाही; तर मग माझ्यासमोर टिकेल असा कोण आहे? मला कोणी प्रथम काही दिले आहे काय, की मी त्याची फेड करू? अखिल नभोमंडळाखाली जे काही आहे ते माझे आहे. त्याचे अवयव, त्याचे महाबल, त्याचा सुंदर बांधा ह्यांविषयी बोलायचा मी राहणार नाही. त्याचे वरले आवरण कोणाला काढून घेता येईल? त्याच्या दाढांत कोणाला शिरकाव करता येईल? त्याच्या तोंडाची कवाडे कोणाला उघडता येतील? त्याचे दात चोहोकडून विक्राळ आहेत; त्याच्या खवल्याच्या रांगांचा त्याला अभिमान वाटतो; ती जशी काय परस्परांना जखडून टाकली आहेत. ती एकमेकांशी जडलेली आहेत; त्यांच्यामधून हवेचा प्रवेश होत नाही. ती एकमेकांशी जुळलेली व चिकटलेली आहेत; ती सुटी करता येत नाहीत. तो शिंकला म्हणजे प्रकाश चमकतो; त्याचे डोळे प्रभात-नेत्रांसारखे आहेत. त्याच्या तोंडातून ज्वाला निघतात, अग्नीच्या ठिणग्या उडतात. लव्हाळ्याच्या जाळावर उकळत ठेवलेल्या भांड्यांतून निघतो, तसा त्याच्या नाकपुड्यांतून धूर निघतो. त्याच्या श्वासाने कोळसे पेट घेतात; त्याच्या तोंडातून अग्निज्वाला निघते. त्याच्या मानेत बळ असते; त्याच्यापुढे दहशत थयथय नाचत असते. त्याचे मांसल भाग दाट असतात; ते त्याच्या अंगात घट्ट बसलेले असतात, हलत नाहीत. त्याचा ऊर पाषाणासारखा कठीण आहे; जात्याच्या खालच्या तळीसारखा तो कणखर आहे. त्याने डोके वर केले की, वीरही घाबरतात; भीतीने त्यांची गाळण उडते. कोणी त्याच्यावर तलवार चालवली तर ती त्याला लागत नाही; भाला, बरची, तीर ही काहीच त्याला लागत नाहीत. तो लोखंडाला कस्पटासमान, पितळेला कुजलेल्या लाकडासमान लेखतो. बाण त्याला पळवत नाही; गोफणगुंडे त्याला भुसासारखे लागतात. गदा तो कस्पटासमान लेखतो; परजणाऱ्या भाल्याला तो हसतो. त्याच्या अंगाचे खालचे भाग तीक्ष्ण धारेच्या खापऱ्यांसारखे आहेत; तो चिखलांवर जसा काय कुळव फिरवतो. तो सागर रांजणासारखा घुसळतो; तो समुद्र मलमाच्या भांड्यासारखा करून सोडतो, तो आपल्यामागून पाण्याचा माग प्रकाशयुक्त करतो; तेव्हा सागर शुभ्र केशधाऱ्यासारखा भासमान होतो. जन्मतःच भीतिविरहित असा भूतलावर त्याच्यासारखा कोणी नाही. तो उंच असलेल्या सर्वांकडे नजर लावण्यास भीत नाही; तो सर्व उन्मत्त पशूंचा राजा आहे" (ईयोब ४१)

देव या अध्यायात सैतानाचे वर्णन करतांना प्रतिकात्मक भाषेचा वापर करतो, शत्रू इतका सामर्थ्यवान आणि क्रूर आहे, त्या शत्रूविरुद्ध लढायला आपण असमर्थ आहोत. देव सर्वशक्तिमान आहे. परमेश्वर आपण कल्पनाही करू शकणार नाही अशा शत्रूबरोबर तीव्र संघर्षात व्यस्त आहे, तरीहि तो कोणत्याही परिस्थितीमध्ये त्याची ताकद न वापरता आपल्या वतीने हे युद्ध लढण्यास वचनबद्ध आहे.

सैतान जसा रागीष्ट, प्रतिरोधक, क्षमा न करणारा, बळजबरी करणारा, कायद्यानुसार न्याय करणारा, पापाला उत्तेजन देणारा आहे. पण तो देवच असा आहे असे सैतान आपल्याला दाखवतो. तसेच तो स्वतःला आपल्यासमोर 'प्रकाशाचा दूत' असल्याचे दाखवतो. (२ करिंथकरास ११:१४) पण फसवणूक करणारा त्याच्या कलाकुसरीत किती कुशल आहे, हे देवाला अगदी स्पष्ट दिसते जे आपण पाहू शकत नाही.

देवाच्या विरोध्याच्या या प्रतीकात्मक वर्णनाने देव आपल्यासाठी दररोज किती संघर्ष करतो, याची जाणीव होऊ शकते. जेव्हा सैतान त्याची सीमा ओलांडतो किंवा जे पवित्र आत्म्याला होकार देतात त्याचा नाश करण्यास पाहतो, तेव्हा परमेश्वर त्याच्या लेकरांना हानीच्या मार्गामधून बाहेर काढण्यास हस्तक्षेप करतो. यापैकी काही हस्तक्षेप आपल्यासाठी स्पष्ट आहेत, तर बहुतेक स्पष्ट नाहीत. त्यामुळे आज जग ज्या त्रासाला रोज सामोरे जात आहे, त्याबद्दल आपण देवालाच दोष देत आहोत. ईयोबाच्या या अनुभवावरून आपल्याला हे निश्चयी कळते की, देव त्याने निर्माण केलेल्या जीवांना इच्छेचे स्वातंत्र देऊन त्याचबरोबर प्रत्येक अपघात, प्रत्येक आपत्ती, प्रत्येक आजार किंवा प्रत्येक मृत्यू यांना प्रतिबंधित करू शकत नाही.

आणखी काही तरी आहे जे देव स्पष्टपणे पाहतो. फक्त तोच स्वत: देव स्वतःच्या सामर्थ्याने अस्तित्वात आहे (ड्शश्रष-एुळींशपीं) - देवाला कोणी निर्माण केला नाही. पण देवाने सैतानाला निर्माण केले (ज्याला तेव्हा ल्युसिफर म्हटले जायचे). सैतान एक निर्माण केलेली जीव आहे, ज्याने वाईट निवडले आणि वाईटाचे अस्तित्व पूर्णपणे चांगल्यावर अवलंबून आहे. जेव्हा विश्वातील सर्वबुद्धिमान जीवांना देवाच्या विश्वासूपणाचे स्पष्टपणे प्रकटीकरण होईल तेव्हा परमेश्वर, वाईटाचे मूळ असलेल्या सैतानाला, स्वतःलाच नाश करण्याची मुभा देईल. यापेक्षा भयानक काय असू शकते?

**तू भिऊ नकोस, कारण मी तुझ्याबरोबर आहे, घाबरू नकोस, कारण मी तुझा देव आहे; मी तुला शक्ती देतो, मी तुझे साहाय्यही करतो, मी आपल्या नीतिमत्तेच्या उजव्या हाताने तुला सावरतो. (यशया** ४१:१०)

## 10. पवित्र शास्त्र वाचताना आपण चुकीचा अर्थ का घेतो?

बायबल देवाने लिहून दिलेले नव्हते, तर पवित्र आत्म्याने प्रेरित झालेल्या मनुष्यांनी देवापासून आलेला संदेश सांगितला आहे. (२ पेत्र १:२१). बायबल हे मनुष्यांनी स्वतःचे शब्द वापरून आणि प्रत्येक व्यक्तीची संस्कृती, पार्श्वभूमी आणि व्यक्तिमत्वाच्या संदर्भ वापरून लिहिले होते.

बायबलमध्ये असे का दिसते की देव एक विध्वंसक आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी प्रथम बायबलमधील प्राचीन धार्मिक काळाच्या संस्कृतीचा विचार करणे उपयुक्त ठरेल. हे स्पष्ट आहे - म्हणजे इस्राएली लोक जे की बायबलच्या आख्यानमधील मुख्य पात्र होते, ते मुर्तीपुजेच्या प्रभावाने वेढलेले होते. मूर्तिपूजा टाळा असा स्पष्ट इशारा असूनही, ते त्यांच्या शेजाऱ्यांच्या लोकांच्या मूर्तिपूजक पद्धतींच्या सतत प्रभावात होते. प्रचलित संस्कृतीमुळे इस्राएल लोकांमध्ये देवाची समज विकृत होती.

देवाला स्वतःला लोकांसमोर प्रकट करण्याची बर्याच काळापासून खूप इच्छा होती. तथापि, जर देवाने त्याच्या चारित्र्याचे वैभव त्यांना प्रकट केले असते, तर ते त्याच्यापासून लांब गेले असते. ज्या लोकांना तो स्वतःला प्रकट करू इच्छित होता त्या लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी देव मानवी स्तरावर आला. म्हणजे त्यांना समजेल अशा पद्धतीने तो त्यांच्याशी बोलला. इस्राएली लोकांचा स्वतःचा नाश होण्यापासून वाचवण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधताना देव स्वतःचा गैरसमज होऊ देण्यास तयार होता.

शिवाय, प्राचीन बायबल देशांमध्ये, सैतानी प्रभावाखाली असणाऱ्या लोकांनी हिंसक आणि सहज क्रोधीत होतील अशा देवतांची निर्मिती केली. त्यांचा असा विश्वास होता कि ज्या अपत्तींना त्यांना सहन करावे लागते, त्यासाठी हे रागीष्ट देव जबाबदार आहेत. परिणामस्वरूप, लोकांनी त्या देवतांना त्यांचा राग शांत करण्यासाठी बळी देण्यास सुरुवात केली आणि धार्मिक विधींत त्यांच्या समोर झुकायला लागले.

जुन्या करारात सैतानाचा उल्लेख अगदी कमी केला आहे. पण तो खरच आपल्या जगातील सगळ्या दुःखांसाठी दोषी आहे. लोकांना झालेल्या त्रासासाठी जर सैतानाला जबाबदार म्हणून ओळखले गेले असते तर, इस्राएली लोकांच्या देवाऐवजी सर्वांचे लक्ष सैतानाकडे लागले असते. इस्त्रायली लोंकांनी सैतानाला निसर्गाच्या शक्तींवर प्रभावशाली शक्ती असलेला दुसरा देव असे मानले असते. यामुळे त्यांनी त्याला बळी अर्पण केले असते आणि असे केल्याने त्यांनी देवा ऐवजी सैतानाची उपासना केली असती.

देवाने हे घडण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला आणि स्वत: ला लोकांना मिळालेल्या चांगल्या गोष्टींचाच नव्हे तर वाईट गोष्टींचाही स्रोत म्हणून पाहण्याची परवानगी दिली. देव स्वतःच्या प्रतिष्ठेपेक्षा, लोक आणि त्या वास्तविक विनाशकाची अकाली ओळख झाल्यानंतर होणाऱ्या दुष्परिणामाबद्दल अधिक काळजीत देवाचा हा निस्वार्थी होता. संकल्प असूनही, लोक मुर्तीपुजेच्या उपासनेतून सैतानी आत्म्यांची पूजा केली. "देव नाहीत अशा भुतांना, जे अलीकडेच नवीन निघाले आहेत, ज्यांना तुमचे पूर्वज भीत नव्हते, अशा अपरिचित देवांना त्यांनी बली अर्पण केले." (अनुवाद ३२:१७)

प्राचीन इस्राएली देवाच्या सौम्य आणि प्रेमळ चारित्र्याच्या स्पष्ट प्रकटीकरणासाठी तयार नव्हते. देव खरोखरच जसा आहे तसाच निस्वार्थ प्रेम घेऊन त्यांच्याकडे प्रकट होऊन आला असता तर त्यांनी त्याला नाकारले असते. त्यांना असा देव पाहिजे होता जो त्यांच्यासाठी लढेन आणि त्यांच्या शत्रूंविरुद्ध हिंसाचाराचा वापर करेल. इस्राएलांना एक असा देव हवा होता जो त्यांच्या सारखाच असेल. "देवाने माणसाला स्वतःच्या प्रतिरूपात निर्माण केले" (उत्पत्ति १:२७) हे सत्य स्वीकारण्याऐवजी, त्यांनी स्वतःच्या प्रतिमेत देव निर्माण करण्याचा निर्धार केला होता. (आपण विचार करण्यास इच्छुक असल्यास) हे सर्व आपल्याला आजपर्यंतच्या युगापासून मानवजातीचा मुख्यतः देवाशी कसा संबंध आहे याची समज देते.

# 11. आपण देवाचा गैरसमज का करतो

जेव्हा देव आमच्यामध्ये चालला, तेव्हा धार्मिक प्रतिष्ठितांनी त्याला ओळखले नाही किंवा त्यांनी त्याचे स्वागतही केले नाही.

मग ते तेथून जात असताना, पाहा, एका मुक्या भूतग्रस्ताला त्याच्याकडे आणले. त्याने भूत काढल्यावर त्या मुक्याला वाचा आली; तेव्हा लोकसमुदाय आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "इस्राएलात असे कधीही पाहण्यात आले नव्हते." परंतु परूशी म्हणू लागले, "हा भुतांच्या अधिपतीच्या साहाय्याने भुते काढतो. "नंतर येशू त्यांच्या सभास्थानांत शिकवत, राज्याच्या सुवार्तेची घोषणा करत आणि सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारची दुखणी बरी करत सर्व नगरांतून व गावांतून फिरत होता. (मत्तय ९:३२-३५)

यशयाचे पुढील शब्द त्यांना उपयुक्त आहेत ज्यांनी येशूवर सैतानाशी करार करत असल्याचा आरोप केला: "जे वाइटाला बरे व बऱ्याला वाईट म्हणतात, जे प्रकाशाला अंधकार व अंधकाराला प्रकाश समजतात, गोड ते कडू व कडू ते गोड मानतात त्यांना धिक्कार असो. जे आपल्या दृष्टीने ज्ञानी व आपल्या मते समंजस त्यांना धिक्कार असो " (यशया ५:२०-२१).

तो जगात होता व जग त्याच्या द्वारे झाले, तरी जगाने त्याला ओळखले नाही. जे त्याचे स्वतःचे त्याकडे तो आला तरी त्याच्या स्वकीयांनी त्याचा स्वीकार केला नाही. (योहान १:१०-११)

हा परिच्छेद फक्त प्राचीन इतिहासाचा संदर्भ देत नाही. देव अजूनही अगणित लोकांना अज्ञात आहे. आपण अनेक प्रकारे त्याचा गैरसमज करून घेतला आहे आणि त्याला पूर्णपणे ओळखले नाही. आपल्या पापी प्रवृत्तीमुळे देव कसा आहे हे आपल्याला समजत नाही. तो आपल्यासारखा स्वकेंद्रित किंवा स्वार्थी आहे असे आपण गृहीत धरतो.

स्वाभाविक वृत्तीचा माणूस देवाच्या आत्म्याच्या गोष्टी स्वीकारीत नाही, कारण त्या त्याला मूर्खपणाच्या वाटतात; आणि त्याला त्या समजू शकणार नाहीत, कारण त्यांची पारख आत्म्याच्या द्वारे होते. (१ करिंथ.२:१४)

मानव जातीला बाह्य धर्माचे म्हणजे दिखावा करणाऱ्या धर्माचे आकर्षण आहे. त्याऐवजी, आपण आपला स्वार्थ सोडून देवाचे प्रेम स्वीकारले पाहिजे. 'स्वाभाविक मनुष्याला' स्वार्थाचा त्याग करण्याचा विचार खूप धोकादायक वाटतो. बाह्य धर्म जास्त अधिक सुरक्षित दिसतो, परंतु या प्रकारची सुरक्षा हा एक कपटी भ्रम आहे; बाह्य धर्म बहुतेक वेळा देवापासून लपण्यासाठी वापरला जातो.

मग परूशी तेथे आले आणि त्याची परीक्षा पाहण्याच्या उद्देशाने म्हणाले, कोणत्याही कारणावरून बायको टाकणे सशास्त्र आहे काय? त्याने उत्तर दिले, तुम्ही वाचले नाही काय की, उत्पन्नकर्त्याने सुरुवातीलाच नरनारी अशी ती निर्माण केली, व म्हटले, "ह्याकरता पुरुष आपल्या आईबापांस सोडून आपल्या बायकोशी जडून राहील आणि ती दोघे एकदेह होतील?

ह्यामुळे ती पुढे दोन नाहीत तर एकदेह अशी आहेत. म्हणून देवाने जे जोडले आहे ते माणसाने तोडू नये. ते त्याला म्हणाले, तर सूटपत्र देऊन तिला टाकावे अशी आज्ञा मोशेने का दिली?ङ्ग तो त्यांना म्हणाला, तुमच्या अंतःकरणाच्या कठोरपणामुळे मोशेने तुम्हांला आपल्या बायका टाकू दिल्या; तरी सुरुवातीपासून असे नव्हते. (मत्तय १९:३-८)

जुन्या करारातील बहुतेक शास्त्रवचने आपल्याला दाखवतात की देवाने कठोर मनाच्या लोकांच्या जवळ येण्याचा कसा प्रयत्न केला. जेव्हा आपण बायबलमधील शास्त्रवचने वाचतो जेथे देवाने लोकांना सोडून देण्याऐवजी लोकांना त्यांच्या इच्छेनुसार वागण्याची परवानगी दिली तेव्हा आपण देवाचा गैरसमज करतो. आम्ही असे आहोत ज्याच्या मध्ये करुणेचा अभाव आहे पण देव तसा नाही. तरीही जुन्या करारात आपण नेहमीच निर्दयी लोकांशी देवाचे संवाद चुकीचे वाचत आलो आहोत. म्हणूनच आम्ही देवावर गुलामगिरी आणि एकापेक्षा जास्त जोडीदाराशी विवाहाचि परवानगी देणारा असे आरोप लावतो. तसेच, आम्ही देवावर युद्धांना प्रोत्साहन दिल्याचा आणि नरसंहाराचा आदेश दिल्याचा आरोप लावतो. कायदा मोडणाऱ्यांसाठी कठोर दंड ठोठावल्याबद्दल आम्ही देवावर आरोप लावतो. आपण हे आरोप लावतो कारण मानवी कठोरपणाबद्दल असलेल्या समस्येचे परिणाम आम्हाला समजत नाही. प्राचीन इस्रायलशी त्याच्या संवादादरम्यान, देवाला सतत अनेक समस्यांचा सामना करावा लागला.

डोंगरावरील प्रवचनात, येशून नियमशास्त्राला मोठे रूप देतो. प्रेमावर आधारलेल्या नियमांची पूर्तता करण्यासाठी व्यावहारिक उदाहरणे तो आपल्याला देतो.

"डोळ्याबद्दल डोळा व दाताबद्दल दात" असे सांगितले होते, हे तुम्ही ऐकले आहे. मी तर तुम्हांला सांगतो, दुष्टाला अडवू नका. जो कोणी तुझ्या उजव्या गालावर मारतो, त्याच्याकडे दुसरा गाल कर; जो तुझ्यावर फिर्याद करून तुझी बंडी घेऊ पाहतो त्याला तुझा अंगरखाही घेऊ दे; आणि जो कोणी तुला वेठीस धरून एक कोस नेईल त्याच्याबरोबर दोन कोस जा. जो तुझ्याजवळ काही मागतो त्याला दे आणि जो तुझ्यापासून उसने घेऊ पाहतो त्याला पाठमोरा होऊ नकोस. (मत्तय ५:३८-४२)

या वचनात, येशूने कठोर हृदय असलेल्या लोकांच्या इच्छेशी समेट न करता देवाच्या परिपूर्ण इच्छेबद्दल स्पष्टीकरण दिले.

येशूने त्यांना म्हटले, देव जर तुमचा पिता असता तर तुम्ही माझ्यावर प्रीती केली असती; कारण मी देवापासून निघालो व आलो आहे; मी आपण होऊन आलो नाही, तर त्यानेच मला पाठवले. तुम्ही माझे बोलणे का समजून घेत नाही? ह्याचे कारण हेच की, तुमच्याने माझे वचन ऐकवत नाही. तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. पण मी तुम्हांला खरे सांगतो म्हणून तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवत नाही. तुमच्यापैकी कोण मला पापी ठरवतो? मी खरे सांगत असता तुम्ही माझ्यावर विश्वास का ठेवत नाही? जो देवापासून आहे तो देवाची वचने ऐकतो; तुम्ही देवापासून नाही म्हणून तुम्ही ऐकत नाही. यहूद्यांनी त्याला उत्तर दिले, तुम्ही शोमरोनी आहात व तुम्हांला भूत लागले आहे, हे जे आम्ही म्हणतो ते बरोबर आहे की नाही? (योहान ८:४२-४८)

प्रभू येशू धार्मिक नेत्यांना म्हणाला, तुम्ही तुमचा पिता सैतान ह्यापासून आहांत. येशूने सैतानाला त्यांचा पिता म्हटले कारण त्यांनी देवाचे खोटे चित्र स्वीकारले होते जे सैतान या जगाच्या सुरुवातीपासून स्थापित करण्याचा प्रयत्न करीत होता. शिवाय, ते त्या चरित्रातील कोणत्याही बदलास विरोध करीत होते.

त्यांनी त्याच्यावरील दोषारोपाचा लेख त्याच्या डोक्याच्या वर लावला; तो असा : हा यहूद्यांचा राजा येशू आहे. त्या वेळी त्यांनी त्याच्याबरोबर दोन लुटारू, एक त्याच्या उजवीकडे व एक डावीकडे असे वधस्तंभावर खिळले. आणि जवळून जाणारेयेणारे डोकी डोलवत त्याची अशी निंदा करत होते की, अरे, मंदिर मोडून तीन दिवसांत बांधणाऱ्या, तू देवाचा पुत्र असलास तर स्वतःचा बचाव कर आणि वधस्तंभावरून खाली उतर. तसेच मुख्य याजकही, शास्त्री व वडील ह्यांच्याबरोबरीने थट्टा करत म्हणाले, त्याने दुसऱ्यांना वाचवले; त्याला स्वतःला वाचवता येत नाही; तो इस्राएलाचा राजा आहे; त्याने आता वधस्तंभावरून खाली उतरावे, म्हणजे आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवू. तो देवावर भरवसा ठेवतो; तो त्याला हवा असेल तर त्याने त्याला आता सोडवावे; कारण मी देवाचा पुत्र आहे, असे तो म्हणत असे. (मत्तय. २७:३७-४३)

ज्यांनी वधस्तंभावर येशूची थट्टा केली त्यांनी तोच डावपेच वापरला, जो सैतानाने ख्रिस्ताची परीक्षा घेण्यासाठी वाळवंटात वापरला होता. तूं देवाचा पुत्र असलास तर (मत्तय ४:३)

आणि नवा द्राक्षारस जुन्या बुधल्यांत कोणी घालत नाही; घातला तर नवा द्राक्षारस बुधले फाडून गळून जाईल व बुधल्यांचा नाश होईल. म्हणून नवा द्राक्षारस नव्या बुधल्यांत घालावा, म्हणजे दोन्हीही टिकतात. (लूक ५:३७-३८) प्रभू येशू, या दृश्यामध्ये, त्याच्या मूलभूत नवीन शिक्षणाची तुलना नवा द्राक्षारस असे करतो जे जुन्या बुधल्यांना फाडून गळून जाईल. प्रभू येशूने शब्दांच्या आणि उदाहरणांच्याद्वारे देवाच्या प्रेमाचे स्पष्ट चित्रण केले आहे, जे देवाच्या विकृत चरित्राच्या विरुद्ध उभे राहतात. (म्हणजे जुना द्राक्षरस) आणि हे चित्रण धर्मगुरूं (म्हणजे जुने बुधले) यांनी केले होते, ही दोन विरोधाभासी दृश्ये एकत्र मिसळली जाऊ शकली नाहीत. आजही तसेच आहे. आज आमच्या मनात आमच्या नम्र देवाला जागा देण्यासाठी हिंसक देवाचे चित्र जाणे आवश्यक आहे.

## 12. देव कसा नष्ट करतो

देव कशा प्रकारे नष्ट करतो याचे एक स्पष्ट उदाहरण १ इतिहास या पुस्तकात सापडते. इस्राएलाचा राजा शौल याला त्याच्या विध्वंसक मार्गापासून फिरण्यासाठी, परमेश्वराचा सल्ला शमुवेल संदिष्ट्याकडून येत होता, त्याकडे तो दुर्लक्ष करत होता. आपला निष्ठावंत सेवक दावीद याला ठार मारण्याचे अनेक प्रयत्न इस्राएलचा राजा शौल याने केले. याजक नोब याची हत्या केल्याबद्दल शौल दोषी होता आणि त्याने त्यासाठी एका जादूगाराचा सल्ला देखील घेतला होता. पलिष्टी लोकांशी झालेल्या लढाईत शौल जखमी झाला होता, आणि त्याला पकडले तर त्याचे काय होईल याची त्याला भीती वाटली. या निराशेत, तो फार घाबरला होता तेव्हा शौल आपली तरवार काढून तिच्यावर पडला. (१ इतिहास १०:४).



**शौलच्या या दुःखद मृत्युचा बायबल कसा निष्कर्ष काढतो ते पाहा**: शौलाने परमेश्वराचा अपराध केला, परमेश्वराचा शब्द मानला नाही आणि परमेश्वराला प्रश्न करण्याऐवजी भूतविद्याप्रवीण स्त्रीचा त्याने सल्ला घेतला, ह्या सर्वांमुळे तो मेला; परमेश्वराने त्याला मारले आणि इशायाचा पुत्र दावीद ह्याला राज्य बहाल केले. (१ इतिहास १०:१३–१४)

हे स्पष्ट आहे की शौलच्या मृत्यूमध्ये देवाची फक्त एवढीच भूमिका आहे की त्याने शौलला स्वतःच्या मार्गाने जाऊ दिले आणि त्याने अवलंबलेल्या मार्गाचा परिणाम काय आहे याचा त्याला अनुभव येऊ दिला. शौलच्या मृत्यूचे कारण आत्महत्या होते, खून नाही, परंतु पवित्र शास्त्रात असे म्हटले आहे की देवाने त्याला मारले. देवाने काय केले याचे वर्णन करण्यासाठी येथे वापरलेला शब्द शब्दकोषातील व्याख्येपेक्षा निश्चितपणे वेगळा आहे. फक्त एवढेच वेगळे उदाहरण नाही. पुढील धड्यांमध्ये पवित्रशास्त्रातील शब्दांचे जसे कि राग, कोप, ईर्षा यांचे परीक्षण केले आहे. देवाचे मार्ग आणि देवाच्या विचारांचा संदर्भ देताना, पवित्र शास्त्र या शब्दांना त्यांच्या सामान्य वापरापेक्षा पूर्णपणे वेगळा अर्थ देते.

परमेश्वरप्राप्तीचा काळ आहे तोवर त्याला शोधा; तो जवळ आहे तोच त्याचा धावा करा; दुर्जन आपला मार्ग सोडो, अधर्मी आपल्या कल्पनांचा त्याग करो आणि परमेश्वराकडे वळो म्हणजे तो त्याच्यावर दया करील; तो आमच्या देवाकडे वळो, कारण तो त्याला भरपूर क्षमा करील. कारण माझ्या कल्पना तुमच्या कल्पना नाहीत; माझे मार्ग तुमचे मार्ग नाहीत, असे परमेश्वर म्हणतो. कारण आकाश जसे पृथ्वीहून उंच आहे, तसे माझे मार्ग तुमच्या मार्गांहून आणि माझ्या कल्पना तुमच्या कल्पनांहून उंच आहेत. (यशया ५५:६-९)

# 13. देवाचा क्रोध काय आहे?

जेव्हा आपण जुना करार वाचतो तेव्हा देवाच्या क्रोधाबद्दलचे प्रश्न आपल्यापैकी अनेकांना गोंधळात टाकतात. देवाच्या रागाचे आणि क्रोधाचे अनेक संदर्भ आहेत, पण त्याचा क्रोध काय आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, पवित्र शास्त्रामधील काही उदाहरणे पाहणे हे प्रबोधक ठरेल. देवाच्या रागाचा पहिला उल्लेख तेव्हा झाला जेव्हा त्याने इस्राएल लोकांना मिसरच्या गुलामगिरीतून स्वतंत्र करण्यासाठी मोशेला नेमले. त्या वेळी अशी काय परिस्थिती होती ज्याने देवाला आपला क्रोध प्रकट करण्यास भाग पाडले?

तेव्हा मोशे परमेश्वराला म्हणाला, हे प्रभू, मी बोलका नाही; पूर्वीही नव्हतो, व तू आपल्या दासाशी बोललास तेव्हापासूनही नाही; मी तर मुखाचा जड व जिभेचाही जड आहे. तेव्हा परमेश्वर त्याला म्हणाला, मनुष्याचे तोंड कोणी केले आहे? मनुष्याला मुका, बहिरा, डोळस किंवा आंधळा कोण करतो? मी परमेश्वरच की नाही? तर आता जा, मी तुझ्या मुखास साहाय्य होईन आणि तू काय बोलायचे ते तुला शिकवीन. तेव्हा तो म्हणाला, हे प्रभू, तुझ्या मर्जीस येईल त्याच्या हस्ते त्यांना संदेश पाठव. (निर्गम ४:१०-१३)

जेव्हा एकटा फारोच्या समोर जाण्याची मोशेला भीती वाटत होती. तेव्हा त्याने देवाला प्रवक्त्यासाठी विनंती केली. त्याला देवाने काय प्रतिसाद दिला?

मग मोशेवर परमेश्वराचा राग भडकला, तो त्याला म्हणाला, लेवी अहरोन हा तुझा भाऊ नाही काय? त्याला चांगले बोलता येते हे मला ठाऊक आहे. पाहा, तो तुला भेटायला येत आहे; तुला पाहून त्याला मनात आनंद होईल. (निर्गम ४:१४)

देवाने आपला राग कसा व्यक्त केला? मोशेने जे मागितले ते त्याला देऊन. आपण देवाच्या क्रोधा संदर्भांत बायबल मधील अजून काही परिच्छेद पाहू.

त्यांच्यामध्ये जो मिश्र समुदाय होता त्याने सोस घेतला; आणि इस्राएल लोकही पुन्हा रडगाणे गाऊन म्हणाले, आम्हांला खायला मांस कोण देईल? सर्व कुटुंबांतील लोक आपापल्या तंबूंच्या दारांशी रडताना मोशेने ऐकले; व त्यांच्यावर परमेश्वराचा कोप फार भडकला; मोशेलाही वाईट वाटले. नंतर परमेश्वरापासून वाहिलेल्या वाऱ्याने समुद्रावरून लावे आणले; ते छावणीवर व छावणीसभोवती इतके आले की, छावणीच्या मागे व पुढे एकेक दिवसाच्या अंतरापर्यंतच्या प्रदेशात त्यांचा सुमारे दोन हात उंचीचा थर जमला. लोकांनी उठून तो सगळा दिवस, सगळी रात्र, दुसराही सगळा दिवस ते लावे गोळा केले; ज्याने सर्वांत कमी गोळा केले त्याचे दहा होमर भरले; आणि त्यांनी ते स्वतःसाठी छावणीच्या चारही बाजूंना पसरून ठेवले. (गणना.११:४,१०,३१-३२)

या घटनेत पुन्हा परमेश्वराचा क्रोध नमूद केलेला आढळतो. त्याने काय केले? त्याने लोकांना हवे ते दिले.

शमुवेलाने वृद्ध झाल्यावर आपल्या पुत्रांना इस्राएलाचे न्यायाधीश म्हणून नेमले. त्याच्या ज्येष्ठ पुत्राचे नाव योएल असे होते आणि दुसऱ्याचे नाव अबीया असे होते; बैर-शेबा येथे ते न्यायनिवाडा करीत असत; पण त्याचे पुत्र त्याच्या मार्गाने चालले

नाहीत; त्यांना पैशाचा लोभ लागून ते लाच खात व न्यायनिवाडा विपरीत करीत. नंतर इस्राएलाचे सर्व वडील जमा होऊन रामा येथे शमुवेलाकडे आले. ते त्याला म्हणाले, पाहा, आता तुम्ही वृद्ध झाला आहात आणि तुमच्या मार्गाने तुमचे पुत्र चालत नाहीत; तर आता इतर सर्व राष्ट्रांप्रमाणे आमचा न्यायनिवाडा करायला आमच्यावर एक राजा नेमा.आमचा न्यायनिवाडा करायला आम्हांला एक राजा द्या, असे ते म्हणाले त्यामुळे शमुवेलास वाईट वाटले. मग शमुवेलाने परमेश्वराची प्रार्थना केली. तेव्हा परमेश्वर शमुवेलाला म्हणाला, लोक जे तुला सांगत आहेत ते सगळे ऐक; कारण त्यात ते तुझा धिक्कार करत नाहीत, तर मी त्यांचा राजा नसावे म्हणून ते माझाच धिक्कार करत आहेत. (१शमु.८:१-७)

देवाने संदेष्टा शमुवेल द्वारे आपल्या लोकांना स्पष्टपणे समजावून सांगितले की त्यांच्यावर राजा असणे त्यांच्यासाठी चांगले का नाही. तरीही त्यांनी शमुवेलचे ऐकले का?

तरीपण लोक शमुवेलाचे म्हणणे ऐकेनात; ते म्हणाले, नाही, नाही! आमच्यावर राजा पाहिजेच; म्हणजे इतर सर्व राष्ट्रांसमान आम्ही होऊ; आमचा राजा आमचा न्यायनिवाडा करील व आमच्यापुढे चालून तो आमच्या लढाया लढेल. (१ शमु: ८:१९-२०)

लोकांच्या आग्रहाला देवाने कसा प्रतिसाद दिला? आणि परमेश्वर शमुवेलला म्हणाला, त्यांचे म्हणणे ऐकून त्यांना एक राजा दे. (व. २२). आपल्याला कसे कळेल की देवाने रागावून त्यांना राजा दिला म्हणून? संदेष्टा होशेया, या ऐतिहासिक घटनेकडे परत पाहत असतांना, देवाचा ह्या भूमिकेबद्दल असलेले दृष्टीकोन दाखवतो कि त्याने लोकांची विनंती कशी मान्य केली.

हे इस्राएला, जो मी तुझा साहाय्यकर्ता त्या माझ्यावर तू उलटलास, त्यामुळे तुझा नाश झाला. तुझ्या सर्व नगरांतून तुझा बचाव करणारा तुझा राजा कोठे गेला? ज्या तुझ्या शास्त्यांच्या बाबतीत तू म्हणावेस की, मला राजा व अधिपती असावेत, ते कोठे गेले? मी तुझ्यावर कोपून तुला राजा दिला व तुझ्यावर रागावून तो काढून नेला. (होस१३:९-११)

ही तीन पवित्र शास्त्रामधील वचनीय माहिती स्पष्टपणे दर्शविते की देवाचे क्रोध म्हणजे इस्राएली लोकांना जे त्यांनी मागितलेले ते देणे होय जरी त्याला हे माहिती होते कि त्याचे असे करणे हे त्यांच्या भल्याचे नाही. पवित्र शास्त्रामधून देवाच्या क्रोधाची व्याख्या शब्दकोशात सापडलेल्या परिभाषेपेक्षा निश्चितपणे वेगळी असू शकते हे सूचित करण्यासाठी हे पुरावे पुरेसे आहेत. तथापि, या पेक्षा आणखी काही आहे. येशूला राग आला तेव्हा काय झाले?

मग तो पुन्हा एका सभास्थानात गेला; तेथे वाळलेल्या हाताचा एक माणूस होता. आणि त्याच्यावर दोष ठेवावा म्हणून शब्बाथ दिवशी तो त्याला बरे करतो की काय हे पाहण्यास ते टपून बसले होते. तेव्हा त्याने हात वाळलेल्या माणसाला म्हटले, ऊठ, मध्ये उभा राहा. मग तो त्यांना म्हणाला, ङ्कशब्बाथ दिवशी बरे करणे किंवा वाईट करणे, जीव वाचवणे किंवा जीव घेणे, ह्यांतून कोणते सशास्त्र आहे?ङ्क पण ते उगेच राहिले. मग त्याने त्यांच्या मनाच्या कठीणपणामुळे खिन्न होऊन त्या सर्वांकडे रागाने पाहिले व त्या माणसाला म्हटले, हात लांब कर. त्याने हात लांब केला आणि तो बरा झाला. मग परूशी बाहेर जाऊन त्याचा (येशूचा) घात कसा करावा ह्याविषयी लगेचच हेरोदीयांबरोबर त्याच्याविरुद्ध मसलत करीत बसले. (मार्क३:१-६)

येथे येशू परुश्यांना संबोधित करत होता. त्यांच्या शास्त्राच्या कायदेशीर  समजुतीमुळे त्यांनी इतरांना शब्बाथ दिवशी उपचारांमध्ये भाग घेण्यापासून प्रतिबंधित केले. येशू त्यांचे अंतःकरण वाचून त्यांच्या भोवती सभोवार रागाने बघतच राहिला. येशूला कोणत्या प्रकारचा राग आला होता? बायबलमध्ये त्या रागाचे वर्णन असे आहे, 'मग त्याने त्यांच्या मनाच्या कठीणपणामुळे खिन्न होऊन' या दुर्दैवी धार्मिक नेत्यांच्या मनात सुकलेल्या हाताच्या मनुष्याविषयी प्रेम आणि सहानुभूती नसल्या बद्दल येशूला तीव्र दुःख किंवा वेदना अनुभवत होत्या. बायबलमध्ये देवाचा क्रोध व राग विषयी आपण अधिक काय वाचतो?

वास्तविक जी माणसे अनीतीने सत्य दाबून ठेवतात त्यांच्या अभक्तीवर व अनीतीवर देवाचा क्रोध स्वर्गातून प्रकट होतो. (रोम.१:१८)

देवाचा क्रोध कसा प्रकट झाला?

ह्यामुळे ते आपल्या मनाच्या वासनांत असताना देवाने त्यांना अशुद्धतेच्या स्वाधीन केले; असे की, त्यांच्या देहांची त्यांच्यात्यांच्यातच विटंबना व्हावी. (रोम.१:२४)

ह्या कारणांमुळे देवाने त्यांना दुर्वसनांच्या स्वाधीन केले. (रोम.१:२६)

आणखी ज्या अर्थी देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाहीत, त्या अर्थी देवाने त्यांना अनुचित कर्मे करण्यास विपरीत मनाच्या स्वाधीन केले. (रोम.१:२८)

देवाचा क्रोधाची व्याख्या अशी आहे की देव त्यांना सोडून देत आहे किंवा सोडून देईल. दुसऱ्या शब्दांत, देव लोकांना त्याच्या पासून विभक्त होण्याचे स्वातंत्र्य देत आहे. सूड उगवण्याचा क्रोध नक्कीच नाही ज्याचा दोष बऱ्याचदा आम्ही देवावर लावतो. चला आपण जुन्या करारामधील अजून काही शास्त्रे पाहूयात.

लोकांनी उठून तो सगळा दिवस, सगळी रात्र, दुसराही सगळा दिवस ते लावे गोळा केले; ज्याने सर्वांत कमी गोळा केले त्याचे दहा होमर भरले; आणि त्यांनी ते स्वतःसाठी छावणीच्या चारही बाजूंना पसरून ठेवले. ते मांस त्यांच्या तोंडात पडते न पडते, तोच परमेश्वराचा क्रोध त्यांच्यावर भडकला व त्याने भयंकर पटकीने त्यांचा संहार केला. त्या स्थळाचे नाव किब्रोथ-हत्तव्वा असे पडले, कारण ज्या (गणना११:३२-३३)

आम्ही देवाने रागाच्या भरात दिलेल्या लावे पक्षींच्या खात्यावर परतलो. लोकांच्या खादाडपणाचा एक नैसर्गिक परिणाम झाला: परमेश्वराचा क्रोध त्यांच्यावर भडकला व त्याने भयंकर पटकीने त्यांचा संहार केला.

हे लक्षात घेण्यासारखे आहे की इस्राएली लोक जेथे तळ देऊन होते, त्या वाळवंटतात खूप सारे जे लावे पक्षी पाठवले गेले होते ते जास्त काळ वाळवंटातील उष्णतेमुळे टिकणार नव्हते. त्याचे मांस लवकरच खराब होणार होते आणि मानवी वापरासाठी अयोग्य होणार होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, कोणत्या प्रकारचा रोग उद्भवला असेल? योग्य सूक्ष्मजंतू आणि योग्य परिस्थिती दिल्यास, अन्न विषबाधा हा एक प्राणघातक रोग उद्भवेल.

या प्रकारे “तो त्या जागेचे नाव किब्रोथहट्टाव (वासनेची कबर असे ठेवतो. कारण तेथे अशी लोक पुरले आहेत जे वासानाधीन झाले होते. “ (व ३४). परमेश्वराचा क्रोध काय होता? हे यथोचितपणे त्याचे अनुसरण करत नाही का? देवाचा क्रोध म्हणजे होणाऱ्या कुठल्याही परिणामात त्याने हस्तक्षेप न करणे होय हे ठरवणे योग्य नाही का?

त्या समयी त्यांच्यावर माझा कोप भडकेल, मी त्यांचा त्याग करीन आणि त्यांच्यापासून आपले मुख लपवीन; त्यांचा फडशा उडेल व त्यांच्यावर पुष्कळ विपत्ती व संकटे ओढवतील. मग ते म्हणतील, आपला देव आपल्यामध्ये नाही म्हणूनच ह्या विपत्ती आपल्यावर ओढवल्या आहेत ना? त्या वेळेस ते अन्य देवांकडे वळल्याने त्यांच्या हातून जी दुष्टाई घडेल तिच्यामुळे मी आपले मुख त्यांच्यापासून खरोखरच लपवीन. (अनु.३१:१७-१८)

जेव्हा देव आपला चेहरा लपवितो तेव्हा त्याचा काय अर्थ होतो? आपला देव आपल्यामध्ये नाही म्हणूनच ह्या विपत्ती आपल्यावर ओढवल्या आहेत ना? हि पुन्हा एक अशी भाषा आहे जी देवाच्या हस्तक्षेप न करण्याच्या प्रवृत्तीचे वर्णन करते. देव का असे म्हणाला मी आपले मुख लपवीन? त्या वेळेस ते अन्य देवांकडे वळल्याने त्यांच्या हातून जी दुष्टाई घडेल तिच्यामुळे मी आपले मुख त्यांच्यापासून खरोखरच लपवीन. आणि याचा परिणाम काय होईल? त्यांचा नाश होईल, आणि त्यांच्यावर अनेक संकटे येतील. जेव्हा लोक इतर दैवतांकडे वळले त्यांनी खऱ्या देवाकडे पाठ फिरविली, आणि तो त्यांना होणाऱ्या परिणामापासून वाचवू शकला नाही.

इस्राएल लोक परमेश्वराच्या दृष्टीने वाईट ते करून बआल देवांची सेवा करू लागले. आपल्या पूर्वजांचा देव जो परमेश्वर, ज्याने त्यांना मिसर देशातून बाहेर आणले त्याचा त्यांनी त्याग केला व ते अन्य देवांच्या म्हणजे सभोवतालच्या राष्ट्रांतील देवांच्या नादी लागून त्यांच्या चरणी लागले आणि तेणेकरून त्यांनी परमेश्वराला चीड आणली. परमेश्वराचा त्याग करून त्यांनी बआल व अष्टारोथ ह्यांची सेवा केली; म्हणून इस्राएलावर परमेश्वराचा कोप भडकला; त्याने त्यांना लुटारूंच्या हाती दिले आणि लुटारूंनी त्यांना लुटले. परमेश्वराने त्यांना त्यांच्या सभोवतालच्या शत्रूंच्या हवाली केले; म्हणून त्यांचा आपल्या शत्रूंसमोर टिकाव लागेना. (शास्ते २:११-१४)

या शास्त्रवचनांमध्ये देवाविरुद्ध लोकांच्या सततच्या धर्मत्यागाचे वर्णन केले आहे. येथे देवाने त्यांना लुटारूंच्या हाती दिले आणि लुटारूंनी त्यांना लुटले. परमेश्वराने त्यांना त्यांच्या सभोवतालच्या शत्रूंच्या हवाली केले' हा पुन्हा संकटाला एकनिष्क्रिय प्रतिसाद आहे. त्यांच्या धर्मत्यागामुळे, देव इस्राएलच्या शत्रूंना त्यांच्या भूमीवर आक्रमण करण्यापासून रोखू शकला नाही.

बोरू पाण्यात कापतो त्याप्रमाणे परमेश्वर इस्राएलास हाणून कापवील व जी उत्तम भूमी त्याने त्यांच्या पूर्वजांना दिली होती तिच्यातून त्यांना उपटून काढून नदीपलीकडे त्यांची पांगापांग करील, कारण त्यांनी अशेरा मूर्ती बनवून परमेश्वराला संतप्त केले. यराबामाने जी पातके स्वतः केली व इस्राएलांकडून करवली त्यामुळे परमेश्वर इस्राएलांचा त्याग करील. (१ राजे १४:१५-१६)

येथे देवाचा क्रोध (इस्राएलास हाणून कापवील) धर्मत्यागी इस्राएलला सोडत आहे.

त्यांनी आपल्या उच्च स्थानांमुळे त्याला राग आणला; आपल्या कोरीव मूर्तींमुळे त्याला ईर्ष्या आणली. हे ऐकून देव कोपला आणि इस्राएलास अगदी कंटाळला; त्याने शिलो येथील निवासमंडप म्हणजे मानवामध्ये उभारलेला आपला डेरा सोडून दिला; त्याने आपल्या बलाचा पाडाव होऊ दिला, व आपले वैभव शत्रूच्या हाती पडू दिले. त्याने आपले लोक तलवारीच्या हवाली केले; आपल्या वतनावर तो रुष्ट झाला. (स्तो.७८:५८-६२)

येथे क्रोधाच्या व्याख्येमध्ये ह्या गोष्टी समाविष्ट आहेः त्याग करणे, वितरित करणे आणि बंदिवासात देणे.

त्यामुळे परमेश्वराचा कोप त्याच्या लोकांवर भडकला; त्याला आपल्या वतनाचा वीट आला. त्याने त्यांना राष्ट्रांच्या हाती दिले; त्यांच्या द्वेष्ट्यांनी त्यांच्यावर राज्य केले. (स्तो.१०६:४०-४१)

येथे देवाच्या क्रोधाचे वर्णन "त्यांना इतर राष्ट्रांच्या हातात देणे" असे केले आहे.

रागाच्या आवेशात मी आपले तोंड तुझ्यापासून क्षणभर लपवले; पण मी तुझ्यावर दया करीन, तुझ्यावर मी सर्वकाळ प्रसन्न राहीन असे तुझा उद्धारकर्ता परमेश्वर म्हणतो. (यश.५४:८)

या शास्त्रभागात, "थोडा राग" याची अशी व्याख्या करण्यात आली आहे की देव आपल्या पासून "क्षणभर" त्यांचा चेहरा लपवतो, पण आपल्यावर देवाची दया आणि माया चिरंतन असते.

आणि तुमचे सर्व भाऊबंद, एफ्राइमाचे सर्व संतान ह्यांना घालवून दिले, त्याप्रमाणे मी तुम्हांला माझ्यासमोरून घालवून देईन. परमेश्वर म्हणतो, ते मला संताप का आणतात? का स्वतःला संताप करून घेऊन आपले तोंड काळे करतात? ह्याकरता प्रभू परमेश्वर म्हणतो, पाहा, माझा क्रोध व माझा संताप ह्या स्थळावर, मानवांवर, पशूंवर, शेतातल्या झाडांवर व भूमीच्या उपजावर वर्षेल, तो पेटत राहील, विझणार नाही. (यिर्म.७:१५,१९-२०)

देव विचारतो, ते मला संताप (राग) का आणतात? का स्वतःला संताप करून घेऊन आपले तोंड काळे करतात? लोकांच्या पीडा हे त्यांच्या मुर्तीपुजानाचा परिणाम आहे आणि देवाने केलेली शिक्षा नाही.

हे सीयोनकन्ये, आपला केशकलाप काढून फेकून दे, उजाड डोंगराच्या शिखरांवर विलाप कर, कारण आपल्या क्रोधास पात्र झालेल्या ह्या पिढीस परमेश्वराने धिक्कारले व टाकून दिले आहे. (यिर्म.७:२९, भर जोडला)

पवित्र शास्त्रामध्ये, आणखी अनेक वचने आहेत जे यासारख्या समान शब्द वापरतात. परंतु आपण पाहिलेली ही उदाहरणे आपल्याला हे समजण्यासाठी पुरेशी आहेत की देवाचा क्रोध म्हणजे त्याच्याकडून थेट झालेली शिक्षा नाही. देव आपल्याला त्याचा स्वीकार करण्यास किंवा नाकारण्याचे स्वातंत्र्य देतो. देवाचा क्रोध हा आपल्या चुकीच्या निवडींचा नैसर्गिक परिणाम आहे. जेव्हा आपण शब्द किंवा कृतीत देवाला म्हणतो 'आम्हाला एकटे सोड आणि आमच्या पापी इच्छेनुसार जगू दे', तेव्हा देवाचा क्रोध सक्रिय होतो. देवाची भूमिका नेहमीच निष्क्रीय असते, ज्याला त्याग करणे, चेहरा लपवणे, सोडणे किंवा शत्रूच्या स्वाधीन करणे असे म्हटले जाते.

मोशेसमोरील त्याच्या घोषणेमध्ये, देवाने क्रोधाला किंवा रागाला त्याच्या चारित्र्याच्या गुणधर्मांपैकी एक गुण म्हणून संबोधित केले नाही. परमेश्वराने त्याच्या समोरून जाताना अशी घोषणा केली : “परमेश्वर, परमेश्वर, दयाळू व कृपाळू देव, मंदक्रोध, दयेचा व सत्याचा सागर, हजारो जणांवर दया करणारा, अन्याय, अपराध व पाप ह्यांची क्षमा करणारा, (पण अपराधी जनांची) मुळीच गय न करणारा, असा तो वडिलांच्या दुष्टाईबद्दल पुत्रपौत्रांचा तिसऱ्या व चौथ्या पिढीपर्यंतही समाचार घेतो.“ (निर्गम ३४:६-७)

ते परमेश्वराविरुद्ध व मोशेविरुद्ध असे बोलू लागले की, “तुम्ही आम्हांला मिसर देशातून काढून ह्या रानात मरायला कशाला आणले? येथे तर अन्न नाही व पाणीही नाही, आणि ह्या हलक्या अन्नाला आम्ही कंटाळलो आहोत.“ तेव्हा परमेश्वराने लोकांमध्ये आग्ये साप पाठवले; त्यांच्या दंशाने इस्राएलातील बरेच लोक मेले. (गणना २१:५-६)

हा शास्त्रभाग आपल्याला माहिती देतो की परमेश्वराने लोकांच्या तक्रारी च्या उत्तरात अग्नी सर्प पाठविले. देवाने सापांना पाठवले असे शास्त्रात सांगितले आहे तेव्हा प्रत्यक्षात देवाची कृती काय असावी? त्याने खरोखरच अग्निमय साप पाठवले होते का? लोकांच्या बंडखोर कृताज्ञातेमुळे देवाने केलेल्या संरक्षणात्मक हस्तक्षेपपासून लोकांना मुक्त करण्यास त्याला भाग पडत होते. हे बायबलमधील इतर शास्त्रभागांशी सुसंगत आहे ज्याचे आपण आधी परीक्षण केले आहे.

सर्वात प्रथम म्हणजे तिथे अग्निमय साप कसे आले?

आग्या सापांनी व विंचवांनी व्यापलेल्या घोर व भयानक रानातून आणि रुक्ष व निर्जल भूमीतून त्याने तुला आणले; त्याने तुझ्यासाठी गारेच्या खडकातून पाणी काढले; (अनु.८:१५).

त्या कठोर वाळवंटात अग्निमय सर्प सुरवातीपासूनच एक धोका म्हणून होते, देवाने त्यापासून चमत्कारिकपणे इस्राएल लोकांचे रक्षण केले. अग्निमय सापांऐवजी जर देवाने पृथ्वीच्या उत्तरेला राहणारे भुकेले ध्रुवीय अस्वल पाठवले असते, तर मग त्या बाबतीत आपण असे म्हणू शकलो असतो की देवाने त्यांना थेट शिक्षा केली.

पवित्र शास्त्रामध्ये अनेक नोंदी आहेत ज्यात असे म्हटले आहे की देवाने लोकांचा नाश करण्यासाठी आपत्ती किंवा सैन्य पाठवले. परंतु आता आपण ज्याचा अभ्यास केला आहे त्यावरून आपण वाजवीपणे असा निष्कर्ष काढू शकतो की प्रत्येक बायबलसंबंधी नोंदींमध्ये जिथे देवाला काहीतरी हानीकारक पाठवणारा म्हणून चित्रित केले आहे, त्याचा सरळ अर्थ असा आहे की देव कारणे आणि परिणाम यांच्या घटनांमध्ये फेरफार न करता, ते सर्व होण्यापासून रोखू शकला नाही. मानवी व्यवहारामध्ये फेरफार करणे हा देवाचा उद्देश तर नाहीच आणि तसा त्याचा स्वभावही नाही.

तेव्हा परमेश्वराने आपल्या देशाविषयी ईर्ष्या धरली, तो आपल्या लोकांविषयी कळवळला. परमेश्वराने आपल्या लोकांची विनवणी ऐकून म्हटले :पाहा, मी तुम्हांला धान्य, नवा द्राक्षारस व तेल पाठवून देतो, त्यांनी तुम्ही तृप्त व्हाल; ह्यापुढे राष्ट्रांमध्ये मी तुम्हांला निंदास्पद करणार नाही. (योएल २:१८-१९)

मग माझ्याबरोबर भाषण करणारा दिव्यदूत मला म्हणाला, असे जाहीर कर की, सेनाधीश परमेश्वर म्हणतो, यरुशलेम व सीयोन ह्यांविषयी मी अतिशय ईर्ष्यायुक्त झालो आहे. (जखऱ्या १:१४)

कारण तुमच्याविषयीची माझी आस्था ईश्वरप्रेरित आस्था आहे; मी एका पतीबरोबर तुमचे वाग्दान केले आहे, अशा हेतूने की, तुम्हांला शुद्ध कुमारी असे ख्रिस्ताला सादर करावे. तरी जसे सापाने कपट करून हव्वेला ठकवले, तसे तुमची मने कशाने तरी बिघडून ती ख्रिस्ताविषयीचे सरळपण व शुद्धता ह्यांपासून भ्रष्ट होतील असे मला भय आहे. (२ करिंथ.११:२-३)

देवाची ईर्ष्या पूर्णपणे निःस्वार्थ आहे. देव इतरांसाठी ईर्ष्यावान आहे, स्वतःसाठी कधीही नाही

परमेश्वराचा कोप इस्राएलावर पुनरपि झाला, आणि इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली. त्या वेळी राजाबरोबर सेनापती यवाब होता; त्याला राजाने सांगितले की, दानापासून बैर-शेब्यापर्यंतच्या सर्व इस्राएल वंशांमध्ये फिरून तुम्ही लोकांची मोजदाद करा म्हणजे त्यांची संख्या मला कळेल. यवाब राजाला म्हणाला, आपले लोक कितीही असोत, आपला देव परमेश्वर त्यांना शतगुणित करो आणि माझे स्वामीराजे आपल्या डोळ्यांनी ते पाहोत; पण माझ्या स्वामीराजांना ही हौस का वाटावी? तथापि राजाच्या म्हणण्यापुढे यवाब व सैन्याचे सरदार ह्यांचे काही चालेना, आणि यवाब व सैन्यांचे सरदार राजापुढून इस्राएल लोकांची मोजदाद करण्यासाठी निघून गेले. (२ शमु.२४:१-४)

दावीदाने जेव्हा इस्राएलची संख्या मोजली तेव्हा त्याने इस्राएलचे रक्षण करण्यासाठी मानवीसंख्या आणि सैन्यसामर्थ्याकडे लक्ष देऊन देवावर अविश्वास दाखविला. यामुळे त्यांच्यावरील देवाचे अहिंसक संरक्षण प्रभावीपणे वगळले गेले आणि ते त्याच्या शत्रूंच्या आणि इतर धोक्यांच्या बळी पडले. यवाबा सारख्या योध्यानेही इस्रायलची संख्या करण्याच्या राजाच्या विनंतीत धोका पाहिला आणि त्याने त्या विषयी त्याला प्रश्न सुद्धा विचारले.

"इस्राएल व यहूदा ह्यांची गणती करण्याची प्रेरणा देवाने त्यांच्याविरुद्ध दाविदाला केली." हे बायबलचे वचन जसे वाचले जाते तसे समजून घेतल्यामुळे समजण्यात काही अडचण येऊ शकते का? परमेश्वराने दाविदाच्या कानात कुजबुजून त्याला इस्राएलमध्ये त्याच्याकडे असलेल्या सैनिकांची संख्या मोजायला सांगितली होती का जेणेकरून त्याला त्यांच्याविरुद्ध जाण्याचे योग्य कारण सापडेल? आतापर्यंत आपण जे काही देवाच्या कार्यांबद्दल शिकलो आहोत त्या शिक्षणात या शास्त्रवचनाकडे पाहूया.

देव नाशात सक्रिय भूमिका घेत नाही, आणि तो वाईट गोष्टींची ढवळण देखील करत नाही, परंतु असा कोणीतरी आहे जो हे करतो. सैतानाने दावीदला लोकांची गणना करण्यास प्रवृत्त केले की नाही हे आपल्याला कसे समजेल?

आपण या घटनेबद्दल पहिल्या इतिहासच्या पुस्तकात वाचू शकतो:

नंतर सैतानाने इस्राएलाविरुद्ध उठून इस्राएलाची गणती करायला दाविदाला प्रवृत्त केले. (१ इति २१:१)

आपण विचार करतो कि बायबल अगदीच समजून का येत नाही आणि त्यातील प्रत्येक पानात नक्की काय घडले ते बायबल नीट सांगत का नाही. ह्याने बायबलचा अभ्यास सोपा नाही का होणार? होय, ते होईल. तथापि, देव आणि मानवजात यांच्या दरम्यान संवाद समस्या देवाच्या अज्ञानामुळे कधीच नव्हती, परंतु ती आमच्यामुळे होती. देव त्याच्या ज्ञानामध्ये आणि समजूतदारपणाने आपल्याला त्याच्या बद्दलचे सत्य याची निवड करण्याची मुभा देतो. बायबल हे एक महत्त्वाचे तत्त्व लक्षात घेऊन लिहिले गेले होते. जेव्हा आपल्याला देवाबद्दलचे सत्य समजून घेण्याची संधी मिळते आणि जेव्हा आपण ती नाकारतो, तेव्हा अधिक प्रकाश आपल्याला त्याच्यापासून फक्त दूर नेईल. आपल्या इच्छेविरुद्ध आपल्याला त्याच्यावर आणि त्याच्या प्रेमावर विश्वास ठेवायला लावणे हे देवाच्या स्वभावात नाही. परंतु, जे आपल्या प्रेमळ देवाचा शोध घेतात त्यांच्यासाठी पवित्र शास्त्रामध्ये भरपूर पुरावे दिलेले आहेत.

***तुम्ही मला शरण याल आणि पूर्ण जिवेभावे माझ्या शोधास लागाल, तेव्हा मी तुम्हांला पावेन. (यिर्मया** *२९:१३)*

# 14. देव युद्ध कसे करतो?

देव सत्य, प्रेम, दया आणि क्षमा यासह वाईटाविरुद्ध युद्ध करतो.

पाप करणारा सैतानाचा आहे; कारण सैतान प्रारंभापासून पाप करत आहे. सैतानाची कृत्ये नष्ट करण्यासाठीच देवाचा पुत्र प्रकट झाला. (१ योहान ३:८)

देवाला दोष देणे आणि त्याचे चुकीचे वर्णन करणे, हे सैतानाचे काम त्याच्या बंडाच्या सुरुवातीपासून चालू आहे. आणि तो देवावर खोटे आरोपही लावत आहे.

सैतानाने त्याच्या बंडाच्या सुरुवातीपासूनच देवावर आरोप केले आणि देवाचे चुकीचे वर्णन केले. प्रभू येशूने पापरहित आणि प्रेमळ जीवन जगून सैतानाच्या कार्यांचा नाश केला आणि हे दाखवून दिले की त्याचे देवावरचे आरोप खोटे होते.

तुम्ही माझे बोलणे का समजून घेत नाही? ह्याचे कारण हेच की, तुमच्याने माझे वचन ऐकवत नाही. तुम्ही आपला बाप सैतान ह्यापासून झाला आहात आणि तुमच्या बापाच्या वासनांप्रमाणे करू इच्छिता. तो प्रारंभापासून मनुष्यघातक होता आणि तो सत्यात टिकला नाही; कारण त्याच्यामध्ये सत्य नाही. तो खोटे बोलतो तेव्हा तो स्वतःचे बोलतो; कारण तो लबाड व लबाडीचा बाप आहे. (योहान ८:४३-४४)

येशू सत्य सांगतो की सैतानाचे प्राथमिक शस्त्र त्याचे खोटे बोलणे आहे. 'खोटे बोलणे हे देवाला अशक्य आहे' (इब्री ६:१८); तो सत्याने सैतानाच्या लबाडीचा सामना करतो.

सैतानाच्या डावपेचांपुढे तुम्हांला टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री धारण करा. कारण आपले झगडणे रक्तमांसाबरोबर नव्हे, तर सत्तांबरोबर, अधिकाऱ्यांबरोबर, सध्याच्या काळोखातील जगाच्या अधिपतींबरोबर, आकाशातल्या दुरात्म्यांबरोबर आहे. ह्या कारणास्तव तुम्हांला वाईट दिवसांत प्रतिकार करता यावा व सर्वकाही केल्यावर टिकाव धरता यावा म्हणून देवाची शस्त्रसामग्री घ्या. तर मग आपली कंबर सत्याने कसा; नीतिमत्त्वाचे उरस्त्राण धारण करा; शांतीच्या सुवार्तेने लाभलेली सिद्धता पायी चढवा, आणि ह्या सर्वांबरोबरच जिच्या योगे त्या दुष्टाचे सगळे जळते बाण तुम्हांला विझवता येतील, ती विश्वासाची ढाल हाती घ्या व उभे राहा. तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तलवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या. (इफिस.६:११-१७)




येशूने देवाच्या शत्रसामग्रीचा वापर कसा करावा ते आपल्यासाठी दाखवून दिले आहे: देवासोबत सत्याची सुवार्ता ('म्हणजे आपली कंबर सत्याने कसा'), त्याच्या करारातील विश्वासाची पूर्णता ('म्हणजे नीतिमत्त्वाचे उरस्त्राण धारण करा'), स्वर्गीय पित्यासोबत आमचा समेटाचा संदेश ('म्हणजे शांतीच्या सुवार्तेने लाभलेली सिद्धता पायी चढवा'), देवाच्या विश्वासूपणाचे आश्वासन ('म्हणजे विश्वासाची ढाल हाती घ्या व उभे राहा.') आणि सैतान आणि त्याच्या लबाडीच्या गुलामगिरीतून मुक्त झालेल्यांसाठी अनंतकाळचे जीवनाचे वचन ('म्हणजे तारणाचे शिरस्त्राण'). आम्हाला देखील प्रोत्साहित केले जाते त्याच शस्त्राचा वापर करायला ज्याचा वापर स्वतः प्रभू येशूने केला ते म्हणजे - देवाचे वचन ("म्हणजे आत्म्याची तलवार").

प्रिय जनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या; कारण असा शास्त्रलेख आहे की, सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन, असे प्रभू म्हणतो. उलटपक्षी, तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे; तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे; कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील. वाइटाने जिंकला जाऊ नकोस, तर बऱ्याने वाइटाला जिंक.( रोमकरांस पत्र १२:१९-२१)

देवाचा सूड म्हणजे काय? तो वाईटावर चांगल्या गोष्टींनी मात करतो, आणि आपल्या मुलांनाही असेच करण्यास आमंत्रित करतो. शत्रूंशी सूड घेण्याऐवजी दयाळूपणे वागणे ही त्यांच्या डोक्यावर निखाऱ्यांचा ढीग ठेवण्यासारखी आहे. शत्रूचा सूड घेणे म्हणजे सैतानाकडून आध्यात्मिकरित्या पराभूत होणे होय. आपल्या शत्रूचे चांगले करणे म्हणजे वाईटावर मात करणे होय. हा देवाचा लढाई करण्याचा मार्ग आहे.

तेव्हा येशू म्हणाला, हे बापा, त्यांना क्षमा कर; कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाही. "नंतर त्याची वस्त्रे आपसांत वाटून घेण्यासाठी त्यांनी चिठ्ठ्या टाकल्या." (लूक २३:३४)

येशूचे हे शब्द आपल्या फायद्यासाठी आहेत. क्षमा मिळविण्यासाठी कोणालाही काटेकोरपणे पित्याचे पाठलाग करण्याची गरज नाही. समस्या देवासोबत नाही, तर आमच्या सोबत आहे. आम्हाला वाटते की देव आपल्यासारखा आहे. जेव्हा येशू बोलला “हे पित्या, त्यांना क्षमा कर, कारण ते काय करीत आहेत हे त्यांना माहिती नाही.“ येथे तो फक्त त्याला वधस्तंभावर देणाऱ्यांच्या वतीने बोलत नव्हता तर आमच्या वतीने सुद्धा बोलत होता. देवाची इच्छा आहे कि आपल्याला कळावं  कि तो आपली दुर्दशा समजतो. कधी कधी आपण जे करतो आपल्याला काळत नाही); तो तरीही आमच्यावर बिन शर्त प्रेम करतो आणि आम्हाला वाचवण्यासाठी अथक प्रयत्न करीत असतो.

***आत्म्याच्या द्वारे निष्पन्न होणारे फळ, प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता, इंद्रियदमन हे आहे, अशांविरुद्ध नियमशास्त्र नाही. (गलती ५:२२-२३)***

## 15. सदोम व गमोरा



लोकांचा विचार आहे की सदोम आणि गमोराचा नाश हा देवाच्या क्रोधाच्या उत्कृष्ट उदाहरणांपैकी एक आहे. त्यांना वाटते की देवाने त्याच्या रागात स्वर्गातून आगीचा वर्षाव केला आणि या दोन शहरांचा नाश केला. जेव्हा आपण बायबल वाचतो तेव्हा या दोन शहरांच्या बाबतीत खाली नमूद केल्याप्रमाणे घडलेले दिसते:

या शहरांबद्दल बहुतेक लोक बायबलमध्ये हे वाचतात – ही दोन शहरे समृद्ध शेती आणि व्यापार क्षेत्रामध्ये होते. म्हणून, शहरातील रहिवाशांचे जीवन आरामदायी आणि सोपे होते. लोकांकडे भरपूर मोकळा वेळ आणि पैसा होता. म्हणूनच ह्या शहरात दुष्कर्म करणे सामान्य झाले. मग देव स्वर्गातून खाली पाहतो आणि त्यांच्या दुष्टपणाच्या प्रमाण पाहून त्याला राग येतो. काही काळ तो त्यांच्याविरोधात कोणतीही कारवाई करत नाही. जसजसा काळ गेला तसतसे ते आपल्या अधार्मिक कृतीत अधिक वाईट होत जातात. त्यामुळे देवाचा संयम संपतो. त्यानंतर तो नीतिमान लोट आणि त्याच्या कुटुंबाला सदोम सोडण्याची आज्ञा देतो. यानंतर देव गधंरसाचा त्याच्या क्रोधाने त्यांच्यावर आकाशातून अग्नीचा वर्षाव पाडतो. पुरुष, स्त्रिया आणि मुले एक भयानक मृत्यू मरतात. सदोम आणि गमोरा यांचा नाश होतो, आणि देवाला त्याने घेतलेल्या सूडात समाधान वाटते.

आता देव नाशात सक्रिय भूमिका घेत नाही हे लक्षात ठेवून आपण त्याच घटनेकडे सखोल दृष्टीने पाहुयात. कृपया कल्पना करा हे दोन शहरांचे स्वार्थी रहिवासी त्यांच्या समृद्धीचा आणि वेळेचा आनंद घेत आहेत:

पाहा, तुझी बहीण सदोम हिचे पाप येणेप्रमाणे होते: गर्व, अन्नाची विपुलता व ऐषआराम ही तिला व तिच्या कन्यांना होती; दरिद्री व गरजवंत ह्यांना तिने हात दिला नाही. (यहेज्केल १६:४९).

लोकांना माहिती नव्हते की त्यांच्या शहरांच्या खाली नैसर्गिकरित्या स्फोटके तयार होत होते (कृपया उत्पत्ति १४:१० वाचा). याचा अर्थ सदोम आणि गमोरा अंतर्गत ज्वालामुखीच्या आगी होत्या. त्यांना हे देखील माहित नव्हते कि अदृश देव, ज्याला ते नाकारत होते, हा तोच देव आहे जो आत्तापर्यंत सगळ्या संकटांपासून आणि या आपत्तीतून त्यांचे रक्षण करत होता. तथापि, शेवटी तो दिवस आला जेव्हा देवाला त्याच्यापासून स्वतंत्र होण्याची त्यांची इच्छा मान्य करावी लागली. त्यांचे स्वातंत्र्य टिकवून ठेवण्यासाठी, तो त्याची इच्छा नसतानाही त्यांना निसर्गाच्या विध्वंसक शक्तींपुढे असुरक्षित सोडतो जे आतापर्यंत त्याच्या नियंत्रणात होते.

पृथ्वीच्या पृष्ठभागाखालील ज्वालामुखी वरच्या दिशेने फुटले आणि वितळलेले खडक आकाशात हजारो फूट उंच फेकले. यामुळे स्वर्गातून देवाने आगीचा वर्षाव केला असा भ्रम निर्माण झाला आणि काही मिनिटातच सदोम आणि गमोरा नाश पावतात (कृपया उत्पत्ति १९:२४ पहा).

या दोन शहरांचा नाश करण्यामागे देवाचे कृत्य मूळ रहिवाशांना खरे स्वातंत्र्य देण्याचे होते. यासहीत आपत्तीजनक परिणामांसह स्वातंत्र्याची निवड दिली होती.

आकाश व पृथ्वी ह्यांना तुझ्याविरुद्ध साक्षीला ठेवून मी आज सांगतो की, जीवन व मरण आणि आशीर्वाद व शाप मी तुझ्यापुढे ठेवले आहेत; म्हणून तू जीवन निवडून घे म्हणजे तू व तुझी संतती जिवंत राहील. आपला देव परमेश्वर ह्याच्यावर प्रीती कर, त्याची वाणी ऐक व त्याला धरून राहा, कारण त्यातच तुझे जीवन आहे व त्यामुळेच तू दीर्घायू होशील; तसे केलेस तर तुझे पूर्वज अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांना जो देश देण्याची परमेश्वराने त्यांच्याशी शपथ वाहिली होती त्यात तुझी वस्ती होईल. (अनु.३०:१९-२०)

आजारपण, अपघात, मृत्यू, युद्धे, नैसर्गिक आपत्ती इ. पुढे अनेक कारणास्तव उद्भवतात. बऱ्याचदा आपण थेट जबाबदार असतो आणि कधीकधी सैतान जबाबदार असतो. कधीकधी नैसर्गिक शक्ती ह्या साठी जबाबदार असतात. बऱ्याचदा काही संयोजन योगदान देणारे घटक यात सामील असतात. कारण आपण स्पष्टपणे पाहू शकत नाही कि का एखादी दु:ख देणारी विशिष्ट घटना घडली. आपण यासाठी देवाला दोष देण्यास प्रवृत्त होतो, हे योग्य आहे का? हे वाजवी आहे का? दोषारोप लावण्याची आमची प्रवृत्ती बऱ्याच काळापासून आहे. आणि हे दोषारोप लावणे, जबाबदारी न घेण्याची प्रवृत्ती कधी व कोठे सुरू झाली?

आदाम म्हणाला, आदाम म्हणाला, जी स्त्री तू मला सोबतीला दिलीस तिने त्या झाडाचे फळ मला दिले आणि ते मी खाल्ले. परमेश्वर देव त्या स्त्रीला म्हणाला, हे तू काय केलेस? स्त्री म्हणाली, सर्पाने मला भुरळ घातली म्हणून मी ते खाल्ले. (उत्प.३:१२-१३,)

***परमेश्वरा, तुझे खरे प्रेम आकाशापेक्षाही उत्तुंग आहे. तुझी इमानदारी ढगांपेक्षा उंच आहे. परमेश्वरा तुझा चांगुलपणा सर्वात उंचपर्वतापेक्षाही उंच आहे तुझा न्यायीपणा सर्वात खोल, समुद्रापेक्षाही खोल आहे. परमेश्वरा तू मनुष्याला आणि प्राण्यांना वाचवतोस. तुझा प्रेमळ दयाळूपणा सगळ्यांत किंमती आहे. माणसे आणि देवदूत तुझ्याकडे संरक्षणासाठी येतात. - स्तोत्र ३६:०५-०७***

## 16. नोहाच्या काळातील पूर बद्दल तुमचे काय मत आहे?

नोहाच्या दिवसातील महाप्रलयाचे काय? देव विध्वंसक नाही, तर जगातील सर्वात मोठा प्रलय कसा काय घडून आला? बायबलमध्ये व अन्यत्र आपल्याला कोणते पुरावे सापडतात जे ह्या जगभर झालेल्या महाप्रलयाचे स्पष्टीकरण देतात?

तेव्हा परमेश्वर म्हणाला, मनुष्य भ्रांत झाल्यामुळे माझ्या आत्म्याची त्याच्या ठायी सर्वकाळ सत्ता राहणार नाही; तो देहधारी आहे; तथापि मी त्याला एकशे वीस वर्षांचा काळ देईन. (उत्प.६:३)

देव वेळेच्या बऱ्याच पुढे पाहत होता जेव्हा मानवजातीने स्वतःला त्याच्यापासून इतके दूर केले की त्याला त्याच्या नैसर्गिक शक्तीवरील पकड सैल करून त्यांना त्यांच्या मार्गावर जाऊ देण्यास भाग पाडले. आम्हाला आश्चर्य वाटते की शेवटी कशामुळे देवाने त्यांना जाऊ दिले? असे करण्याचा देवाने हा निर्णय जाणूनबुजून घेतला का, कि ह्यामध्ये कोणती दुसरी घटना कार्यरत होती?

कल्पना करा कि तुमचा एक शेजारी आहे ज्याला खूप सारे व्यक्तिगत समस्या आहेत. त्याला आर्थिक अडचणी आहेत, शारीरिक समस्या आहेत आणि तो त्याच्या घरापासून काही अंतरापेक्षा जास्त पुढे चालू शकत नाही. त्याच्याकडे स्वतःची गाडी नाही, यामुळे त्याला काम चालवणे व गरजा भागवणे खूप अवघड झाले आहे.

एक दिवस, त्याच्याशी संभाषणात, तुम्हाला त्याच्या कमतरतेबद्दल समजते आणि तुम्ही त्याला मदत म्हणून किराणादुकान व इतर ठिकाणी घेऊन जाण्याचा प्रस्ताव त्याला सांगतात. पुढील काही महिन्यांत, तुम्ही त्याला आपल्या गाडी मध्ये डॉक्टर, औषधाचे दुकान आणि बाजारात घेऊन जातात. ही व्यवस्था योग्य प्रकारे कार्यरत असल्याचे दिसते आणि तुम्ही त्याला मदत केल्याबद्दल तुम्हाला आनंद होतो. मग एका उबदार उन्हाळ्याच्या दिवसात हाच शेजारी मनाची चिडचिड झालेल्या चेहेऱ्यासह तुम्हाला तुमच्या दाराच्या चौकटीत दिसतो आणि त्याला शहरातील एका बँकेत घेऊन जाण्यास सांगतो. आणि तुम्हाला हे लक्षात येते कि त्याच्याकडे एक कागदी पिशवी, मास्क आणि मोज्यात गुंढाळलेली बंदूक आहे. तुम्ही काय कराल? तुम्ही लगेच आनंदाने गाडीची चावी घ्याल आणि तुमच्या मित्राला त्याच्या इच्छित ठिकाणी सोडाल आणि परत घेऊन याल काय?

आम्हा सगळ्यांना काही मर्यादेच्या सीमा आहेत ज्या पार करून जाण्याची आम्हास इच्छा नसते. या सीमा मर्यादा नैतिक आणि वैयक्तिक प्रकरणाशी संबंधित असतात. ह्यावर विश्वास ठेवणे देखील योग्य आहे कि देवाच्या सुद्धा काही मर्यादा आहेत आणि तो त्या ओलांडत नाही किवा ओलांडू शकत नाही? पृथ्वीवर मानवांची दुष्टाई फार आहे, त्यांच्या मनात येणाऱ्या विचारांच्या सर्व कल्पना केवळ एकसारख्या वाईट असतात असे परमेश्वराने पाहिले;

त्या काळी देवाच्या दृष्टीने पृथ्वी भ्रष्ट झाली होती; ती जाचजुलमांनी भरली होती. देवाने पृथ्वीकडे अवलोकन केले तर पाहा, ती भ्रष्ट होती; कारण पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्रांनी आपली चालचलणूक बिघडवली होती. मग देव नोहाला म्हणाला, सर्व प्राण्यांचा अंत करण्याचे माझ्या मनात आले आहे, कारण त्यांच्यामुळे पृथ्वीवर जाचजुलूम माजला आहे. पाहा, मी पृथ्वीसह त्यांचा नाश करीन. (उत्पत्ती.६:५,११-१३)

पूर येण्यापूर्वी पृथ्वीची परिस्थिती कशी होती? देवाने नोहाला सांगितले, पृथ्वी त्यांच्याद्वारे हिंसाचारांनी भरली होती (वचन १३). मानवजातीच्या हिंसेमुळे पृथ्वी स्वतःच हिंसा साठवून ठेवत होती. लवकरच येणाऱ्या विलक्षण आणि असाधारण हिंसक गोष्टी मुक्त केले जाणार होते. मानवी समाजाचे नैतिक पतन झाले होते: आणि देवाने पृथ्वीकडे पाहिले आणि बघितले की ती अपवित्र झाली आहे. कारण सगळ्या देहांनी पृथ्वीवर त्याचा मार्ग भ्रष्ट केला होता.

इतिहासातील या अंधकारमय समयी देवाकडे किती विश्वासू अनुयायी होते? एकट्या नोहाचा उल्लेख बायबलमध्ये केलेला आहे. ही वाईट परिस्थिती कशामुळे घडली? मानवजातीचे विचार सदैव फक्त दुष्टच होते, पवित्रशास्त्र वाईटाला कसे व्याख्यांकीत करते? जेव्हा आदाम आणि हव्वेने बऱ्या व वाईटाच्या ज्ञानाच्या झाडाचे फळ खाल्ले (उत्पत्ती २:१७), त्यांचे परमेश्वराच्या चांगुलपणा बद्दलचे मत बदलणे म्हणजे वाईट याला स्पष्टपणे व्याख्यांकीत करते. **आमच्या पहिल्या पालकांनी विकृत केलेले आपल्या सभ्य देवाचे चित्र जगाला वारसा म्हणून मिळाले**. अगदी जुनाट हिंसक रहिवाश्यांनी अशी कल्पना केली की देवाने त्यांची हिंसा माफ केली. देवाची प्रतिक्रिया काय होती? त्याच्या चित्ताला खेद झाला. (उत्पत्ती ६:६).

मनुष्याने देवाच्या सहनशीलतेचा फायदा घेऊन अनैतिकतेची सीमा ओलांडली. याने देवाला त्याची नैसर्गिक जगावरील पकड सैल करण्यास भाग पाडले. जेव्हा १२० -वर्षांचा कालावधी संपला होता, आणि प्रवासी सुरक्षितपणे तारवात होते, तेव्हा पाऊस कोसळू लागला, चाळीस दिवस आणि चाळीस रात्री मुसळधार पाऊस पाडत होता. कशामुळे ह्या महापुराला चालना मिळाली? उत्पत्तीच्या पहिल्या अध्यायात आम्हाला महत्त्वपूर्ण संकेत सापडतात:

मग देव बोलला, जलांच्या मध्यभागी अंतराळ होवो, व ते जलांना दुभागणारे होवो. असे देवाने अंतराळ केले आणि अंतराळाखालच्या व वरच्या जलांना वेगळे केले; आणि तसे झाले. देवाने अंतराळाला आकाश म्हटले; आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा दुसरा दिवस. (उत्पत्ति १:६-८)

अंतराळ म्हणजे काय? अंतराळ म्हणजे विस्तारित जागा किंवा आकाशाचा घुमट. घुमट म्हणजे पृथ्वीवरील आच्छादन होय जे स्वर्गात किंवा वातावरणात लटकवलेले आहे. या शास्त्रभागातआकाशाचा घुमटचे वर्णन पाण्याला वेगळे करणारे म्हणून केला आहे, ज्यातआकाशाचा घुमटाच्या  वर अधिक प्रमाणात पाणी होते.

वातावरणातील पाण्याच्या वाफेच्या विशाल अच्छादनामुळे संपूर्ण जगाला एका विशाल हरितगृहा सारखे वेढले गेले होते. जे आपल्या जगाला उत्तर ध्रुवापासून दक्षिण धृवापर्यंत समान आणि सौम्य उष्णकटीबंधनिय वातावरण देत होते. उष्ण हवामानातील वनस्पती आणि प्राणी यांचे जीवाष्म अवशेष ध्रुवीय प्रदेशात आढळलेले आहेत की आपल्या हवामानात असे वातावरण एकदा अस्तित्वात होते याचा पुरावा दिला जातो. त्या काळातील पृथ्वीवरील हवामानाबद्दल पवित्र शास्त्र आणखी एक महत्वाचा संकेत देते:

आकाश व पृथ्वी ह्यांची परमेश्वर१ देवाने उत्पत्ती केली, तेव्हाचा उत्पत्तिक्रम हा होय. परमेश्वर देवाने आकाश व पृथ्वी ही केली तेव्हा शेतातले कोणतेही उत्पादन पृथ्वीवर नव्हते आणि शेतातली कोणतीही वनस्पती अद्याप उगवली नव्हती,

कारण परमेश्वर देवाने अजून पृथ्वीवर पाऊस पाडला नव्हता, आणि जमिनीची मशागत करायला कोणी मनुष्य नव्हता; मात्र पृथ्वीवरून धुके वर जात असे व त्याने जमिनीच्या सर्व पृष्ठभागावर सिंचन होत असे. (उत्पत्ति २:४-६)

हि पवित्र शास्त्रातील वचने एका अगदी वेगळ्या जगाबद्दल सूचित करत आहे जे आज आपण परिचित असलेल्या जगा पेक्षा खूप वेगळे आहे. परमेश्वर देवाने पृथ्वीवर पाऊस नाही पाडला, परंतु पृथ्वीवरुन एक धुके गेले आणि जमिनीचा संपूर्ण चेहरा ओला झाला.' पृथ्वीवर तथापि उबदार आणि अपवादात्मक सम वातावरण होते, ज्यात अचानक तापमानात बदल होत नव्हते. अशा सम तापमानामुळे मेघगर्जना, वादळ, चक्रीवादळ, गारा किंवा हिमवर्षाव आणि पाऊस देखील पडत नव्हता. पृथ्वीचा पृष्ठभाग स्वतः आजच्या पेक्षा खूपच जास्त सपाट होता, ज्यावर उंच डोंगर किंवा खोल समुद्रात खिंड किंव्हा मोठी दरी नव्हती. याव्यतिरिक्त, पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या अगदी कमी भाग पाण्याने व्यापलेला होता.

कशामुळे आकाशातील वातावरणात सर्व पाणी धरून होते, आणि कोणती यंत्रणा होती जिने महापूर सुरु होण्यास चालना दिली? निरीक्षणावरून आम्हाला हे समजते कि उष्णतेमुळे पाण्याचे वाफ होऊन ते वर जाते. जसे गरम केलेल्या भांड्यातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन वाफेचे रूपांतर पाण्यात होते. आपल्या ग्रहावरील पाण्याचे भाग दररोज मोठ्या प्रमाणात पाण्याचे रेणू सोडतात. जेवढी जास्त उष्णता मिळते तेवढे जलद रेणू सुटतात. हिवाळ्यात गोठलेल्या तलावाच्या पृष्ठभागावरून कमी रेणू सुटतात त्याच तुलनेत उन्हाळ्याच्या दिवसात जास्त बाष्पीभवन होते आणि जास्त प्रमाणात रेणू सुटतात.



महापूर होण्याच्या आधी अधिक जास्त उष्ण उर्जा उपलब्ध असल्यास काय झाले असते? त्यामुळे वातावरणात अधिक पाणी जमा झाले नसते का? आपली पृथ्वी तिला मिळणारी अक्षरशः सर्व उष्ण उर्जा सूर्यापासून घेते. त्याशिवाय आपले जग अगदी गोठलेले झाले असते आणि पृष्ठभागाचे तापमान परिपूर्ण शून्य जवळ असते.

जेव्हा देवाने आपले जग निर्माण केले तेव्हा त्याने वातावरणात मोठ्या प्रमाणात पाण्याचे निलंबन करण्यास सक्षम अशी आश्चर्यकारक व अचूक उष्णता-उर्जा प्रणाली कार्याला लावली. सूर्य या योजनेच्या कारभारामध्ये एक महत्वाचा भाग राहिला आहे. ह्यावर विश्वास ठेवणे वाजवी होईल कि आजच्या पेक्षा, महापूर येण्याआधी सूर्य अधिक जास्त उर्जा बाहेर सोडत असे. जर हे सत्य असेल तर यावर विश्वास ठेवणे योग्य आहे की जेव्हा देव नैसर्गिक जगावरील त्याच्या ताब्याची पकड सैल करण्यास प्रवृत्त होतो, तेव्हा सूर्याच्या उर्जा उत्पादनावर सुद्धा याचा परिणाम झालेला दिसतो.

वातावरणातील नाजूक समतोल बिघडला आणि नोहाच्या आयुष्याच्या सहशेव्या वर्षात, दुसऱ्या महिन्यात, आणि महिन्याचा सतराव्या दिवशी, जलाचे  सर्व झरे फुटले गेले आणि आकाशीदारे मोकळी झाली. तेंव्हा चाळीस दिवस व चाळीस रात्री पृथ्वीवर पाऊस पडला. (उत्पत्ति: ७:११-१२). इतिहासातील पहिल्या पावसाच्या थेंब खाली पडण्याची हि नोंद होती, अखेरीस हजारो क्यूबिक मैल पाणी खाली पृथ्वीवर ओतले गेले.

भौगोलिक अस्थिरता वातावरणातील अस्थिरतेशी भिडली आणि भूमिगत जलाशयामध्ये पाण्याच्या दाबाचे प्रमाण वाढले: त्याच दिवशी खोल गेलेले कारंजे फुटले (उत्पत्ति. ७:११). पुराचे पाणी वाढविण्यात या 'कारंज्याचे' बरेच योगदान होते.

नोहा आणि त्याचे कुटुंब हे तारवातले आठ लोकच पूरातून वाचले: पुरानंतर जगाच्या पुनर्स्थापनेच्या उद्देशाने असंख्य प्राण्यांच्या प्रजाती देखील त्या भव्य जहाजात होत्या.

पूर्वेकडील तुर्कीच्या जहाजाच्या जागेला समर्पित केलेल्या राष्ट्रीय उद्यानात जहाजाचे जीवाश्म अवशेष जतन केलेले आहेत, डोगुबायझिटच्या छोट्या शहराजवळ. हा विलक्षण पुरातत्व शोध, अरारात पर्वतांमध्ये, एक आकर्षक पुरावा आहे हे सांगण्यासाठी कि पवित्र शास्त्रामधील महापूर ही केवळ एक दंतकथा नाही, परंतु जगभरातील नैसर्गिक अप्पातींचा एक इतिहास आहे.

***पृथ्वीवरचे पाणी एकसारखे हटत गेले; दीडशे दिवस संपल्यावर पाणी ओसरत गेले. सातव्या महिन्याच्या सतराव्या दिवशी अरारात पर्वतावर तारू टेकले. (उत्पत्ती ८:३-४)***

# 17. येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाची साक्ष




जुन्या करारातील देवाच्या कृतींबद्दल अचूक समज घेत असतांना आम्हाला एका गोष्टीची नक्कीच खात्री आहे कि परमेश्वर हा कुठल्याही परिस्थितीत नाश करत नाही. तथापि, परमेश्वर खरोखर पापी मनुष्याजवळ त्याचा नाश करण्यासाठी मुळीच येत नाही याचा आकर्षक पुरावा नवीन करारात आपल्याला सापडतो.

येशू आपल्यासाठी वधस्तंभावर मरण पावला हा विश्वास जवळजवळ सर्व पवित्र शात्राच्या विद्यार्थ्यांमध्ये आहे, तरीही येशूच्या मृत्यूने आम्हाला कसे वाचवले याविषयी भिन्न मते आहेत. तथापि, बहुतेक विश्वास ठेवतात की जेव्हा येशू वधस्तंभावर मरण पावला, तेव्हा येशूने आमच्या नशिबी असलेले मरण सोसले.

जर हे सत्य असेल, तर येशू मरण पावला आणि त्याच प्रकारे आपण मरणार या संबंधात देव कसा मृत्यु आणतो हे शोधण्याचा आपण प्रयत्न करूयात. जर आपण असा विश्वास धरु कि हा तोच देव आहे जो पाप्याला नष्ट करतो, मग आम्ही हे देखील अपेक्षा करू शकतो की देव पिता येशू जवळ त्याला ठार मारण्यासाठी आला. शोध घेतल्या नंतर हीच गोष्ट आपल्याला सापडते का? मत्तयचे शुभवर्तमान ख्रिस्ताच्या वधस्तंभाविषयी तपशीलवार माहिती देते. येशूच्या मृत्यूच्या काही क्षण आधीचे शेवटचे शब्द कोणते होते? 'माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?' (मत्त.२७:४६).

या वचनात येशू कसा मरण पावला हे समजते. देव पिता त्याच्या पुत्राला परवानगी देतो की प्रत्येकजण त्याच्या प्रेमास नकार दिल्यानंतर शेवटी काय अनुभवतो तोच अनुभव तू घे म्हणून, आणि तो म्हणजे - त्याच्यापासून म्हणजेच जीवन देणाऱ्या देवापासून वेगळे होणे. जीवन देणाऱ्या देवपित्याने येशूला ठार मारले का? मुळीच नाही, तर आपल्या पापामुळे हे घडले: 'पापाचे वेतन म्हणजे मृत्यू होय. (रोम.६:२३). पाप पूर्णपणे सक्षम आहे देवाची मदत न घेता स्वत: मृत्यूला कार्यरत ठरण्यासाठी. सृष्टीतील सर्व जीवन देवाकडून आहे याला अपवाद नाही. पापाचा परिणाम हा मृत्यू आहे याला अपवाद नाही. देव मृत्यूचा स्त्रोत आहे याची कल्पना करणे हे चुकीचे आहे याला देखील अपवाद नाही.

या छोट्या शास्त्रभागात प्रत्येक नाश आणि दु:खाचा हिशोब जो देवाला जबाबदार ठरवतो ते तपासणी करणे शक्य नाही. तथापि, बायबलमधील मृत्यू आणि आपत्तींमध्ये देवाची भूमिका समजून घेण्याची आम्ही तपासलेले परिच्छेद हे अचूकतेची गुरुकिल्ली आहेत. पवित्रशास्त्रातील वचने हेच पवित्रशास्त्राचा अर्थ स्पष्ट करतात. जेव्हा शास्त्र देवाच्या काय कृती आहेत हे स्पष्ट करण्यासाठी एका विशिष्ट परिच्छेदाचा पडदा मागे खेचते, त्याचा वापर आपण इतर परिच्छेद समजून घेण्यासाठी एक गुरुकिल्ली म्हणून करू शकतो. (जसे पवित्रशास्त्रातील दोन परिच्छेद एकमेकांना परस्परविरोधी असल्यासारखे वाटतात). या व्यतिरिक्त, स्वतःविषयी देवाचे शब्द हे विशेष विचार करण्यायोग्य आहेत, उदाहरणार्थ: मी परमेश्वर आहे, मी बदलत नाही (मलाखी.३:६) शेवटी, देवाबद्दलचे सत्य, जे येशूने शिकवले आणि जगून दाखवले, हे उत्पत्ति पासून प्रकटीकरणापर्यंत संपूर्ण पवित्रशास्त्र मार्गक्रमित करण्याचा एक अचूक नकाशा आहे.

***ख्रिस्ताने तुमच्या अंतःकरणामध्ये तुमच्या विश्वासाच्या द्वारे वस्ती करावी; ह्यासाठी की, तुम्ही प्रीतीत मुळावलेले व पाया घातलेले असे असून, तिची रुंदी, लांबी, उंची व खोली किती, हे तुम्ही सर्व पवित्र जनांसह समजून घेण्यास व बुद्धीस अगम्य अशी ख्रिस्ताची प्रीती ओळखून घेण्यास शक्तिमान व्हावे; असे की तुम्ही देवाच्या सर्व पूर्णतेइतके परिपूर्ण व्हावे. (इफिस; ३:१७-१९***

# 18. देव अत्याचारी नाही

अनंतकाळ जळणारे नरकच्या शिकवणुकीशी संपर्कात आलेल्या प्रत्येकासाठी एक आश्चर्यकारक बातमी आहे. या शिकवणीला पवित्र शास्त्राचे समर्थन नाही. पवित्र शास्त्रात मृत्यूचे वर्णन बेशुद्ध अवस्थेत असणे असे केले आहे. ही फक्त एक तात्पुरती झोप आहे जी केवळ पुनरुत्थान होईपर्यंत टिकेल. त्या काळा नंतर, ज्यांनी देवाशी समेट करण्यास विरोध केला आहे ते सर्व नैसर्गिकरिते अनंतकाळासाठी अस्तित्वात नसण्याचे परिणाम भोगतील.

पवित्र शास्त्रामध्ये सतत जळणाऱ्या यातनाच्या जागेबद्दल आधार शोधण्यासाठी, आपण प्रतिकात्मक शब्दांचे अर्थ समजले पाहिजे. अग्नी ह्या शब्दाला एकतर शाब्दिक किंवा प्रतीकात्मक अर्थ असू शकतो. दानियलाच्या पुस्तकात, जेव्हा नबुखदनेस्सरने शद्रख, मेशख व अबेद्नगो यांना अग्निच्या भट्टीमध्ये फेकले, अर्थातच ती त्यांनी अनुभवलेली खरोखर आग होती. जेव्हा योहान बाप्तिस्मा करणारा, जो पाण्याने बाप्तिस्मा करायचा, म्हणाला की ख्रिस्त पवित्र आत्म्याने व अग्नीने बाप्तिस्मा देईल, तर तो, प्रतीकात्मक अग्नी या शब्दाचा वापर करत होता.

कारण आपला देव भस्म करणारा अग्नी आहे. आणि "देव प्रेम आहे" (इब्री१२:२९ , १ योहान ४:१६). देवाबद्दलची ही दोन निश्चित विधाने परस्परविरोधी आहेत का? केवळ तेव्हा, जेव्हा आपण अग्नीचा विचार शाब्दिक अग्नी असा करू. आग ही एक रासायनिक प्रतिक्रिया आहे. देव एक रासायनिक प्रतिक्रिया आहे का? देवाच्या प्रेमाचा एखाद्या व्यक्तीवर काय परिणाम होतो हे समजून घेतल्यास ही विधाने अचूक सुसंवाद साधतात. देवाचे प्रेम स्वार्थीपणास ग्रहण करून टाकते. स्वार्थ म्हणजे अस्सल प्रेमाच्या विरुद्ध आहे. जर आपण देवाचे प्रेम स्वीकारण्यास तयार आहोत, तर तेच प्रेम आपल्यात येईल आणि आमच्या अंतःकरणात असणारे प्राणघातक स्वार्थ मिटून टाकेल. हा एक जीवन देणारा अनुभव आहे.

जर आपण देवाच्या प्रेमाचा प्रतिकार केला, आणि त्याऐवजी आमच्या स्वतःच्याच स्वार्थाला धरून राहिलो, तर तेच प्रेम दुःखाचा एक स्रोत असेल, आणि आम्ही देवापासून दूर जाण्याचा प्रयत्न करू आणि पळू किंवा देवापासून लपून राहू. आदाम आणि हव्वेचा असाच अनुभव होता जेव्हा त्यांनी देवाबद्दल सर्पाच्या खोट्या गोष्टीवर विश्वास ठेवला. अशा प्रकारे समजून घेतल्यामुळे आपण हे पाहू शकतो कि देवाचे प्रेम हे भस्म करणारी अग्नी आहे.

येशूने शिकवलेले श्रीमंत मनुष्य आणि गरीब लाजर याचा दृष्टांत कधीकधी अनंतकाळ जळणाऱ्या नरकच्या शिकवणीला समर्थन करण्यासाठी वापरला जातो.

कोणीएक श्रीमंत मनुष्य होता; तो जांभळी व तलम वस्त्रे घालत असे, आणि दररोज थाटामाटाने ख्यालीखुशाली करत असे. त्याच्या दरवाजाजवळ फोडांनी भरलेला लाजर नावाचा एक दरिद्री माणूस टाकण्यात आला होता; त्या श्रीमंताच्या मेजावरून खाली पडेल त्यावर आपले पोट भरावे अशी त्याची इच्छा असे; शिवाय कुत्री येऊन त्याचे फोड चाटत असत. पुढे असे झाले की, तो दरिद्री माणूस मेला आणि देवदूतांनी त्याला अब्राहामाच्या उराशी नेऊन ठेवले; श्रीमंतही मेला व त्याची उत्तरक्रिया करण्यात आली. तो अधोलोकात यातना भोगत असताना त्याने आपली दृष्टी वर करून अब्राहाम व त्याच्या उराशी बसलेला लाजर ह्यांना दुरून पाहिले. तेव्हा त्याने हाक मारून म्हटले, हे बापा अब्राहामा, माझ्यावर दया

करून लाजराला पाठव, ह्यासाठी की त्याने आपल्या बोटाचे टोक पाण्यात बुडवून माझी जीभ थंड करावी; कारण ह्या जाळात मी क्लेश भोगत आहे. अब्राहाम म्हणाला, मुला, तू आपल्या आयुष्यात आपले सुख भरून पावलास, तसा लाजर आपले दुःख भरून पावला, ह्याची आठवण कर; आता ह्याला येथे समाधान मिळत आहे व तू क्लेश भोगत आहेस. एवढेच नव्हे तर जे इकडून तुमच्याकडे पार जाऊ पाहतात त्यांना जाता येऊ नये म्हणून व तिकडून कोणी आमच्याकडे येऊ नये म्हणून आमच्या व तुमच्यामध्ये मोठी दरी स्थापलेली आहे. मग तो म्हणाला, तर बापा, मी विनंती करतो, त्याला माझ्या बापाच्या घरी पाठव; कारण मला पाच भाऊ आहेत; त्यांनी तरी ह्या यातनेच्या स्थळी येऊ नये म्हणून त्याने त्यांना इकडची साक्ष द्यावी. पण अब्राहामाने त्याला म्हटले, त्यांच्याजवळ मोशे व संदेष्टे आहेत, त्यांचे त्यांनी ऐकावे. तो म्हणाला, हे बापा अब्राहामा, असे नाही; पण मेलेल्यांमधून कोणी त्यांच्याकडे गेला तर ते पश्चात्ताप करतील. तेव्हा त्याने त्याला म्हटले, ते मोशेचे व संदेष्ट्यांचे ऐकत नसतील तर मेलेल्यांमधूनही कोणी उठला तरी त्यांची खातरी होणार नाही. (लूक १६:१९-३१)

स्वार्थ आणि उदासीनता यांचा एखाद्या व्यक्तीवर होणारा परिणाम लक्षात यावा यासाठी येशूने हा दृष्टांत सांगितला. येशू स्वधार्मिक असणाऱ्या परुश्यांना उद्देशून बोलत होता आणि मृत्यूनंतर असणाऱ्या त्यांच्या गैरसमजांच्या भोवती त्याने हा दृष्टांत मांडला.

यहुद्यांनी संपत्तीचा संबंध देवाच्या आशीर्वादाशी जोडला होता. त्यांच्यामते एक गरीब व्यक्ती, विशेषतः ज्याच्याकडे काही शारीरिक क्लेश आहेत, त्याला देवाने शाप दिला होता; त्यांचा असा देखील विचार होता कि ती व्यक्ती त्याच्या आयुष्यात आध्यात्मिक कमतरता किंवा पाप यामुळे या शापास पात्र होती. दुसरीकडे श्रीमंत व्यक्ती असणे म्हणजे देवाच्या विशेष कृपेची खात्री होती. एखाद्या व्यक्तीची संपत्ती किंवा स्थिती, परुष्यांच्या दृष्टीने देवासमोर त्यांच्या योग्य स्थितीचे प्रमाण होते. या अरुंद आणि क्रूर दृष्टीकोनाचा खोटेपणा उघड करण्यासाठी येशूने त्यांना हा दृष्टांत सांगितला.

प्रथम आम्ही हा दृष्टांत तपशीलवार पाहू. त्यांच्या मुर्त्यूनंतर, गरीब लाजरस स्वतःला आरामात अब्राहमच्या उराशी बसलेला पाहतो. श्रीमंत माणूसही मरतो आणि नरकात दुःख सहन करतो; तो वर पाहतो व त्याला अब्राहाम व लाजर काही अंतरावर दिसतात. श्रीमंत माणूस आणि 'पिता अब्राहम' यांच्यात संभाषण सुरु होते.

आता काही विचारशील प्रश्न विचारून या दृष्टांताचे काळजीपूर्वक परीक्षण करूया:

- दृष्टांतात अब्राहाम व लाजर कोठे आहेत?
- जर अब्राहाम आणि लाजर स्वर्गात असतील मग अब्राहम आणि श्रीमंत व्यक्ती जो नरकात आहे, हे संभाषण कसे करू शकतात, आणि श्रीमंत माणूस त्यांना कसे पाहू शकतो?
- अब्राहाम आणि लाजर नरकात असल्यास, ते तेथे काय करीत आहेत?
- जर अब्राहाम आणि लाजर स्वर्गात किंवा नरकात नाहीत तर ते कुठे आहेत?
- अनंतकाळ जळणाऱ्या नरकाच्या, त्रासात असलेल्या व्यक्तीला काही पाण्याचे थेंब किती आराम देऊ शकतात?
- लाजरला त्या श्रीमंत मनुष्याला नरकात पीडा होताना दिसेल काय? आणि त्याची विनंती ऐकता येईल काय?
- अब्राहमच्या उराशी बसलेला लाजरला कशा प्रकारे सांत्वन दिले जात आहे?

- श्रीमंत माणसाच्या दुःखाची जाणीव असूनही लाजरला सांत्वन मिळत आहे का?
- त्या दोघांची परीस्थिती बदलल्यामुळे लाजरला आता श्रीमंत माणसाबद्दल उदासीनता बाळगण्यास प्रोत्साहन दिले जात आहे काय?
- या दोन स्थानांमधील प्रवासास प्रतिबंध करणारी ‘मोठी दरी’ किती रुंद आहे?
- नरक आणि अब्राहम व लाजर यांच्या स्थानामधील संवाद टाळण्यासाठी ‘मोठी दरी’ किती रुंद असायला हवी?
- नरकात जे यातनेत आहेत त्यांच्या त्रासाची जाणीव स्वर्गात जे आरामात आहेत त्यांना नाही व्हावी यासाठी ‘मोठी दरी’ किती विस्तृत असणे आवश्यक आहे?
- श्रीमंत मनुष्य आणि लाजर यांच्या दृष्टांतात येशूने नरकाचा संदर्भ काढला याचा अर्थ काय तो अनंतकाळ जळणाऱ्या नरकाच्या शिकवणीला पाठींबा देत आहे काय?

या राक्षसी शिकवणीला समर्थन देण्याऐवजी, लोकांच्या मनातून हि शिकवण काढून टाकण्यासाठी येशूने त्याच्या दृष्टांतात सतत जळणाऱ्या यातनाची संकल्पना आणली असा निष्कर्ष काढणे अधिक योग्य वाटत नाही का? येशू शिकवत होता की जर विश्वामध्ये कोठेही खरोखरचे नरक असेल तर जे सार्वकालिक जीवन जगतात त्यांना परिपूर्ण शांतता आणि खरा आनंद मिळणे अशक्य आहे.

अनंतकाळ जळणाऱ्या नरकाचे स्थान आहे हि अशी एक सैतानाची खोटी शिकवन आहे जी आपल्या सौम्य, दयाळू, क्षमाशील, आणि प्रेमळ देवाला सर्वात वाईट, जुलमी, अत्याचारी म्हणून दाखविते आणि आपल्याला आपल्या स्वर्गीय पित्यापासून दूर नेण्यासाठी या शिकवणीचा आधार सैतान घेतो. अनंतकाळ नरकाचे यातना असणारी अशी कोणतीच जागा नाही. त्याविपरीत, पवित्रशास्त्र अशा दिवसाबद्दल बोलते कि जेव्हा सर्व दु:ख कायमचे संपेल:

आणि मी राजासनातून आलेली मोठी वाणी ऐकली, ती अशी : पाहा, देवाचा मंडप मनुष्यांजवळ आहे, त्यांच्याबरोबर देव आपली वस्ती करील; ते त्याचे लोक होतील, आणि देव स्वतः त्याच्याबरोबर राहील. तो त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील; ह्यापुढे मरण नाही; शोक, रडणे व कष्ट हे नाहीत; कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या. (प्रकटीकरण २१:३-४)

आपण कोणत्या स्वरूपात अनंतकाळात जगू, असा प्रश्न अनेकांना पडतो. आपल्याकडे आता आहे तसे मानवी शरीर असेल की आपण शरीरहीन जीवन जगू? आणि, आपला आत्मा काय आहे? असा देखील प्रश्न पडतो.

मग परमेश्वर देवाने जमिनीतील मातीचा मनुष्य घडवला व त्याच्या नाकपुड्यांत जीवनाचा श्वास फुंकला; तेव्हा मनुष्य जीवधारी प्राणी झाला. (उत्पत्ति २:७)

जो जीवात्मा पाप करतो तो मरेल. (यहेज्. १८:४)

आपल्या जीवनाला “जीवनाचा श्वास“ किंवा आत्म्याची आवश्यकता असते, जे देवाकडून येते. आपल्याजवळ जिवंत आत्मे नाहीत. आपल्यापैकी प्रत्येकजण एक जिवंत आत्मा आहे. आपल्याजवळ विभक्त अमर आत्मे आहेत या विश्वासाला

बायबल समर्थन देत नाही. ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनाच्या वेळी, आपली अपरिपूर्ण शरीरे “डोळ्याच्या एका झलकीत“ (१ करिंथ. १५:५२) परिपूर्णतेत बदलली जातील.

कारण पापाचे वेतन मरण आहे. (रोम. ६:२३)

येथे देवाच्या वचनात कोठेही मृत्यूचे वर्णन मृत्यूशिवाय दुसरे काहीही नाही. सर्व शास्त्रवचने, योग्यरित्या समजले गेल्यास अर्थ निघतो कि पापाचा परिणाम मृत्यूमध्ये होतो फक्त एकच विरोधाभासी आवाज ह्याचे सर्मथन करत नाही: आणि सर्प त्या स्त्रीला म्हणाला, तू खरोखर मरणार नाहीस. (उत्पत्ति ३:४ भर जोडला).

देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. (योहान: ३:१६) नाश हा शब्द अस्तित्त्वात नसलेल्या अवस्थेत येणे होय. याचा अर्थ असा होत नाही की दु:खद स्थितीत इतर कोठेही अस्तित्वात असणे.

हे बोलल्यावर तो त्यांना म्हणाला, आपला मित्र लाजर झोपला आहे; पण मी त्याला झोपेतून उठवायला जातो. ह्यावरून शिष्य त्याला म्हणाले, प्रभूजी, त्याला झोप लागली असेल तर तो बरा होईल. येशू त्याच्या मरणाविषयी बोलला होता; परंतु तो झोपेतून मिळणाऱ्या आरामाविषयी बोलतो असे त्यांना वाटले. म्हणून येशूने त्यांना उघड सांगितले, ङ्गलाजर मेला आहे; (योहान ११:११-१४)

येशूने मृत्यूची तुलना निद्रेशी केली कारण देव सक्षम आहे एखाद्या व्यक्तीला मेलेल्यातून जिवंत करायला. जेव्हा चार दिवसानंतर येशूने लाजरला थडग्यातून पुन्हा जिवंत केले, लाजरला स्वर्गातून परत बोलविण्यात आले नव्हते. तो मृत्यू या बेशुद्ध अवस्थेतून जागा झाला होता.

त्याचा प्राण जातो, तो आपल्या मातीस पुन्हा मिळतो; त्याच वेळी त्याच्या योजनांचा शेवट होतो. (स्तोत्रसंहिता १४६:४)

मृत्यूच्या वेळी विचार इतर कोठेही सुरु असत नाहीत.

कारण मृतावस्थेत तुझे स्मरण कोणाला राहत नाही; अधोलोकात तुझे उपकारस्मरण कोण करणार? (स्तो.६:५)

आपल्याला मरायचे आहे हे जिवंतांना निदान कळत असते; पण मेलेल्यांना तर काहीच कळत नाही;
(उप.९:५)

जेव्हा आपण मरतो तेव्हा विचार करणे, तर्क काढणे किंवा लक्षात ठेवणे अशी कार्ये त्याच क्षणी थांबवली जातात, ज्यात वेळेची जाणीव देखील समाविष्ट असते. आपण शेवटचा श्वास घेतल्यानंतर लगेचच पुनरुत्थानाचा क्षण येईल असे वाटेल.

कारण आज्ञाध्वनी, आद्यदिव्यदूताची वाणी व देवाच्या तुतारीचा नाद होत असता प्रभू स्वतः स्वर्गातून उतरेल; आणि ख्रिस्तामध्ये जे मेलेले आहेत ते पहिल्याने उठतील. (१थेस. ४:१६)

हे पुनरुत्थान ख्रिस्ताच्या दुसऱ्या आगमनानंतर होईल.

पाहा, मी लवकर ङ्येतो; आणि प्रत्येकाला ज्याच्या-त्याच्या कृत्यांप्रमाणे देण्यास माझ्याजवळ वेतन आहे. (प्रकटीकरण २२:१२)

येशू दुसऱ्यांदा परत येईपर्यंत आम्हाला आमचे शाश्वत बक्षीस मिळणार नाही

जो धन्य व एकच अधिपती, राजांचा राजा व प्रभूंचा प्रभू, ज्या एकालाच अमरत्व आहे, जो अगम्य प्रकाशात राहतो, ज्याला कोणा माणसाने पाहिले नाही, आणि कोणी पाहू शकत नाही, तो ते त्याचे प्रकट होणे यथाकाळी दाखवील; त्याला सन्मान व पराक्रम युगानुयुग आहे. आमेन. (१ तीम.६:१५-१६).

परमेश्वर देव हा एकमेव अमर आहे, आम्ही नाही.

पाहा, मी तुम्हांला एक रहस्य सांगतो; आपण सर्वच महानिद्रा घेणार नाही, तरी आपण सर्व जण बदलून जाऊ; क्षणात, निमिषात, शेवटला कर्णा वाजेल तेव्हा. कारण कर्णा वाजेल, मेलेले ते अविनाशी असे उठवले जातील, आणि आपण बदलून जाऊ. कारण हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान करावे, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान करावे हे आवश्यक आहे. हे जे विनाशी त्याने अविनाशीपण परिधान केले, आणि हे जे मर्त्य त्याने अमरत्व परिधान केले, असे जेव्हा होईल तेव्हा "मरण विजयात गिळले गेले आहे" असा जो शास्त्रलेख आहे तो पूर्ण होईल. (१ करिंथ १५:५१-५४)

आपल्यात आणि स्वतःमध्ये अमरत्व नाही. अमरत्व केवळ ईश्वराशी सजीव संबंधाद्वारे शक्य आहे: "या विनाशी माणसाने अमरत्व धारण केलेच पाहिजे." पौल देखील जाहीर करतो, 'आम्ही सर्व झोपू शकत नाही.' जे ख्रिस्तात जिवंत आहेत, ते ख्रिस्ताचे दुसरे आगमन होतेवेळी मृत्यू कधीच अनुभवणार नाही.

लांडगा कोकराजवळ राहील, चित्ता करडाजवळ बसेल, वासरू, तरुण सिंह व पुष्ट बैल एकत्र राहतील; त्यांना लहान मूल वळील. गाय व अस्वल एकत्र चरतील; त्यांचे बच्चे एकत्र बसतील; सिंह बैलाप्रमाणे कडबा खाईल. तान्हे बाळ नागाच्या बिळाजवळ खेळेल, थानतुटे मूल फुरशाच्या बुबुळाला हात लावील. माझ्या सगळ्या पवित्र डोंगरावर ती उपद्रव देणार नाहीत व नासधूस करणार नाहीत; कारण सागर जसा जलपूर्ण आहे तशी परमेश्वराच्या ज्ञानाने पृथ्वी परिपूर्ण होईल. (यश.११:६-९)

नवीन बनवलेल्या पृथ्वीवर देवाची सर्व सृष्टी एदेनच्या मूळ परिपूर्णतेत रचली जाईल. प्राणी जगण्यासाठी एकमेकांना मारणार नाहीत, आणि असे कोणतेही प्राणी अस्तित्वात नसतील जे मानवजातीला धोकादायक असतील. तेथे कोणतेही भय, पीडा, आणि मृत्यू नसेल.

***तो त्यांच्या डोळ्यांचे सर्व अश्रू पुसून टाकील; ह्यापुढे मरण नाही; शोक, रडणे व कष्ट हे नाहीत; कारण पहिल्या गोष्टी होऊन गेल्या. (प्रकटी २१:४***

# 19. आपला निर्माणकर्ता आणि सांभाळणारा

प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी निर्माण केली. (उत्पत्ती १:१)

येथे सर्व सत्य विज्ञानाचा पाया आहे. देवाने आपले जग निर्माण केले. देवाने आम्हाला बनवले. आपले अस्तित्व हा योगायोगाचा परिणाम नव्हे. येथे आपल्या अस्तित्वामागे दैवी हेतू आहे. तथापि, आज आपले जग अश्या तत्त्वज्ञानाने संतृप्त झाले आहे जे देवाचे वचन उघडणाऱ्या स्पष्ट विधानाच्या अगदी विरुद्ध आहे. नास्तिकतेने देवाला दूर करण्याच्या ध्येयाने विज्ञानावर ताबा करण्याचा प्रयत्न केला आहे. या तत्त्वज्ञानाने एका शतकाहून अधिक काळ विज्ञानावर ताबा ठेवला आहे.

सृष्टी-आधारित विज्ञानाला समर्थन देणाऱ्या पुराव्यांचा शोध घेणे या छोट्या पुस्तकाच्या कक्षेत नाही कारण या विषयावर बरीच चांगली पुस्तके उपलब्ध आहेत. तथापि, देवाच्या अस्तित्वाबद्दल आज एक लढाई चालू आहे. अनेक लोकांचा पाठींबा असलेले असे येथे अनेक प्रमुख लेखक आणि वक्ते मोठ्या प्रमाणात आहेत ज्यांचा ध्येय आम्हाला देवापासून दूर करणे किंवा दूर नेणे हाच आहे. काय आहे जे ही चळवळ चालवित आहे, आणि का बऱ्याच लोकांनी देवावरील विश्वासाला नाकारले आहे?

बरेच प्रामाणिक लोक देवाबद्दल एक विसंगत मत ठेवत आहेत. देवाच्या प्रेमाविषयी ऐकून पुष्कळ लोक लहानाचे-मोठे झाले आहेत, केवळ एक प्रेमळ देवाचे चित्र प्रभावीपणे नाकारले जाऊन त्याचे विवादास्पद चित्र एक असा देव जो सहजपने नाराज होतो किवा रागावतो असे केले आहे. त्यात भर म्हणजे देव मृत्यू, विनाश आणि चिरंतन यातना देऊन शत्रूंचा सूड घेतो असा विश्वास ही वाढला आहे; यामुळे बऱ्याच जणांनी देवावरील विश्वासाला पूर्णपणे का नकार दिला हे पाहणे सोपे आहे. पण कदाचित जे ह्या विकृतचित्रामुळे एका देवाला नाकारत आहेत परंतु खऱ्या देवाला मुळीच नाकारत नाहीत. परमेश्वराच्या अस्तित्वाचा दुय्यम प्रश्न यामुळे अस्तित्त्वात आहे कारण देवाच्या चरित्राबद्दलचा पहिला प्रश्न (म्हणजेच परमेश्वर असा देव जो सहजपने नाराज होतो किवा रागावतो व मृत्यू, विनाश आणि चिरंतन यातना देऊन शत्रूंचा सूड घेतो) प्रत्येक मनावर स्थिर झालेला नाही.

आपण केलेले सर्व फार चांगले आहे असे देवाने पाहिले. संध्याकाळ झाली व सकाळ झाली. हा सहावा दिवस. (उत्पत्ति १:३१)

हे वचन सृष्टीचा अहवाल सांगत आहे. सृष्टीचे काम पूर्ण होण्याआधी त्यामधील कोणत्याही जीवांचा मृत्यू झाला असता तर देव पृथ्वीवर सर्व काही “फार चांगले“ म्हणून बघू शकला नसता. देव दु:ख आणि मृत्यूचा लेखक नसल्याने, ही संकटे येण्या आधी देव हा अस्तित्वाचा सर्वात उत्तम मार्ग असल्याचे दर्शवितो. मानवाच्या पतनानंतर पहिल्यांदाच सृष्टीमध्ये दुःख आणि मृत्यू आले.

जो प्राणी शक्तिशाली आहे त्याची जगण्याची शक्यता जास्त आहे आणि जो प्राणी अशक्त आहे ते शक्तिशाली प्राण्यांद्वारे मारले जातात. हि जी आपत्कालीन जगण्याची पध्द्त आहे ती पृथ्वीवरील प्रत्येक जीवाने पाप पुर्थ्वीवर आल्यापासून स्वीकारली आहे.

तथापि एक चांगली बातमी ही आहे कि जेव्हा देव एक नवीन पृथ्वी निर्माण करेल तेव्हा त्याचे आणि सृष्टीतील संबंध पुन्हा एकदा पाहिल्यासारखे होईल. निर्माणकर्त्या कडून सृष्टीचा लगाव नवीन बनवलेल्या पृथ्वीवर पुनर्स्थापित होईल. कुठल्याही स्पर्धेविना प्रेमाचा कायदा हाच जीवन शैली असेल, ना भीती, ना दु:ख आणि नाही मृत्यू. आपली पृथ्वी निर्माण करण्यामागचा देवाचा मूळ उद्देश मग आपल्याला लक्षात येईल.

कारण सृष्टीच्या निर्मितीपासून त्याच्या अदृश्य गोष्टी म्हणजे त्याचे सनातन सामर्थ्य व देवपण ही निर्मिलेल्या पदार्थांवरून ज्ञात होऊन स्पष्ट दिसत आहेत; अशासाठी की, त्यांना कसलीही सबब राहू नये. (रोम. १:२०)

जेव्हा आम्हाला विज्ञानाचा अभ्यास करण्याची संधी मिळेल तेव्हा आम्ही सृष्टीमध्ये दिसत असलेल्या चमत्कारीक परिशुद्धता आणि निसर्गाचे कौतुक करू. देवाची सही सर्वत्र लिहिलेली आहे. जेव्हा आम्ही देवाचे अस्तित्व नाकारतो, तेव्हा आपण चमत्काराच्या अस्तित्वाचे देखील खंडन केले पाहिजे, परंतु आपल्याभोवती चमत्कार आहेत: प्रचंड वृक्ष, नाजूक वन्य फुले, कोकिळेचे सूर, कोळीचे जाळे, विशाल विश्व, एक बाळाचे हसू जेव्हा ते आपल्या आईला ओळखते, आपण ह्याचक्षणी घेत असलेला श्वास. हे सर्व परात्पराच्या आदेशाचे चमत्कार आहेत. ह्या सगळ्यांचे स्पष्टीकरण चमत्कार व्यतिरिक्त काही वेगळे करणे योग्य असू शकत नाही. सर्व जीवन एक चमत्कार आहे. हा पुरावा विलक्षण आहे कि देवाने आपल्याला आणि सगळ्या सजीवांना निर्माण केले. आपल्या सभोवताली असलेल्या अद्भुत जगाकडे पाहणे आणि हे सर्व काही देवाने निर्माण केले नाही असा निष्कर्ष काढणे योग्य नाही.

आकाशाचा उत्पन्नकर्ता तोच देव, पृथ्वीचा घडणारा व कर्ता तोच; त्याने तिची स्थापना केली; त्याने ती निर्जन राहावी म्हणून उत्पन्न केली नाही, तर तिच्यावर लोकवस्ती व्हावी म्हणून घडवली; हा परमेश्वर म्हणतो, मीच परमेश्वर आहे; अन्य कोणी नव्हे. (यश. ४५:१८)

देवाने पृथ्वीला आपले अनंतकाळचे घर बनवले आहे.

प्रारंभी शब्द होता, शब्द देवासह होता आणि शब्द देव होता. तोच प्रारंभी देवासह होता. सर्वकाही त्याच्या द्वारे झाले आणि जे काही झाले ते शब्द देही झाला व त्याने आमच्यामध्ये वस्ती केली, आणि आम्ही त्याचा गौरव पाहिला. तो पित्यापासून आलेल्या एकुलत्या एकाचा गौरव असावा असा अनुग्रह व सत्य ह्यांनी परिपूर्ण होता. (योहान १:१-३,१४)

आपला निर्माता तो कोण आहे हे अधिक स्पष्टपणे प्रकट करण्यासाठी आपल्या सारखाच एक झाला.

आकाश जे तुझे अंगुलीकार्य, व त्यात तू नेमलेले चंद्र व तारे ह्यांच्याकडे पाहावे तर मर्त्य मनुष्य तो काय की तू त्याची आठवण करावी? मानव तो काय की तू त्याला दर्शन द्यावे? तू त्याला देवापेक्षा किंचित कमी असे केले आहेस; त्याला

गौरव व थोरवी ह्यांनी मुकुटमंडित केले आहेस. तू त्याला आपल्या हातच्या कृत्यांवरचे प्रभुत्व दिले आहेस, तू सर्वकाही त्याच्या पायांखाली ठेवले आहेस. (स्तो.८:३-६)

देवाने मानवी कुटुंब बनविले तेंव्हा ते देवदूतांपेक्षा किंचित कमी बनवले तथापि, ज्यांनी पृथ्वीवर राहून देखील देवासोबत समेट घडून आणला व हा समेट घडून येताना त्यांना देवसोबत जो अनुभव आला देवदूतांना देखील त्याकडे पाहण्याची इच्छा होईल. (१ पेत्र १:१२). देवाच्या आत्मत्यागी प्रेमाबद्दलचे त्यांचे अनुभवात्मक ज्ञान त्यांना विश्वात एक विशेष स्थान देईल: तेव्हा मी पवित्र नगरी, नवी यरुशलेम, देवापासून स्वर्गातून उतरताना पाहिली. ती नवऱ्यासाठी शृंगारलेल्या नवरीप्रमाणे सजवलेली होती. आणि मी राजासनातून आलेली मोठी वाणी ऐकली, ती अशी : पाहा, देवाचा मंडप मनुष्यांजवळ आहे, त्यांच्याबरोबर देव आपली वस्ती करील; ते त्याचे लोक होतील, आणि देव स्वतः त्याच्याबरोबर राहील. (प्रकटीकरण २१:२-३)

त्याने पृथ्वी आपल्या सामर्थ्याने उत्पन्न केली, त्याने आपल्या बुद्धीने आकाश पसरले. (यिर्मया १०:१२)

कारण आपण त्याच्या ठायी जगतो, वागतो व आहोत; तसेच तुमच्या कवींपैकीही कित्येकांनी म्हटले आहे की, आपण वास्तविक त्याचा वंश आहोत. (प्रेषित १७:२८)

विश्व, पृथ्वी आणि पृथ्वीवरील सर्व सजीव प्राणी देवाशिवाय अस्तित्वात राहू शकत नाहीत. आपल्या निर्माणकर्त्याने तसे केले नाही, देवाने आपले जग हे, एका घड्याळासारखे रचून नंतर पुढे कुठलाही हस्तक्षेप न करता कार्यान्वयित केले असे मुळीच नाही. देव सतत त्याच्या सामर्थ्याच्या शब्दाने सर्व गोष्टी राखून ठेवतो कारण त्याच्याद्वारे सर्व गोष्टी चालतात (इब्री १:३; कलस्सै १:१७)

जर तुम्ही तुमच्या उजव्या हातात पाण्याचा पेला धरला असेल आणि ते तुम्ही खाली पडायचे ठरवले असेल, तर तुम्हाला तुमच्या डाव्या हाताचा वापर करून तुमच्या उजव्या हाताने ते टाकायला भाग पाडावे लागेल का? देव आम्हाला सांगतो, माझ्याच हाताने पृथ्वीचा पाया घातला; माझ्या उजव्या हाताने आकाश विस्तारले; मी हाक मारताच ती माझ्यापुढे एकत्र उभी राहतात. (यश. ४८:१३).

देव नाश करणारा आहे अशी कल्पना करणे सृष्टीचा संभाळ करणारा म्हणून त्याच्या स्थानास क्षुल्लक बनवते. देवाला नाश घडवण्यासाठी सक्रियपणे नाश करण्याची आवश्यकता नाही. विनाशाचे एक उदाहरण समजून घेण्याकरिता, सदोम आणि गमोराचा नाश या घटनेकडे पाहूया, एक सामान्य व्याख्या आहे कि देव अग्नि व गंधक निर्माण करतो या उद्देशाने की ज्या गोष्टी त्याने "राखून ठेवलेल्या" किंवा प्रेमाने सांभाळलेल्या आहेत त्यांचा विध्वंस करावा म्हणून? देव हा विनाश करणार आहे किंवा देव हा विध्वंसक आहे असे देवा बद्दलचे चित्र देवाला त्याच्याच निर्माणकरता व सांभाळणारा या सत्याच्या उलट विवादास्पद संघर्षा मध्ये टाकते, हे अगदी असेच आहे जसे आपण आपल्या उजव्या हातात असलेल्या पाण्याच्या पेल्याला खाली पाडण्यासाठी आपल्या डाव्या हाताने उजव्या हातावर जोर टाकून स्वतः संघर्षात पडावे!

देव हा सृष्टीचा निर्माता व संभाळकर्ता असून जर त्याला एखाद्या गोष्टीला नष्ट करावयाचे असेल तर देवाला त्या फक्त गोष्टींवरील ताबा सोडून देणे अथवा त्या गोष्टी त्याच्या हातून जाऊ देणे पुरेसे आहे. तथापि, हे समजून घेणे आवश्यक आहे

की देव कोणाचाही मृत्यू व्हावा अथवा नाश व्हावा अशी इच्छा कधीच धरत नाही. देव त्याच्याहातून गोष्टी जाऊ देतो फक्त एका कारणाने की तो प्रीती आहे, आणि प्रीतीत खरे स्वातंत्र्य आवश्यक आहे. देव एखाद्या व्यक्तीला किंवा राष्ट्राला केवळ इच्छा नसताना व तीव्र दु:ख्खसहन करीत सोडतो: हे एफ्राइमा, मी तुला कसा सोडून देईन? हे इस्राएला, मी तुला कसे बहकू देईन? मी तुला अदमासारखे करू काय? सबोइमासारखे करू काय? माझे हृदय खळबळले आहे, माझ्या कळवळ्यास ऊत आला आहे. (होशेय ११:८).

यरुशलेमेबद्दल येशू या शोक करणाऱ्या शब्दांत बोलला: यरुशलेमे, यरुशलेमे, संदेष्ट्यांचा घात करणारे व तुझ्याकडे पाठवलेल्यांना धोंडमार करणारे! जशी कोंबडी आपली पिले पंखांखाली एकवटते, तसे तुझ्या मुलांबाळांना एकवटायची कितीदा तरी माझी इच्छा होती, पण तुमची इच्छा नव्हती! पाहा, "तुमचे घर तुमच्यासाठी ओसाड सोडले आहे." (मत्तय २३:३७-३८)

कारण मनुष्याचा पुत्र मनुष्यांच्या जीवाचा नाश करायला नाही, तर त्यांना तारायला आला आहे.
(लूक ९:५६)

आकाश देवाचा महिमा वर्णिते; अंतरिक्ष त्याची हस्तकृती दर्शवते दिवस दिवसाशी संवाद करतो, रात्र रात्रीला ज्ञान प्रकट करते. वाचा नाही, शब्द नाही, त्यांची वाणी ऐकू येत नाही. (स्तो.१९:१-३)

देव त्याच्या निर्मितीद्वारे सर्व लोकांशी बोलतो. भाषेतील अडथळे किंवा मुद्रित असलेले शब्द नसल्यामुळे कोणीही त्याच्याकडून शिकण्याच्या आमंत्रणातून वेगळे केलेले नाहीत.

***आपले डोळे वर करून पाहा; ह्यांना कोणी उत्पन्न केले? तो त्यांच्या सैन्याची मोजणी करून त्यांना बाहेर आणतो; तो त्या सर्वांना नावांनी हाक मारतो, तो महासमर्थ व प्रबळ सत्ताधीश आहे; म्हणून त्यांपैकी कोणी उणा पडत नाही***. (***यशया*** *४०:२६*)

# 20. आपण अनंतकाळचे जीवन कसे मिळवू शकतो?

यापूर्वी या पुस्तकात आपण उत्पत्ती, अध्याय ३ मध्ये नोंदविलेल्या मानवजातीच्या पतनाबद्दल वाचले आहे. वेष बदलून फसवणूक करणाऱ्या सर्पाने आदाम आणि हव्वा यांना असा विश्वास दिला की देव स्वयंसेवक आहे आणि त्यावर विश्वास ठेवला जाऊ शकत नाही. जेव्हा त्यांनी सर्पाच्या खोट्या सांगण्यावर विश्वास ठेवला तेव्हा ते स्वतःला जीवनदात्यापासून दूर करण्याचा प्रयत्न करू लागले आणि त्यांच्यासाठी मरणाची प्रक्रिया सुरू झाली.

त्या दिवसापासूनचे सर्व मृत्यू हे देवाबद्दलच्या असत्य गोष्टींवर विश्वास ठेवण्याचे परिणाम आहेत. एदेन बागेतच मानवजात देवापासून दुरावलेली होती कारण आदाम आणि हव्वेने देवा बद्दलची त्यांची मानसिकता बदलली. जिथे त्यांनी एकेकाळी देवावर विश्वास ठेवला होता, तेथे त्यांनी त्याच्यावर अविश्वास ठेवला. ही अजूनही आमची मूळ समस्या आहे. आपल्याला देवाबद्दलची आपली मानसिकता बदलण्याची गरज आहे. जेव्हा आपण असे करू तेव्हा अविश्वासाची जागा विश्वास घेईल आणि अविश्वास दूर होईल, आणि प्रेम देवाबद्दलची भीती दूर करेल. आपला समेट आपल्या निर्मानकर्त्याशी केला जाईल आणि आपल्याला अनंतकाळचे जीवन मिळेल.

जेव्हा आदाम आणि हव्वेने सर्पाने सांगितलेल्या देवाबद्दलच्या असत्य गोष्टींवर विश्वास ठेवला, आणि देवापासून लपण्याचा प्रयत्न केला, तेव्हा जे घडले त्याद्वारे देव स्वतः मुळीच बदलला नाही. आता त्यापासून परके झालेल्या त्याच्या लेकरांवर त्याचे प्रेम मुळीच कमी झाले नव्हते. आपल्या प्रयत्नांद्वारें परमेश्वराचे आपल्याबद्दल चे मन बदलणारी तारणाची कोणतीही योजना जी आपल्या प्रयत्नांवर अवलंबून आहे ती  अश्या समस्येचे समाधान शोधते जी समस्या मुळात अस्तित्वातच नाही. देवाचे मुळातच आपल्याबद्दल चांगले विचार आहेत आणि आपल्याबद्दल चांगले विचार करण्यासाठी त्याला स्वतःचे मन वळवण्याची गरज नाही. तो आपल्यापैकी प्रत्येकावर आधीपासूनच प्रेम करतो आणि अमर्यादपणे आपली किम्मत करतो.

जेव्हा देवाने इस्राएली लोकांना मिसर देशातून बाहेर काढले, तेव्हा त्यांना मूर्तीपूजा करण्याच्या धोक्याबद्दल स्पष्ट ताकिद देण्यात आली होती.  हे खोटे देव पवित्र शास्त्राच्या काळात सामान्य होते आणि ते विकृत कल्पनांद्वारे निर्माण करण्यात आले होते. ते नेहमी रागावलेले असतात आणि त्यांना शांत व समाधानाची गरज भासते असे आपल्याला समजते. त्यांचा राग दूर करण्यासाठी त्याकाळी यज्ञ आणि अर्पणे केली जात असे. आपण गंभीरपणे विचारू शकतो कि: देवाशी संबंध ठेवण्याची आपली पद्धत प्राचीन मुर्तीपुजेशी काही समानता ठेवते का?

सार्वकालिक जीवन हेच आहे की, तू जो एकच खरा देव त्या तुला व ज्याला तू पाठवलेस त्या येशू ख्रिस्ताला त्यांनी ओळखावे. जे काम तू मला करायला दिलेस ते पुरे करून मी पृथ्वीवर तुझा गौरव केला आहे. (योहान १७:३-४)

येशूने त्याच्या पित्याला केलेल्या या प्रार्थनेत, त्याने सार्वकालिक जीवनाची स्पष्ट व्याख्या केली आहे. देवाला जाणण्याचा हा अनुभव आहे. हे अनुभवात्मक ज्ञान आपल्या जीवन दात्याशी आपला समेट घडवून आणते. आपल्या संपूर्ण जगासाठी येशू ख्रिस्ताच्या जिवन कार्याचा खरा हेतू आपण पाहू लागतो - तो असा की  देव हा निःस्वार्थ, परोपकारी, सौम्य, दयाळू आणि क्षमाशील आहे हे अचूकपणे प्रकट करणे. जेव्हा लोकांनी येशूचे शब्द ऐकले तेव्हा ते प्रत्यक्षात देवाचे शब्द ऐकत

होते. जेव्हा लोकांनी येशूला आजारी लोकांना बरे करताना, भुकेल्यांना खाऊ घालताना, प्रोत्साहन देताना, लहान मुलांना आपल्या मांडीवर घेताना आणि स्वतःला गैरसमज आणि अपमानित होऊ देताना पाहिले तेव्हा ते देवाला, स्वतः देवाला त्याच्या गौरवात पाहत होते.

गोंधळ टाळण्यासाठी, हे समजून घेणे महत्त्वाचे आहे की तारणाचे अनेक मार्ग आहेत, परंतु हे सर्व मार्ग देवाचे विवादित चित्र सादर करतात. हा अभ्यास तारणाच्या एका प्रमुख मार्गावर लक्ष केंद्रित करेल ज्याचा पाश्चात्य समाजात अक्षरशः प्रत्येकाला काही ना काही प्रचिती आली आहे. अनेक प्रामाणिक लोक त्याचे पालन करतात. तारण हा एक कायदेशीर मुद्दा आहे असा हा दृष्टिकोन आहे.

**या मताच्या काही वैशिष्ट्यांमध्ये हे समाविष्ट आहे**:

- देवाने आपल्या मुलांना दिलेल्या स्वातंत्र्याच्या देणगीपेक्षा देवाच्या सार्वभौमत्वावर भर दिला जातो.
- आपल्याशी स्वतःचा समेट करण्याच्या देवाच्या इच्छेपेक्षा वाचविण्यासाठीचे देवाचे सामर्थ्य यावर भर आहे.
- देव इतका शुद्ध आणि पवित्र आहे की तो आपल्या पापांमुळे नाराज आहे यावर विश्वास ठेवण्यापेक्षा, आपला असा विश्वास हवा कि देव आपल्यावर प्रेम करतो आणि आपण जसे आहोत तसे तो आपल्या जवळ येऊ पाहतो. उलटं ज्याकोणावर परमेश्वर प्रेम करतो त्या सर्वांसोबत पाप जे पण काही करते या साठी परमेश्वर पापाबद्दल दुःखी आहे, या साठी नव्हे कि परमेश्वर वयक्तिक रित्या नाराज आहे.
- देवाला त्याच्या बद्दल आमच्या मनात असलेली प्रदीर्घ आजार प्रमाणे ग्रासलेल्या भीती पासून मुक्तता करायची आहे हे समजण्याऐवजी त्याला स्वतः चा क्रोध शांत करण्यासाठी रक्त आवश्यक आहे असा विश्वास आहे.
- देवाची इच्छा आहे कि आपण हे समझून घ्यावे कि जर काही प्राणघातक असेल तेर ते पाप आहे पण देव हा प्राणघातक मुळीच नाही
- असा विश्वास आहे की देव आपल्या पापांची नोंद ठेवत आहे ज्याचा उपयोग आपल्या विरुद्ध येणाऱ्या न्यायदंडाचा वेळात होईल. परंतु सत्य हे आहे की प्रत्येक व्यक्तीला वाचवण्यासाठी देवाला जे काही शक्य होते ते त्याने केले हे दाखवण्यासाठी काही नोंदी ठेवल्या जातील.
- असे दृश्य ज्यात देव आपल्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यास दंड ठोठावतो या ऐवजी हे समझून घ्यायला हवे की, प्रेमाच्या नियमाशी विसंगत हा आपला स्वार्थ आहे, जो आपल्याला दंड आणि आपल्यावर दुःख आणते. ज्या प्रमाणे आपण निसर्गाचे नियम मोबदला देऊन मोडू शकत नाही, तसेच प्रेमाच्या कायद्याचे उल्लंघन सुद्धा आपण दंड भरल्याशिवाय करू शकत नाही.
- सुवार्ताची खरी व्याख्या हि स्वतः देवाबद्दल आहे हे जाणून घेण्या ऐवजी, सुवार्ता म्हणजे देवाने नेमलेल्या कायद्याचा भंग केल्यानंतर होणाऱ्या दंडापासून वाचण्याचा एक मार्ग आहे असा विश्वास. जर देव अशा प्रकारची व्यक्ती असेल जी त्याच्या कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल मृत्यूदंड ठोठावेल, तर मग ही खरी सुवार्ता नाही.
- देवाला पूर्णपणे विश्वासपात्र म्हणून पाहण्याऐवजी स्वतःचा बचाव करून घेण्याची मानसिकता. प्रत्यक्षात, आपण आपल्या सौम्य देवाबद्दलच्या सत्यावर जितके जास्त लक्ष केंद्रित करू तितकी आपल्या स्वतःच्या तारणाची चिंता कमी होईल आणि आपण इतरांवर तितकेच जास्त प्रेम करू आणि त्याची कदर करू. जो

कोणी आपला जीव वाचवू पाहतो तो जीवाला मुकेल व जो कोणी माझ्यासाठी व सुवार्तेसाठी जिवाला मुकेल तो आपला जीव वाचवील. (मार्क ८:३५)

कायदेशीर शुभवर्तमान नेहमीच तारणाची खात्री बाळगण्यावर अनावश्यक लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित करते. देवाने आपल्यावर कोणाच्याही तारणाची स्थिती जाणून घेण्याची गरज टाकलेली नाही - आपल्या स्वतःची हि नाही. आपल्या स्वतःच्या अध्यात्मिक स्थितीवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी, आपण त्याच्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे जो नेहमी आपल्यापैकी प्रत्येकाला आपण जसे आहोत तसे पाहत नाही तर आपण काय असू शकतो म्हणून पाहतो. आपण स्वतःवर जितके प्रेम करू शकतो त्यापेक्षा जास्त प्रेम देव आपल्यावर करतो तेवढीच कदर हि करतो. कुठल्याही शंकेवीना, आपण त्याच्यासोबत सर्वकालीन जीवन जगावे असे देव इच्छितो. तो पूर्णपणे विश्वासपात्र आहे आणि आपल्या भयभीत मनांना बरे करण्यास सक्षम आहे हे आपण समजून घ्यावे अशी त्याची इच्छा आहे प्रेमात भीती नाही पण परिपूर्ण प्रेम भीती दूर करते (१ योहान ४:१८).

आम्ही दोन अतिशय भिन्न शुभवर्तमानांची थोडक्यात तुलना केली आहे: एक कायदेशीर शुभवर्तमान आणि एक बरे करणारे शुभवर्तमान. बरे करणारे शुभवर्तमान येशूच्या शिकवणी आणि उदाहरणाशी परिपूर्ण सुसंगत आहे, तर कायदेशीर शुभवर्तमाना मध्ये येशूची निंदा करण्यासाठी वापरण्यात आलेल्या मानवी काल्पनिक न्यायव्यवस्थेशी अधिक साम्य आहे जे त्याच्या मुर्त्यू पर्यंत वापरली जात होती. (आमचा सौम्य उपचार करणारा)

परमेश्वर म्हणतो, तुमच्याविषयी माझ्या मनात जे संकल्प आहेत ते मी जाणतो; ते संकल्प हिताचे आहेत, अनिष्टाचे नाहीत; (यिर्मया २९:११)

देवाला आपल्याबद्दल चांगले विचार करण्यास प्रवृत्त करण्याच्या उद्दिष्टाने धार्मिक कार्यात गुंतवलेला वेळ, मेहनत आणि खर्चा हा प्रचंड व्यर्थ गेला आहे.

तुम्ही आचरलेले सर्व दुराचार टाकून द्या; आपल्या ठायी नवे हृदय व नवा आत्मा स्थापित करा; हे इस्राएल घराण्या, तुम्ही का मरता? कारण प्रभू परमेश्वर म्हणतो, मरणाऱ्याच्या मृत्यूने मला संतोष होत नाही; तर मागे फिरा व जिवंत राहा. (यहेजकेल.१८:३१-३२)

आपल्यापैकी प्रत्येकाला देवाची विनंती आहे की आपण स्वार्थीपणा सोडून जीवनाचा मार्ग निवडावा.

देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले. (योहान ३:१६-१७)

येशूवर विश्वास ठेवणे म्हणजे त्याने स्वतः विषयी (देवाचा पुत्र) आणि देव पित्याविषयी जे काही प्रकट केले त्यावर विश्वास ठेवणे होय.

म्हणजे जगातील लोकांची पातके त्यांच्याकडे न मोजता, देव ख्रिस्तामध्ये स्वत:बरोबर जगाचा समेट करत होता; आणि त्याने आपल्याकडे समेटाचे वचन सोपवून दिले. (२ करिंथकर ५:१९)

जर देवाने आपल्याला सार्वकालिक मृत्यूपासून वाचवण्याच्या संपूर्ण प्रयत्नांचा सारांश एका शब्दात दिला तर हा शब्द सलोखा होईल.

जे तुम्ही पूर्वी परके व दुष्कर्मे करत मनाने वैरी झाला होता, (कलस्सै १:२१)

मानवजातीचा नाश झाल्या पासून, परकेपणा केवळ आपल्या मनातच अंतर्भूत आहे देवामध्ये कधीही नाही.

कारण अंधारातून उजेड प्रकाशित होईल असे जो देव बोलला तो येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी आमच्या अंतःकरणात प्रकाशला आहे. (२ करिंथ.४:६)

हे वचन जो अंधाराचा संदर्भ देतो तो आपला देवा संदर्भाचा गैरसमज आहे. देवाचे वैभव हे त्याचे चरित्र आहे, जे येशूच्या चेहेऱ्यावर दिसते.

परंतु आपल्या मुखांवर आच्छादन नसलेले आपण सर्व जण आरशाप्रमाणे प्रभूच्या वैभवाचे प्रतिबिंब पाडत आहोत; आणि प्रभू जो आत्मा त्याच्या द्वारे, तेजस्वितेच्या परंपरेने, आपले रूपांतर होत असता आपण त्याच्याशी समरूप होत आहोत. (२ करिंथ ३:१८)

त्याला पाहून आपण बदलले आहोत. हे तत्व दोन्ही प्रकारे कार्य करते. जर आपण विश्वास ठेवत असलो कि देव स्वयंसेवक आहे तर ते आपल्या स्वार्थास अधिक सामर्थ्यवान बनवते. जर आपण त्याला अगदी निःस्वार्थपणे पाहिले तर ते आपल्या मूळ स्वार्थाचे उच्चाटन करण्याचे कार्य करेल. देवाचे प्रेम, दया आणि क्षमा ह्या गुणांचा विचार केल्याने आपल्यात हे समान गुण प्रतिबिंबित होतात.

त्याप्रमाणे ज्यांना पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो. (लूक १५:७)

पश्चात्ताप म्हणजे देवाला म्हणणे मला माफ करा असे नाही. पश्चात्ताप म्हणजे बदलणे किंवा मनपरिवर्तन होणे होय. येशूच्या शिकवणीच्या संदर्भात, खरा पश्चाताप म्हणजे, देवाबद्दल मनपरिवर्तन होणे होय. येशूने प्रतिनिधित्व करून जसे देवाला प्रस्तुत केले तसेच आपण त्याला पाहू.

अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे तुमच्या जिवांना विसावा मिळेल. कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे. (मत्त.११:२८-३०)

आध्यात्मिक आत्म-सुधारणा करण्याच्या निरर्थक प्रयत्नात आपल्याला चांगले काम करण्याची गरज नाही. आमच्या सर्व प्रयत्नांमुळे आपण स्वतःकडे लक्ष वेधू शकतो आणि याचा परिणाम गर्व आणि निराशा होईल. प्रभू येशूकडे आपल्या दुविधेचा उपाय आहे. तो म्हणतो, मला जाणून घ्या.

तेव्हा यशया संदेष्ट्याचा ग्रंथपट त्याला देण्यात आला; त्याने तो उलगडून जे स्थळ काढले त्यात असे लिहिले आहे: परमेश्वराचा आत्मा माझ्यावर आला आहे, कारण दीनांस सुवार्ता सांगण्यास, भग्नहृदयी जनांस बरे करण्यास त्याने मला अभिषेक केला; त्याने मला पाठवले आहे, ते अशासाठी की, धरून नेलेल्यांची सुटका व आंधळ्यांना पुन्हा दृष्टीचा लाभ ह्यांची घोषणा करावी, ठेचले जात आहेत त्यांना सोडवून पाठवावे;.(लूक ४:१७-१८)

येशू आपल्यासाठी जे साध्य करण्यासाठी आला होता त्याची आपल्या सर्वांना गरज आहे; ह्यात अपवाद नाहीत.

## 21. न्यायाच्या घटनेची आपण भीती बाळगावी का?

न्यायनिवाड्याच्या संदर्भात विचार करताना, कोणाचा न्यायनिवाडा केला जात आहे आणि कोण न्यायाधीश आहे हे ठरविणे प्रथम उपयुक्त ठरेल. एदेन बागेमध्ये सर्पाने हव्वेच्या मनात देवाच्या सदिच्छा, प्रामाणिकपणा, आणि विश्वासार्हतेबद्दल प्रश्न निर्माण केले. प्रामाणिकपणे विचार केल्यास हे लक्षात येईल कि तेथे मानवांचा नाही तर देवाचा न्यायनिवाडा होत होता.

देवाने मानवांना त्याचा न्याय करण्याची परवानगी का दिली हे समजून घेणे आपल्यासाठी कदाचित कठीन आहे. तरीसुद्धा, पवित्रशास्त्राच्या सखोल अभ्यासाच्या आधारे हा दृष्टीकोन केवळ व्यावहारिक आहे. सैतानाशी झालेल्या पहिल्या संभाषणापासून आजपर्यंत आपण अज्ञानाने देवाचा न्याय करत आलेलो आहोत. तर मग खरोखर आपण देवाचा योग्य प्रकारे न्याय केला आहे का?

देव आपला न्याय करीत आहे किंवा भविष्यात आपला न्यायनिवाडा करेल असा विश्वास ठेवण्यात आपण चुकत आहोत. जरी स्वतःला न्यायाच्या केंद्रस्थानी ठेवण्यात आपली दिशाभूल झाली आहे तरीही न्यायाच्या दिवशी आपण कोणत्याही प्रकारे आपल्या पापांपासून वाचू शकत नाही. देव आपला न्याय करत नाही. तथापि, आपण स्वतःचा न्याय करण्यात आणि स्वतःला दोषी ठरवण्यात नेहमीच पुढे असतो. येशू म्हणाला की तो जे शब्द बोलला ते जीवन आहे. आपण त्याचे शब्द स्वीकारू किंवा नाकारू शकतो. जर त्याचे शब्द खरोखरच जीवन आहे, आणि आम्ही त्यांना नाकारले असेल तर, मग त्याच्या शब्द नाकारण्याने जो नकारात्मक परिणाम आम्हावर होईल त्याला आम्ही स्वतःच जबाबदार नाही का? अशा प्रकारे आपण स्वतःविरुद्ध नकारात्मक न्यायाचा निर्णय घेत नाही का?

जगाच्या न्यायालयात न्यायालयीन निर्णय घेतले जातात पण देव जगिक न्यायनिवड्याप्रमाने न्याय करत नाही. जेव्हा आपण स्वतःची निंदा करतो आणि मृत्यूच्या मार्गावर जाण्याचा दृढनिश्चय करतो तेव्हा देव आपल्या निर्णयाला इच्छा नसताना मान्यता देण्याशिवाय आणखी काही करू शकत नाही.

इतरांचा न्याय करण्याच्या बाबतीत आणखी एक गोष्ट विचारात घेण्यासारखी आहे. जेव्हा आपण इतरांचा न्याय करतो, तेंव्हा त्याची आपल्यावर नकारात्मक प्रतिक्रिया होते. जेव्हा आम्ही इतरांचा निषेध करतो, तेंव्हा या प्रक्रियेत आपण केवळ स्वतःचा निषेध करीत असतो. न्यायाच्या प्रक्रियेत आपल्याला खरोखर कोणाची भीती बाळगण्याची गरज आहे हे पाहण्यासाठी फक्त आपल्याला आरशात पाहण्याची आवश्यकता आहे.

व्यभिचारात अडकलेल्या स्त्रीशी येशू ज्या प्रकारे वागला त्यावरून देव कसा न्याय करतो याची जाणीव होते: पण येशू जैतुनांच्या डोंगराकडे गेला. नंतर पहाटेस तो पुन्हा मंदिरात आला तेव्हा सर्वलोक त्याच्याकडे आले आणि तो बसून त्यांना शिकवू लागला. त्या वेळी व्यभिचार करत असताना धरलेल्या एका स्त्रीला शास्त्री व परूशी ह्यांनी त्याच्याकडे आणले व तिला मध्ये उभे करून ते त्याला म्हणाले, “गुरूजी, ही स्त्री व्यभिचार करत असताना धरण्यात आली. मोशेने नियमशास्त्रात आम्हांला अशी आज्ञा दिली आहे की, अशांना दगडमार करावा; तर आपण हिच्याविषयी काय म्हणता?“

त्याला दोष लावायला आपणांस काहीतरी मिळावे म्हणून त्याची परीक्षा पाहण्याकरता ते असे म्हणाले. येशू तर खाली ओणवून बोटाने जमिनीवर लिहू लागला. आणि ते त्याला एकसारखे विचारत असता तो उठून त्यांना म्हणाला, "तुमच्यामध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा." मग तो पुन्हा खाली ओणवून जमिनीवर लिहू लागला. हे शब्द ऐकून वृद्धांतल्या वृद्धापासून तो थेट शेवटल्या माणसापर्यंत ते सर्व एकामागून एक निघून गेले; येशू एकटा राहिला आणि तेथेच ती स्त्री मध्ये उभी होती. नंतर येशू उठला व त्या स्त्रीशिवाय तेथे कोणी नाही असे पाहून तिला म्हणाला, "बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत? तुला कोणी दंड ठरवला नाही काय?" ती म्हणाली, "प्रभूजी, कोणी नाही." तेव्हा येशू तिला म्हणाला, मीही तुला दंड ठरवत नाही; जा; ह्यापुढे पाप करू नकोस. (योहान ८:१-११)

ज्या स्त्रीला येशुसमोर आणले होते आणि जिला नियमशास्त्र मोडणारी म्हणून सादर केले गेले होते, तिचा वापर धार्मिक नेत्यांनी येशूला उद्ध्वस्थ करण्याच्या त्यांच्या योजनेत केला, कारण त्यांनी येशूला त्यांच्या धर्माविरुद्ध धोका म्हणून पाहिले होते. त्या स्त्रीला दोषी ठरविणाऱ्यांनी मोशेच्या नियमांचा हवाला दिला. परुशींबरोबरच्या दुसऱ्या भेटीत, येशूने त्यांना सांगितले की मोशेच्या नियमशास्त्रात त्यांच्या कठोर अंतःकरणामुळे घटस्फोटाची तरतूद केली आहे. "येशू त्यांना म्हणाला, तुमच्या अंतःकरणाच्या कठीणपणामुळे त्याने ही आज्ञा तुमच्यासाठी लिहून ठेवली;" (मार्क १०:५).

या न्यायाच्या दृश्यात काय घडले याची तीव्रता स्पष्ट होईल जेव्हा आपल्याला हे समजते की येशू पृथ्वीवर देव आहे आणि निर्णयाच्या अधिकारासह त्याकडे देवत्वाचे सर्व अधिकार आहेत. येशूने आपल्यासमोर आणलेल्या प्रकरणात तातडीने निर्णय घेतला नाही, त्या ऐवजी खाली वाकून जमिनीवर काही लिहिले. जेव्हा त्यांनी येशूला त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी दबाव आणला, तेव्हा तो त्यांना म्हणाला, "जर तुमच्यापैकी कोणी पाप केले नाही तर त्याने प्रथम तिच्यावर दगड फेकला पाहिजे." त्यानंतर येशू पुन्हा जमिनीवर लिहू लागला.

येशू जे बोलला आणि त्याने जे केले त्या सर्व गोष्टींमध्ये त्याचा एक उद्देश होता. जेव्हा तो जमिनीवर लिहित होता, तेव्हा ते धार्मिक नेत्यांच्या प्रश्नांना टाळावे म्हणून लिहीत नव्हता, तर कोणत्या परिस्थितीत त्या स्त्रीला त्याच्या समोर सादर केले गेले होते हे त्याला माहित होते. तिच्यावर आरोप करणाऱ्या सर्वांचा इतिहास येशूला माहित होता आणि त्याने त्या सर्वांच्या मनातील हेतू व विचार वाचले होते. साक्षीदारांच्या उपस्थितीत तो या ढोंगी लोकांवर कठोर टीका करू शकला असता, पण त्याऐवजी, त्याने धार्मिक नेत्यांना त्यांची पापे कृपापुर्वक धुळीत लिहून दिली‌ त्यांच्या पापांची एक अपवादात्मक मिटून जाणारी लेखी नोंद त्यांच्या पुढे सादर केली.

हे माहित असूनही की ते कोणत्या परिस्थितीत आणि कोणत्या विचारांनी एकत्र जमले आहेत, येशू आपल्या भोवती जमलेल्या प्रत्येक व्यक्तीवर नितांत प्रेम करीत होता आणि त्याने प्रत्येक व्यक्तीला अमर्यादपणे मौल्यवान समजले. त्याचे ध्येय जगाला वाचविणे होते आणि त्या महिलेची आणि तिच्यावर आरोप करणाऱ्यांशी पुन्हा समेट करण्याची त्याची इच्छा होती. हे लोक त्याच्या पासून दुरावले जावे अशी त्याची इच्छा नव्हती.

येशू धार्मिक नेत्यांना म्हणाला, "तुमच्यामध्ये जो पाप विरहित आहे त्याने तिच्यावर प्रथम दगड फेकावा." येथे तो त्यांच्याकडे परत न्यायनिवाडा करण्याची जबाबदारी सोपवतो. येशू या जगात न्याय करण्यासाठी आणि कुणालाही दोषी

ठरविण्यासाठी आला नाही आणि न्यायाधीशाची भूमिका बजावण्यास आला नाही. शास्त्री आणि परुशी यांनी येशूचे शब्द स्त्रीवर दगडफेक करण्याचे आमंत्रण म्हणून घेतले का? खरे पाहता नाही, कारण ते सर्व एक एक करून' दृश्यातून बाहेर पडले.

येशूने, देव या नात्याने, स्त्रीला दोषी ठरवले नाही, परंतु "जा आणि यापुढे पाप करू नको" अशा शब्दांत त्याने तिच्यासाठी जीवनाचा मार्ग उघडला. तो तिला केवळ तिला आपले पाप सोडण्याची आज्ञा देत नव्हता; देव आपल्या विश्वासाच्या लायक नाही या प्राणघातक पापापासून आणि विश्वासापासून तो तिला मुक्ती देत होता.

भविष्यात होणारी शिक्षा टाळण्यासाठी येशूने या स्त्रीला मार्ग दाखविला. एक व्यक्ती म्हणून त्याने तिच्यावर देवाचे प्रेम प्रकट केले. ती स्त्री जीवन देणाऱ्याच्या उपस्थितीत होती आणि ती त्याच्या वर प्रेम करू शकत होती आणि विश्वास ठेऊ शकत होती. या घटणेनंतर देवाबाद्दलचा तिचा दृष्टीकोन आणि देवासोबतचे तिचे नाते यामध्ये अमुलाग्र बदल झाला जो कि चांगल्यासाठीच होता. येशूने तिच्यासाठी ज्या पद्धतीने न्याय केला, तो जीवन परिवर्तन करणारा आणि जीवनदान देणारा होता.

येशूने कठोर मनाचे असलेल्या शास्त्री आणि परुशी, ज्यांनी त्या महिलेस त्वरित दोषी ठरविले, त्यांना दोषी ठरविले नाही, परंतु त्याने त्यांच्या समोर एक अध्यात्मिक आरसा ठेवला ज्यात त्यांच्या स्वतःचे काळे चरित्र त्यांना दिसले. याच्या परिणामस्वरूप ते, "स्वतःच्या विवेकाने दोषी ठरविले गेले" आणि त्यांना जीवन-दात्याच्या शुद्ध, निःस्वार्थ प्रेमाची उपस्थिती सोडणे भाग पडले. ते दुसऱ्याला दोषी ठरविण्यासाठी आले होते पण या प्रक्रियेत शेवटी स्वतः दोषी ठरले.

तेव्हा हे मानवा, दोष लावणारा तू कोणीही असलास तरी स्वतः तुला सबब नाही; कारण ज्यात तू दुसऱ्याला दोष लावतोस त्यात तू स्वतःला दोषी ठरवतोस; कारण दोषी ठरवणारा तूही त्याच गोष्टी करतोस. पण अशा गोष्टी करणाऱ्यांविरुद्ध देवाचा न्याय सत्यानुसार आहे हे आपल्याला ठाऊक आहे. तर हे मानवा, अशा गोष्टी करणाऱ्यांना जो तू दोष लावतोस व स्वतः त्याच करतोस, तो तू देवाच्या न्यायातून सुटशील असे तुला वाटते काय? (रोम. २:१-३)

देव आपल्या प्रत्येकाला खरे स्वातंत्र्य देतो. तो आमची स्वतःचा न्याय करण्याची निवड अधिलिखित करणार नाही. जेव्हा आपण प्रेम आणि जीवनाच्या वर्तुळाबाहेर राहण्याचे निवडतो तेव्हा देवाचा न्याय हा या निर्णयाला इच्छा नसताना मान्यता देतो. या न्यायापासून सुटका नाही, कारण देव जो आपल्याला जीवनाकडे घेऊन जातो तो आपल्या इच्छेविरुद्ध मार्गावर चालण्यासाठी आपल्याला जबरदस्ती करत नाही.

कारण, देव पिता कोणाचाही न्याय करीत नाही, परंतु न्याय करण्याचा सर्व अधिकार पित्याने पुत्राला दिलेला आहे. (योहान ५:२२)

देव, पिता, आमचा न्याय करीत नाही. आत्मा हा जिवंत करणारा आहे, देहापासून काही लाभ नाही; मी जी वचने तुम्हांला सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत. (योहान ६:६३)

येशूचे शब्द जीवन आहेत. येशूने बोललेल्या प्रत्येक शब्दात त्याने देव आणि सलोख्याचे प्रेम प्रकट केले.

तेव्हा येशू मोठ्याने म्हणाला, जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो माझ्यावर विश्वास ठेवत नाही तर ज्याने मला पाठवले त्याच्यावर ठेवतो. आणि जो मला पाहतो तो ज्याने मला पाठवले त्याला पाहतो. जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो त्याने अंधकारात राहू नये म्हणून मी जगात प्रकाश असा आलो आहे. आणि जो कोणी माझी वचने ऐकतो पण ती पाळत नाही त्याचा न्याय मी करत नाही; कारण मी जगाचा न्याय करण्यासाठी नव्हे, तर जगाचे तारण करण्यासाठी आलो आहे. जो माझा अव्हेर करतो व माझ्या वचनांचा स्वीकार करत नाही त्याचा न्याय करणारे कोणी आहे; जे वचन मी सांगितले, तेच शेवटल्या दिवशी त्याचा न्याय करील.
(योहान १२:४४-४८)

येशू आपला न्याय करीत नाही. देव आम्हाला जीवनाचा शब्द देऊ करतो, परंतु तो आम्हाला कधीही ते स्वीकारण्यास जबरदस्ती करत नाही.

तुमचे दोष काढण्यात येऊ नयेत म्हणून तुम्ही कोणाचे दोष काढू नका. कारण ज्या प्रकारे तुम्ही दोष काढाल त्या प्रकारेच तुमचे दोष काढण्यात येतील आणि ज्या मापाने तुम्ही मापून द्याल त्याच मापाने तुम्हांला मापून देण्यात येईल. तू आपल्या डोळ्यातले मुसळ ध्यानात न आणता आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ का पाहतोस? अथवा तुझ्या डोळ्यातले कुसळ मला काढू दे असे तू आपल्या भावाला कसे म्हणशील? पाहा, तुझ्या डोळ्यात तर मुसळ आहे. अरे ढोंग्या, पहिल्याने आपल्या डोळ्यातले मुसळ काढून टाक म्हणजे आपल्या भावाच्या डोळ्यातले कुसळ काढण्यास तुला स्पष्ट दिसेल. (मत्तय ७:१-५)

जर देव पिता आमचा न्याय करीत नाही आणि येशू आमचा न्याय करीत नाही, आम्ही असे का समजतो की आम्ही इतरांचा न्याय करण्यास पात्र आहोत (आमच्या स्वतःच्या डोळ्यात मुसळ आहे)?

मी तुम्हांला खचीत खचीत सांगतो, जो माझे वचन ऐकतो आणि ज्याने मला पाठवले त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त झाले आहे; आणि त्याच्यावर न्यायाचा प्रसंग येणार नाही, तो मरणातून जीवनात पार गेला आहे.
(योहान ५:२४)

देवाबद्दलचे सत्य समजून घेणे आणि विश्वास ठेवणे शिकणे आम्हाला जीवनाकडे नेते. येशू म्हणाला, "जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही." (योहान ३:१८)

तेव्हा पौल व बर्णबा हे निर्भीडपणे म्हणाले, देवाचे वचन प्रथम तुम्हांला सांगण्याचे अगत्य होते; तरी ज्या अर्थी तुम्ही त्याचा अव्हेर करता व आपणांला सार्वकालिक जीवनाकरता अयोग्य ठरवता त्या अर्थी पाहा, आम्ही परराष्ट्रीयांकडे वळतो.
(प्रेषितांची कृत्ये १३:४६)

हे आत्म-निषेधाचे एक ज्ञानी उदाहरण आहे.

तुम्ही कोणाचे दोष काढू नका, म्हणजे तुमचे दोष कोणी काढणार नाही; कोणाला दोषी ठरवू नका म्हणजे तुम्हांला कोणी दोषी ठरवणार नाही; क्षमा करा म्हणजे तुमची क्षमा होईल; (लूक ६:३७)

लुकच्या सुवार्तेमध्ये उधळपट्टी केलेल्या मुलाचा उपदेश आपल्याला शिकवतो की देवाने आपल्याला आधीच क्षमा केली आहे. जर आपला न्याय केला जातोय, किंवा आपल्याला दोषी ठरविले जातेय किंवा क्षमा केले जात नाही तर आपण स्वतःला दोषी धरले पाहिजे कारण माणूस जे काही पेरतो त्याचेच त्याला पीक मिळेल. (गलती. ६:७)

तेव्हा येशू म्हणाला, “मी न्यायनिवाड्यासाठी ह्या जगात आलो आहे; ह्यासाठी की, ज्यांना दिसत नाही त्यांना दिसावे आणि ज्यांना दिसते त्यांनी आंधळे व्हावे.“ परूश्यांतील जे त्याच्याजवळ होते त्यांनी हे ऐकून त्याला म्हटले, “आम्हीही आंधळे आहोत काय?“ येशू त्यांना म्हणाला, तुम्ही आंधळे असता तर तुम्हांला पाप नसते; परंतु आम्हांला दिसते असे तुम्ही आता म्हणता, म्हणून तुमचे पाप तसेच राहते. (योहान ९:३९-४१)

येशू जगात ज्यासाठी आला तो “न्याय“ म्हणजे काय? तो मानवजातीवर असलेले देवाचे प्रेम आणि देवासाठी आपल्यातील प्रत्येकाचे असलेले अनंत मूल्य प्रकट करण्यासाठी या जगात आला. त्याची इच्छा आहे की आम्ही एकमेकांना तसेच पाहावे जसे तो आम्हाला पाहतो, आणि एकमेकांचे तितकेच मूल्य करावे जितके तो आपले करतो. येशू आपल्याला इतरांच्या पापांबद्दल तसेच कृत्रिमरीत्या तयार केलेल्या मतभेदांकडे दुर्लक्ष करण्यास शिकवत आहे: मग ती सांप्रदायीकता, राष्ट्रवाद, अदिवासीवाद, पक्षपाती राजकारण किंवा आपल्याविरुद्ध मानसिक उत्तेजन देणारी कोणतीही इतर साधने असो.

परुश्यांना येशू शिकवीत असलेला हा धडा समजला नाही. ते कट्टरपंथीय होते आणि इतर परदेशी जे यहुदी वंशाचे नव्हते, त्यांना कुत्रा म्हणून पाहत होते. इतरांची पापे बघण्यात आणि त्याचा न्यायनिवडा करण्यात ते खूप जास्त तज्ञ होते.

देवाने जगावर एवढी प्रीती केली की, त्याने आपला एकुलता एक पुत्र दिला, अशासाठी की, जो कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याचा नाश होऊ नये तर त्याला सार्वकालिक जीवन प्राप्त व्हावे. देवाने आपल्या पुत्राला जगाचा न्यायनिवाडा करण्यासाठी नव्हे, तर त्याच्या द्वारे जगाचे तारण व्हावे म्हणून पाठवले. जो त्याच्यावर विश्वास ठेवतो त्याच्यावर न्याय-निवाड्याचा प्रसंग येत नाही. जो विश्वास ठेवत नाही त्याचा न्यायनिवाडा होऊन चुकला आहे; कारण त्याने देवाच्या एकुलत्या एक पुत्राच्या नावावर विश्वास ठेवला नाही. निवाडा हाच आहे की, जगात प्रकाश आला आहे आणि मनुष्यांनी प्रकाशापेक्षा अंधाराची आवड धरली; कारण त्यांची कृत्ये दुष्ट होती. (योहान ३: १६-१९)

या शास्त्रभागात, नावाचा अर्थ चारित्र्य आहे. येशूने प्रकाशात आणलेल्या देवाच्या चारित्राच्या साक्षात्काराला नकार देणे म्हणजे वास्तविकतेने देवाला नकार देणे होय. येशूमध्ये देव म्हणत आहे- मी खरोखर असाच आहे.

प्रातःकाळ झाल्यावर सर्व मुख्य याजक व लोकांचे वडील ह्यांनी येशूला जिवे मारण्यासाठी त्याच्याविरुद्ध मसलत केली; आणि त्यांनी त्याला बांधून नेऊन सुभेदार पिलात ह्याच्या स्वाधीन केले. (मत्त. २७:१-२)

काय दृश्य आहे हे! पाप-संतृप्त धर्मवादी लोक त्यांच्या जीवनदाताचा मृत्यू शोधत आहेत, आणि तो त्यांचा प्रतिकार करीत नाही किंवा त्यांच्यावर न्याय प्रसंग येऊ देत नाही! कोण किंवा काय प्राणघातक आहे- देव की पाप?

आम्ही ख्रिस्ताच्या मृत्यूच्या शेवटच्या तासांबद्दल आणि त्याच्या वधस्तंभावर जाण्यामागील सखोल अर्थ न समजता त्यांबद्दल वाचतो आणि ऐकतो. येशू पूर्णपणे देव तसेच पूर्णपणे मनुष्य आहे. जेव्हा पोंटीयस पिलाता समोर येशूला परीक्षेसाठी आणण्यात आले तेव्हा तो पूर्णपणे देव होता. जेव्हा त्याचा न्याय करण्यात आला आणि त्याला दोषी ठरविण्यात आले, तेव्हा तो पूर्णपणे देव होता. जेव्हा त्याला चाबकाचे फटके मारले गेले, त्याची चेष्टा केली गेली व त्याला मारण्यासाठी वधस्तंभावर खिळ्यांनी ठोकण्यात आले, त्या सर्वकाळी, तो देव होता.

देवाने स्वतःला परीक्षेत आणण्याची परवानगी दिली आणि ज्यांच्यावर तो प्रेम करतो आणि ज्यांच्याशी तो समेट करू इच्छित होता त्यांच्याकडून त्याची निंदा होऊ दिली. का? कारण आपल्या पापाने त्याचे काय केले हे पाहणे आपल्याला खूप कठीण आहे.

देवाचा पुत्र येशू याला पृथ्वीवरील अंतिम काही तासांदरम्यान आपल्या कल्पनेपेक्षा खूप अधिक त्रास सहन करावा लागला. पण गेथसेमेनी बागेत येशूच्या त्रासाची सुरुवात झाली नाही किंवा वधस्तंभावर असतांना त्याच्या शेवटच्या शब्दांनी ही नाही. पाप आपल्या जगात जेव्हा आले तेव्हापासून देवाने आमच्याबरोबर आणि आमच्यासाठी दु:ख भोगले आहे, आणि पापाच्या विनाशकारी मार्गाचा शेवट होई पर्यंत आणि पापाचा शाश्वत अंतः होईपर्यंत तो आपल्याबरोबर आणि आपल्यासाठी दुःख भोगणार आहे.

येशूच्या अतुलनीय प्रेमाची वाटणी करण्यासाठी त्याने निर्माण केलेल्या लोकांच्या हातून झालेली परीक्षा आणि दुःख हे आपल्याला देवाने हजारो वर्षांपासून सहन केलेल्या दुःखाचे चित्र दाखवते. आपण आपल्या मानवी उदासीनता, निष्क्रियता, अलिप्तपणा, प्रतिशोधात्मक नाश, आणि अगदी सक्रियपणाच्या आरोपांना उत्तर देण्यासाठी आम्ही देवाला जबाबदार धरतो. अनेक वेळा आपण देवाला दोषी ठरवतो!! आपल्याला सोडून गेलेल्या मुलांशी पुन्हा समेट करण्यासाठी देव आणखी काय करू शकतो? क्रूस हा सलोखा करण्याचा उत्कृष्ट दैवीनमुना आहे. देव स्वतःची सेवा करणारा, निष्काळजी आणि अविश्वासू आहे या सैतानाच्या खोट्या दाव्याला क्रूस दूर करतो. आपण देवाचे चारित्र्य जितके काळे केले आहे, त्या पेक्षा अधिक एक चांगली बातमी आहे आपण त्याला चुकीचा का समजतो हे देव जाणतो आणि त्याबद्दल तो आपल्याला दोषी ठरवीत नाही. त्याने आपल्यासाठी जे केले आहे आणि जे तो दररोज करतो आणि करत राहील याची कृतज्ञता नसतांनाही तो आपल्यावर प्रेम करत राहील. परंतु हे सर्व आपल्यासाठी आश्चर्यकारक नाही का; कि आपला निर्माणकर्ता देखील या आपल्या दुविधेमध्ये अगदी जवळून जुडलेला आहे. आपण त्याच्याबद्दल विचार करू शकतो का? आपण स्वतःला तो जसा आहे तसा बघण्याची परवानगी देऊ शकतो का? निस्वार्थी, इतर-केंद्रित प्रेम, आणि तो ज्या प्रेमास पात्र आहे ते प्रेम आपण त्याला देऊ शकतो का? ही मागणी खूप जास्त आहे का?

"पहिल्याने त्याने आपल्यावर प्रीती केली, म्हणून आपण त्याच्यावर प्रीती करतो." (१ योहान ४:१९).

***त्यांच्या सर्व दुःखाने तो दुःखी झाला, त्याची प्रत्यक्षता दर्शवणाऱ्या दिव्यदूताने त्यांचे तारण केले; त्याने आपल्या प्रीतीने व आपल्या करुणेने त्यांना उद्धरले; पूर्वीचे सर्व दिवस त्याने त्यांचे लालनपालन केले. यशया ६३:९***

## 22. देवाचा न्याय कसा आहे?

चांगले करण्यास शिका, नीतीच्या मागे लागा, जुलम्याला ताळ्यावर आणा; अनाथाचा न्याय करा; विधवेचा कैवार घ्या. (यशया १:१७)

देवाचा निर्णय कधीही आपल्याविरुद्ध न्यायिक शिक्षा देत नाही. अन्यायी जगात न्याय वाढवणे आणि दु:ख दूर करणे अशी याठिकाणी व्याख्या दिली आहे.

पाहा, हा माझा सेवक, ह्याला मी निवडले आहे; तो मला परमप्रिय आहे; त्याच्याविषयी माझा जीव संतुष्ट आहे; त्याच्यावर मी आपला आत्मा घालीन, तो परराष्ट्रीयांना न्याय कळवील. तो भांडणार नाही व ओरडणार नाही, व रस्त्यांवर त्याची वाणी कोणाला ऐकू येणार नाही. चेपलेला बोरू तो मोडणार नाही, व मिणमिणती वात तो विझवणार नाही; तो न्यायाला विजय देईल तोपर्यंत असे होईल, आणि परराष्ट्रीय त्याच्या नावाची आशा धरतील. (मत्तय. १२:१८-२१)

देवाचा सौम्य निर्णय व न्याय आपल्या मनातील विश्वास वाढवतो.

तुम्ही आपल्या भूमीतील पिकाची कापणी कराल तेव्हा तू आपल्या शेताच्या कोनाकोपऱ्यातील पीक झाडून सारे कापू नकोस आणि पीक काढून घेतल्यावर त्यातील सरवा वेचू नकोस. आपला द्राक्षमळाही झाडून सारा खुडू नकोस, तशीच द्राक्षमळ्यात पडलेली फळे गोळा करू नकोस, गरीब व उपरे ह्यांच्यासाठी ती राहू द्यावीत; मी परमेश्वर तुमचा देव आहे. (लेवीय १९:९-१०)

हे वाचल्यानंतर आपल्याला समजते की देवाने प्राचीन समाजातील वंचितांसाठी सोय व त्यांसाठी तरतूद करण्याचा प्रयत्न केला.

कोणी परदेशीय तुमच्या देशात तुमच्याबरोबर राहत असला तर त्याला उपद्रव देऊ नका. तुमच्याबरोबर राहणाऱ्या परदेशीय मनुष्याला तुम्ही स्वदेशीय मनुष्यासारखेच लेखा; आणि त्याच्यावर स्वत:सारखी प्रीती करा; कारण तुम्हीही मिसर देशात परदेशीय होता; मी परमेश्वर तुमचा देव आहे. न्याय करण्यात, मोजणी करण्यात, तोलण्यात अथवा मापण्यात काही अन्याय करू नका. तुमच्याजवळ खरी तागडी, खरी वजने, खरा एफा व खरा हिन असावा; ज्याने तुम्हांला मिसर देशातून बाहेर आणले तो मी परमेश्वर तुमचा देव आहे; (लेवीय १९:३३-३६)

जे अन्यायाचे निर्णय करतात व जे लेखक उपद्रवकारक ठराव लिहितात त्यांना धिक्कार असो. ते दाद मागणाऱ्या दुबळ्यांना धुडकावून लावतात व माझ्या प्रजेतल्या गरिबांचे हक्क बुडवतात; ते विधवांना लुटतात व पोरक्यांना नागवतात. (यश.१०:१-२)

देव सर्व समावेशक आहे – तो प्रत्येक व्यक्तीला आपल्या कुटुंबाचा सदस्य मानतो. देवाला मानवी कायदे, व्यवसाय पद्धती आणि गरीबांच्या खर्चावर श्रीमंतांना फायदा होणाऱ्या व्यवस्थांची जाणीव आहे. तो अशा लोकांना आणि संस्थाचालकांना लुटारू म्हणतो. व्यापारातील कोणतीही चुकीची प्रथा बायबलमध्ये 'चोरी' म्हणून परिभाषित केली आहे.

आम्ही उपास करतो ते तू का पाहत नाहीस? आम्ही आपल्या जिवास पीडा देतो ती तू का लक्षात आणत नाहीस? पाहा, आपल्या उपासाच्या दिवशी तुम्ही आपले कामकाज चालवता, तुम्ही आपल्या सर्व मजुरांकडून काबाडकष्ट करवता. पाहा, तुमच्या उपासांचा परिणाम तर असा होतो की तुम्ही त्या वेळी कटकटी करता व दुष्टपणाने ठोसाठोशी करता; तुमचा शब्द उर्ध्वलोकी ऐकू जावा ह्यासाठी तुमचे हल्लीचे उपास आहेत असे नाही. मला पसंत पडणारा असा हा उपास आहे काय? मनुष्याच्या जिवास पीडा व्हावी असा हा तुमचा उपासाचा दिवस आहे काय? लव्हाळ्यासारखे आपले डोके लववणे आणि आपल्या अंगाखाली गोणपाट व राख पसरणे ह्याला उपास म्हणतोस काय? आणि असा दिवस परमेश्वराला मान्य होईल काय? दुष्टतेच्या बेड्या तोडाव्यात, जुवाच्या दोऱ्या सोडाव्यात, जाचलेल्यांना मुक्त करावे, सगळे जोखड मोडावे, हाच मला पसंत असा उपास नव्हे काय? तू आपले अन्न भुकेल्यांना वाटावे; तू लाचारांना व निराश्रितांना आपल्या घरी न्यावे; उघडा दृष्टीस पडल्यास त्याला वस्त्र द्यावे; तू आपल्या बांधवाला तोंड लपवू नये हाच तो उपास नव्हे काय? (यश.५८:३-७)

जर आपण गरजूंना मदत करण्यात दुर्लक्ष केले तर फक्त धार्मिक कार्य करणे व्यर्थ आहे. येशू म्हणाला, तुझा धिक्कार असो, परुशी! कारण तुम्ही पुदिना, रुई आणि सर्व वनस्पतींचा दशांश देता. परंतु तुम्ही न्यायावर आणि देवावरील प्रीति याकडे दुर्लक्ष करतात. (लूक ११:४२).

सेनाधीश परमेश्वर म्हणाला आहे: तुम्ही खरा न्याय करा व एकमेकांना प्रेम व करुणा दाखवा, आणि विधवा, अनाथ, परके व निराश्रित ह्यांच्यावर जुलूम करू नका व आपल्या भावाला इजा करण्याचे मनात आणू नका. (जखऱ्या.७:९-१०)

देव कोणत्याही प्रकारच्या छळास मान्यता देत नाही किंवा कोणत्याही प्रकारे दुसऱ्याच्या खर्चाने एखाद्याचा स्वतःचा फायदा करून घेण्याच्या व्यवस्थांना मान्यता देत नाही.

माझ्या बंधूंनो, गौरवशाली प्रभू म्हणजे आपला प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्यावर विश्वास ठेवणारे तुम्ही तोंड पाहून वागू नका. सोन्याची अंगठी घातलेला व भपकेदार कपडे घातलेला एखादा माणूस तुमच्या सभास्थानात आला, आणि भिकार कपडे पांघरलेला एक दरिद्रीही आला; आणि तुम्ही भपकेदार कपडे घातलेल्या इसमाकडे पाहून म्हणता, ही जागा चांगली आहे, येथे बसा; आणि दरिद्र्याला म्हणता, तू येथे उभा राहा, किंवा माझ्या पदासनाजवळ खाली बस; तर तुम्ही आपल्यामध्ये भेदभाव ठेवता की नाही? आणि दुर्विचारी न्यायाधीश बनता की नाही? माझ्या प्रिय बंधूंनो, ऐका; लोकदृष्टीने जे दरिद्री आहेत त्यांना विश्वासासंबंधाने धनवान होण्यास आणि जे राज्य देवाने आपल्यावर प्रीती करणाऱ्यांना देऊ केले त्याचे वारस होण्यास त्याने निवडले आहे की नाही? पण तुम्ही दरिद्र्याचा अपमान केला आहे. धनवान लोक तुमच्यावर जुलूम करतात आणि तेच तुम्हांला न्यायसभेत ओढून नेतात की नाही? जे उत्तम नाव तुम्हांला प्राप्त झाले आहे त्याची निंदा तेच करतात की नाही? तथापि, तू आपल्यासारखी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर, ह्या शास्त्रलेखातील राजमान्य नियम तुम्ही पूर्णपणे पाळत आहात तर ते बरे करता. (याकोब२:१-८)

देवाजवळ पक्षपात नाही. आम्ही सर्व त्याच्या दृष्टीने एकसारखे आहोत. “देव पक्षपाती नाही“ (प्रेषितांची कृत्ये १०:३४)

अनाथ व विधवा यांच्या संकटात जो त्यांची काळजी घेतो, व स्वतःला जगातील बिघडलेल्या वातावरणापासून दूर ठेवतो, अशा मनुष्याची धार्मिकता देवासामोर शुद्ध व निर्दोष ठरते. (याकोब १:२७)

सांप्रदायिकता, औपचारिकता, कट्टरतावाद, भावनिकता किंवा मंडळींची अनुरूपता हा शुद्ध धर्म नाही.

तेव्हा राजा आपल्या उजवीकडच्यांना म्हणेल, अहो, माझ्या पित्याचे आशीर्वादितहो, या; जे राज्य जगाच्या स्थापनेपासून तुमच्याकरता सिद्ध केले आहे ते वतन घ्या; कारण मी भुकेला होतो तेव्हा तुम्ही मला खायला दिले, तान्हेला होतो तेव्हा मला प्यायला पाणी दिले, परका होतो तेव्हा मला घरात घेतले, उघडा होतो तेव्हा मला वस्त्र दिले, आजारी होतो तेव्हा माझ्या भेटीला आलात, बंदिशाळेत होतो तेव्हा तुम्ही माझ्याकडे आलात. त्या वेळेस नीतिमान त्याला उत्तर देतील की, प्रभूजी, आम्ही तुम्हांला केव्हा भुकेले पाहून खायला दिले? केव्हा तान्हेले पाहून प्यायला दिले? तुम्हांला परके पाहून केव्हा घरात घेतले? उघडे पाहून केव्हा वस्त्र दिले? आणि तुम्हांला आजारी अथवा बंदिशाळेत पाहून केव्हा आम्ही तुमच्याकडे आलो? तेव्हा राजा त्यांना उत्तर देईल, मी तुम्हांला खचीत सांगतो की, ज्या अर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्या अर्थी ते मला केले आहे. (मत्तय. २५:३४–४०)

येशूचा भाऊ किंवा बहीण होण्यासाठी काय पात्रता आहेत? फक्त एकच आहे: ती म्हणजे मानवजातीचा सदस्य होणे, आणि आपण सर्व येशूच्या कुटुंबातील सदस्य आहोत.

***मी तुम्हांला सांगतो की, पूर्वेकडून व पश्चिमेकडून पुष्कळ जण येतील आणि स्वर्गाच्या राज्यात अब्राहाम, इसहाक व याकोब ह्यांच्या पंक्तीस बसतील; – येशू (मत्तय ८:११)***

# 23. देव नम्र आहे

देव हा विश्वातील सर्वात सामर्थ्यवान जीव असताना; त्याच वेळी तो सर्वात नम्र देखील आहे.

तेव्हा देवदूत त्यांना म्हणाला, "भिऊ नका; कारण पाहा, जो मोठा आनंद सर्व लोकांना होणार आहे त्याची सुवार्ता मी तुम्हांला सांगतो; ती ही की, तुमच्यासाठी आज दाविदाच्या गावात तारणारा जन्मला आहे, तो ख्रिस्त प्रभू आहे. आणि तुम्हांला खूण ही की, बाळंत्याने गुंडाळलेले व गव्हाणीत ठेवलेले एक बालक तुम्हांला आढळेल." (लूक २:१०-१२)

देव नम्रपणे या जगात आला. - त्याचा जन्म गाईच्या गोठ्यात निरुपद्रवी बाळ म्हणून झाला होता.

माझ्या पित्याने माझ्या हाती सर्वकाही दिले आहे आणि पित्यावाचून पुत्राला कोणी ओळखत नाही, आणि पुत्रावाचून व ज्या कोणास त्याला प्रकट करण्याची पुत्राची इच्छा असेल, त्याच्यावाचून पित्याला कोणी ओळखत नाही. अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन. मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे "तुमच्या जिवांना विसावा मिळेल. कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे." (मत्तय ११:२८-३०)

या पेक्षा अधिक देवाचा पुत्र, येशू, स्पष्ट कसा असू शकतो? तो म्हणतो, "मी विनम्र आणि मनाने नम्र आहे." येशू त्याला म्हणाला, "कोल्ह्यांना राहायला बिळे आणि आकाशातील पाखरांना घरटी आहेत. परंतु मनुष्याच्या पुत्राला डोके सुद्धा टेकावयास जागा नाही." (मत्तय. ८:२०)

येथे येशू स्वतःची ओळख एका मानवी समाजातील सर्वात गरीब आणि बेघर सदस्यांपैकी करतो.

नंतर त्यांनी त्याच्या अंगावर जांभळे वस्त्र चढवले आणि काट्यांचा मुकुट गुंफून त्याला घातला. आणि ते मुजरा करून त्याला म्हणू लागले, "हे यहूद्यांच्या राजा, तुझा जयजयकार असो." त्यांनी त्याच्या मस्तकावर वेताने मारले; ते त्याच्यावर थुंकले आणि गुडघे टेकून त्यांनी त्याला नमन केले. अशी त्याची थट्टा केल्यावर त्यांनी त्याच्या अंगावरून जांभळे वस्त्र काढून त्याचे स्वतःचे कपडे त्याला पुन्हा घातले, आणि वधस्तंभावर खिळण्याकरता ते त्याला बाहेर घेऊन गेले. तेव्हा त्यांनी त्याला वधस्तंभावर खिळले, आणि त्याच्या कपड्यांपैकी कोणता कपडा कोणी घ्यावा ह्यासाठी "त्यांवर चिठ्ठ्या टाकून ते वाटून घेतले." त्यांनी त्याच्याबरोबर दोन लुटारू, एक उजवीकडे व एक डावीकडे असे वधस्तंभावर खिळले. आणि अपराध्यांत तो गणलेला होता, हा शास्त्रलेख पूर्ण झाला. (मार्क १५:१७-२०, २४, २७-२८)

त्याच्या नम्र जन्मापासून तर दोन चोरांच्यामध्ये त्याला वधस्तंभावर टांगण्यापर्यंत, देवाचा पुत्र येशू, सतत नम्रता आणि प्रीती दर्शवित होता.

हे मनुष्या, बरे काय ते त्याने तुला दाखवले आहे; नीतीने वागणे, आवडीने दया करणे व आपल्या देवासमागमे राहून नम्रपणे चालणे ह्यांवाचून परमेश्वर तुझ्याजवळ काय मागतो? (मीखा ६:८)

संमतीशिवाय दोन व्यक्ती एकत्र चालू शकतातका? (आमोस ३:३)

जेव्हा आपण देवाप्रमाणे नम्र होतो, तेव्हा आपण देवाबरोबर एकरूपतेने चालतो.

जेव्हा आपण आपल्या सभ्य देवाने दाखवलेल्या नम्रतेची जाणीव करतो तेव्हा आपण त्याच्या विश्वासार्हतेबद्दल तीळ मात्र सुद्धा शंका कशी करू शकतो?

***आम्ही सर्व मेंढरांप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपापला मार्ग धरला होता; अशा आम्हा सर्वांचे पाप परमेश्वराने त्याच्यावर लादले. त्याचे हालहाल केले तरी ते त्याने सोसले, आपले तोंडसुद्धा उघडले नाही; वधण्यास नेत असलेल्या कोकराप्रमाणे, लोकर कातरणाऱ्यांपुढे गप्प राहणाऱ्या मेंढराप्रमाणे, तो गप्प राहिला; त्याने आपले तोंड उघडले नाही. त्याच्यावर जुलूम करून व खटला चालवून त्याला घेऊन गेले; जिवंतांच्या भूमीतून त्याला काढून टाकले, आणि माझ्या लोकांच्या पातकांमुळे त्याला ताडन करण्यात आले; असा त्या पिढीच्या लोकांपैकी कोणीतरी विचार केला काय? त्याची कबर दुर्जनांच्या कबरांमध्ये नेमली होती आणि तो मेल्यावर धनवंताची कबर त्याला प्राप्त झाली; तथापि त्याने काही अधर्म केला नव्हता, त्याच्या मुखात काही कपट नव्हते. (यशया ५३:६-९)***

## 24. देव एक सेवक आहे, गुलामांचा मालक नाही

मी आतापासून तुम्हांला दास म्हणत नाही; कारण धनी काय करतो ते दासाला ठाऊक नसते; परंतु मी तुम्हांला मित्र म्हटले आहे; कारण जे काही मी आपल्या पित्यापासून ऐकून घेतले ते सर्व मी तुम्हांला कळवले आहे.- येशू (योहान१५:१५)

आपण अंध विश्वासने त्याच्या अधीन व्हावे अशी देवाची इच्छा नाही. त्याला आपली मैत्री हवी आहे, जसे आपण एखाद्या जवळच्या मित्राशी बोलतो तसे आपण त्याच्याशी प्रामाणिकपणे बोलले पाहिजे अशी देवाची इच्छा आहे. प्रार्थनेचा हा खरा अर्थ आहे. देवाने आपल्याला तर्क करण्याच्या सामर्थ्याने तयार केले आहे आणि तो आपल्याला त्या क्षमतेचा उपयोग करण्यास आमंत्रित करतो; चला, आपण एकत्र येऊन चर्चा करूया, परमेश्वर म्हणतो. (यशया १:१८)

पण येशूने त्यांना बोलावून म्हटले, परराष्ट्रीयांवर त्यांचे अधिपती प्रभुत्व चालवतात व मोठे लोकही अधिकार करतात, हे तुम्हांला ठाऊक आहे. तसे तुमच्यामध्ये नसावे; तर जो कोणी तुमच्यामध्ये श्रेष्ठ होऊ पाहतो तो तुमचा सेवक होईल, आणि जो कोणी तुमच्यामध्ये पहिला होऊ पाहतो तो तुमचा दास होईल. ह्याप्रमाणे मनुष्याचा पुत्र सेवा करून घेण्यास नाही, तर सेवा करण्यास व पुष्कळांच्या खंडणीसाठी आपला प्राण अर्पण करण्यास आला आहे. (मत्तय. २०:२५-२८)

येशूने जीवनाचा नियम दाखविला - त्याने स्वतःला इतरांच्या सेवेकरीता वाहून टाकले.

नंतर येशू यहूदी लोकांच्या सभास्थानांत सुवार्तेची घोषणा करत व राज्याची सुवार्ता गाजवत आणि लोकांचे सर्व प्रकारचे रोग व सर्व प्रकारची दुखणी बरी करत गालीलभर फिरला. आणि त्याची कीर्ती सूरिया देशभर पसरली; तेव्हा जे नाना प्रकारचे रोग आणि व्यथा ह्यांनी पिडलेले होते, जे भूतग्रस्त, फेफरेकरी व पक्षघाती होते, अशा सर्व दुखणाइतांना त्याच्याकडे आणले, आणि त्याने त्यांना बरे केले. मग गालील, दकापलीस, यरुशलेम, यहूदीया व यार्देनेच्या पलीकडचा प्रदेश ह्यांतून लोकांचे थव्यांचे थवे त्याच्यामागे चालले. (मत्तय ४:२३-२५)

तेव्हा एक कुष्ठरोगी त्याच्याकडे आला व त्याच्यापुढे गुडघे टेकून त्याला विनंती करून म्हणाला, आपली इच्छा असली तर मला शुद्ध करण्यास आपण समर्थ आहात. तेव्हा येशूला त्याचा कळवळा आला. त्याने हात पुढे करून त्याला स्पर्श केला व म्हटले, माझी इच्छा आहे, शुद्ध हो. तेव्हा तो बोलता क्षणीच त्याचे कुष्ठ जाऊन तो शुद्ध झाला. (मार्क १:४०-४२)

येशूने अथक आणि सहानुभूतीने सर्वांच्या सुटकेसाठी काम केले, त्याच्या लक्षात येण्यापलीकडे आणि प्रेमळ काळजी पासून कोणीच लांब राहिले नाहीत. आणि येशूने केलेली दुसरीही पुष्कळ कामे आहेत. ती एकेक लिहिली तर लिहिलेली पुस्तके या जगात ठेवायला जागा पुरणार नाही, असे मला वाटते. (योहान २१:२५)

तेव्हा आपल्या हाती पित्याने अवघे दिले आहे, व आपण देवापासून आलो व देवाकडे जातो हे जाणून भोजन होतेवेळी येशू भोजनावरून उठला, व त्याने आपली बाह्यवस्त्रे काढून ठेवली आणि रुमाल घेऊन कमरेस बांधला. मग तो गंगाळात पाणी ओतून शिष्यांचे पाय धुऊ लागला, आणि कमरेस बांधलेल्या रुमालाने ते पुसू लागला. (योहान १३:३-५)

ख्रिस्ताच्या शेवटच्या भोजनावर त्याची साक्ष देणारी ही "देवाची कृती" या शब्दाचा उल्लेख आहे ज्याची चाचणी व वधस्तंभाच्या काही तास अगोदरच लुकच्या शुभवर्तामानात या प्रसंगी येशूच्या शिष्यांविषयी हे रहस्यमय तपशील दिले आहे: "आणि त्यांच्यात अशासंबंधी वाद निर्माण झाला की, त्यांच्यामध्ये सर्वात श्रेष्ठ कोण आहे." (लूक २२:२४)

अशी परिस्थिती होती: येशूला माहित होते की तो देवापासून आला आहे. सर्व काही त्याच्या हातात होते. याचा अर्थ, येशू पूर्णपणे जागरूक होता की तो देव आहे, सर्व प्रकारच्या सामर्थ्याने देव आहे. त्याला ह्याची देखील जाणीव होती कि त्याच्या स्वतःच्या शिष्यांमध्ये ह्या विषयावर वाद सुरु होता, आपल्यापैकी देवाच्या राज्यात सर्वात महान कोण असेल. येशूने काय केले? त्याने एक रुमाल घेऊन कमरेस बांधला आणि स्वतःबद्दल विचार करणाऱ्या शिष्यांचे पाय धुतले (त्या काळी हे कार्य संस्कृतीत घरच्या गुलामाचे होते).

***अशी जी चित्तवृत्ती ख्रिस्त येशूच्या ठायी होती ती तुमच्या ठायीही असो; तो देवाच्या स्वरूपाचा असूनही देवाच्या बरोबरीचे असणे हा लाभ आहे असे त्याने मानले नाही, तर त्याने स्वतःला रिक्त केले, म्हणजे मनुष्याच्या प्रतिरूपाचे होऊन दासाचे स्वरूप धारण केले. (फिलिप्पैकरांस २:५-७)***

## 25. देव आपल्यावर बिनशर्त प्रेम करतो

स्त्रीला आपल्या पोटच्या मुलाची करुणा येणार नाही एवढा तिला आपल्या तान्ह्या बाळाचा विसर पडेल काय? कदाचित स्त्रियांना विसर पडेल, पण मी तुला विसरणार नाही. पाहा, मी तुला आपल्या तळहातांवर कोरून ठेवले आहे; तुझे कोट नित्य माझ्या दृष्टीसमोर आहेत" (यशया ४९:१५–१६)

"देव आपल्याला विसरला आहे असे आपल्याला वाटू शकते, परंतु भावना नेहमीच वास्तविकतेचे अचूक मोजमाप नसतात. देव म्हणतो तो विसरणार नाही: पाच चिमण्या दोन दमड्यांना विकतात की नाही? तरी त्यांच्यापैकी एकीचाही देवाला विसर पडत नाही. फार तर काय, तुमच्या डोक्याचे सर्व केसही मोजलेले आहेत. भिऊ नका; तुम्ही अनेक चिमण्यांपेक्षा मूल्यवान आहात. (लूक १२:६–७)

कारण माझी खातरी आहे की, मरण, जीवन, देवदूत, अधिपती, वर्तमानकाळच्या गोष्टी, भविष्यकाळच्या गोष्टी, बले, उंची, खोली, किंवा दुसरी कोणतीही सृष्ट वस्तू, ख्रिस्त येशू आपला प्रभू ह्याच्यामध्ये देवाची आपल्यावरील जी प्रीती आहे तिच्यापासून आपल्याला विभक्त करायला समर्थ होणार नाही. (रोम.८:३८–३९)

देवाच्या आपल्यावरील प्रेमाचा अतिरेक करणे अशक्य आहे. त्याच्या प्रेमाचे वर्णन करण्याचे आपले  सर्व प्रयत्न कमी पडतात.

आपल्याला देवाची मुले हे नाव मिळाले ह्यात पित्याने आपल्याला केवढे प्रीतिदान दिले आहे पाहा; (१ योहान ३:१)

आपल्या प्रत्येकासाठी देवाची आशा ही आहे की आपण त्याला आपला स्वर्गीय पिता म्हणून ओळखू. तेव्हा आपण देवाचे पुत्र व कन्या म्हणून आपल्याला आपला वारसा कळेल.

सांभाळा, ह्या लहानातील एकालाही तुच्छ मानू नका; कारण मी तुम्हांला सांगतो, स्वर्गात दिव्यदूत माझ्या स्वर्गातील पित्याचे मुख नित्य पाहतात. [आणखी, जे हरवलेले त्यांना तारायला मनुष्याचा पुत्र आला आहे.] तुम्हांला काय वाटते? कोणाएका मनुष्याजवळ शंभर मेंढरे असली आणि त्यांतून एखादे भटकले तर ती नव्याण्णव मेंढरे डोंगरावर सोडून त्या एक भटकलेल्या चा शोध करण्यास तो जाणार नाही काय? आणि समजा, ते त्याला सापडले तर न भटकलेल्या नव्याण्णवांपेक्षा तो त्यावरून अधिक आनंद करील, असे मी तुम्हांला खचीत सांगतो. तसे ह्या लहानांतील एकाचाही नाश व्हावा अशी तुमच्या स्वर्गातील पित्याची इच्छा नाही. (मत्तय. १८:१०–१४)

सिंहासनावरील गर्विष्ठ राजापासून तर रस्त्यावरील गरीब भिकारी पर्यंत प्रत्येक व्यक्ती देवासाठी मौल्यवान आहे. किती मौल्यवान? जरी पृथ्वीवर फक्त एक पापी असला असता, तरीही येशूने त्या एका पाप्यासाठी स्वर्ग सोडले असते. त्याने मानवी कुटुंबातील केवळ एका सदस्यासाठी दुःख भोगून तो मरण पावला असता.

***तो म्हणाला, मी सार्वकालिक प्रेमवृत्तीने तुझ्यावर प्रेम करीत आलो म्हणून मी तुला वात्सल्याने जवळ केले आहे. (यिर्मया ३१:३)***

# 26. देवाचे राज्य



देवाचे राज्य केव्हा येईल असे परूश्यांनी विचारले असता त्याने त्यांना उत्तर दिले, देवाचे राज्य दृश्य स्वरूपात येत नाही; पाहा, ते येथे आहे! किंवा तेथे आहे! असे म्हणणार नाहीत, कारण पाहा, देवाचे राज्य तुमच्यामध्ये आहे. – येशू (लूक १७:२०-२१)

या जगातील राज्ये आणि संस्था सर्व दृश्यमान आहेत. त्यांच्याकडे दृश्यमान मुख्यालय आणि सरकारी नेत्यांसाठी दृश्य कार्यालय किंवा जागा आहेत. जर आपण देवाच्या राज्यासाठी असे काही स्पष्टपणे शोधात असाल तर आपल्याला ते सापडणार नाही. परंतु देवाचे राज्य केवळ आपल्या अंतःकरणात स्पष्टपणे दिसून येते. हे राज्य तेव्हा दिसून येते जेव्हा आपण देवावर परम प्रेम करतो आणि जसे आपण स्वतःवर प्रेम करतो त्याच प्रकारे एकमेकांवर देखील प्रेम करतो.

तो {येशू म्हणाला, आपण देवाचे राज्य कशासारखे आहे असे म्हणावे? किंवा आपण कोणाशी त्याची तुलना करावी? – (मार्क ४:३०)

जे लोक फक्त या जगाशी परिचित आहेत त्यांना देवाच्या राज्याविषयी अचूक चित्र देणारे मानवी भाषेतील शब्द सापडणे किती कठीण आहे!

येशू त्याला म्हणाला, मी तुम्हांला खचीत सांगतो, नव्याने जन्मल्यावाचून कोणालाही देवाचे राज्य पाहता येत नाही. (योहान ३:३)

आध्यात्मिक गोष्टी समजण्याजोगे बनविणे हे पवित्र आत्म्याचे कार्य आहे. जेव्हा आपण पवित्र आत्म्याच्या सौम्य प्रभावाचे स्वागत करतो, तेव्हा अध्यात्मिक वास्तवात लक्ष केंद्रित केले जाते ज्यामुळे देवाचे राज्य पाहणे किंवा समजणे शक्य होते. या नव्या वास्तवाच्या पूर्वस्थितीत होणारा बदल "पुन्हा जन्मण्यासारखा" समेट करणारा आणि जीवन देणारा आहे.

पवित्र आत्मा हा धर्माच्या मर्यादेत काम करण्यापुरता मर्यादित नाही, जसे आपण कधी कधी कल्पना करतो. पार्श्वभूमी, ग्रहावरील स्थान किंवा विचारसरणीची पर्वा न करता तो प्रत्येकाशी बोलतो. नास्तिक देखील त्यांच्या हृदयावरील पवित्र आत्म्याच्या कार्यापासून वंचित नाहीत. आपला देव दूरदर्शी पक्षपाती नाही आणि जर एखादी व्यक्ती त्याच्या अस्तित्वावर विश्वास ठेवत नाही तेव्हा तो नाराजहि होत नाही.

देवाचा पवित्र आत्मा केवळ देवाच्या ज्ञानात आपली वाढ होण्यास मदत करत नाही तर तो आपली अंतःकरणे बदलतो. उदाहरणार्थ, त्या स्वार्थी नीतिमान, आणि कठोर मनाच्या धार्मिक लोकांपेक्षा एक दयाळू आणि उदार नास्तिक पवित्र आत्म्याच्या प्रभावास अधिक प्रतिसाद देतो आणि तो देवाच्या राज्याच्या खूप जवळ असतो. देवासाठी काय जास्त कठीण असेल? देवाच्या अस्तित्वाबद्दल एखाद्याचे मत बदलणे किंवा एखाद्या हट्टी, कठोर हृदयाला बदलणे?

मग त्याने बालकांना स्पर्श करावा म्हणून लोकांनी त्यांना त्याच्याकडे आणले, परंतु शिष्यांनी आणणाऱ्यांना दटावले. ते पाहून येशूला फार वाईट वाटले; आणि तो त्यांना म्हणाला, बालकांना माझ्याजवळ येऊ द्या; त्यांना मनाई करू नका, कारण देवाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे. मी तुम्हांला खचीत सांगतो, जो कोणी बालकासारखा होऊन देवाच्या राज्याचा स्वीकार करणार नाही त्याचा प्रवेश त्यात मुळीच होणार नाही. (मार्क १०:१३-१५)

जेव्हा देव आणि त्याच्या राज्याविषयी सत्य शिकण्याची वेळ येते, तेव्हा सर्वात कठीण भाग म्हणजे शिकणे नसते तर चुकीचे शिकलेले विसरणे असते. आपल्यापैकी अनेकांनी आपल्या मनात आणि कुटुंबात देवाचे चित्र निर्माण करण्यासाठी मोठी गुंतवणूक केली आहे. तथापि, आपण देवाचे जे चित्र तयार केले आहे ते चुकीचे असेल तर ते सोडणे कठीण आहे. देवाच्या चारित्र्याचे चुकीचे चित्र इतके दिवस लोकप्रिय धर्मात अंतर्भूत असल्याने, देव आणि त्याच्या राज्याविषयीचे सत्य समजून घेण्यास ते सर्वात मोठे अडथळे म्हणून उभा आहे. लहान मुलांना देवाच्या चरित्राच्या चुकीच्या चित्राबद्दल फार कमी माहिती आहे, म्हणून त्यांना आपल्या देवाच्या सौम्य स्वभावाबद्दलचे सत्य स्वीकारणे सोपे आहे.

त्या वेळेस शिष्य येशूकडे येऊन म्हणाले, "स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा कोण?" तेव्हा येशूने एका बालकाला बोलावून त्याला त्यांच्यामध्ये उभे केले आणि म्हटले, मी तुम्हांला खचीत सांगतो, तुमचा पालट होऊन तुम्ही बालकांसारखे झाल्याशिवाय स्वर्गाच्या राज्यात तुमचा प्रवेश होणारच नाही. ह्यास्तव जो कोणी स्वतःला ह्या बालकासारखे नम्र करतो तो स्वर्गाच्या राज्यात सर्वांत मोठा होय; (मत्तय १८:१-४)

स्वर्गातील राज्य हे या जगाच्या राज्या सारखे नाहीत तर उलट ते या जगातील राज्याच्या विरुद्ध आहेत. अहंकार, हेरफेर, जबरदस्ती किंवा अभिमानासाठी तेथे कोणतीही जागा नाही. आम्हाला आमच्या स्वर्गीय पित्यावर लहान मुलांप्रमाणे विश्वास ठेवणे आणि त्याच्यापासून शिकण्याची खूप इच्छा असणे आवश्यक आहे.

स्वर्गाचे राज्य शेतात लपवलेल्या ठेवीसारखे आहे; ती कोणाएका मनुष्याला सापडली आणि त्याने ती लपवून ठेवली. मग आनंदाच्या भरात तो जातो, आपले सर्वस्व विकतो आणि ते शेत विकत घेतो. आणखी, स्वर्गाचे राज्य चांगल्या मोत्यांचा शोध करणाऱ्या कोणाएका व्यापाऱ्यासारखे आहे; त्याला एक अति मोलवान मोती आढळला; मग त्याने जाऊन आपले सर्वस्व विकले आणि तो विकत घेतला. (मत्तय. १३:४४-४५)

जेव्हा आपण देवाविषयीचे सत्य समजून घेतो की त्याच्याकडे अमर्याद, इतर-केंद्रित प्रेम आहे आणि तो पूर्णपणे विश्वासू, दयाळू आणि उदार हृदयाचा आहे ङ्ग तेव्हा त्याचे साम्राज्य कसे आहे याविषयी आपल्याला स्पष्ट माहिती मिळेल. आपण देवाचे आपल्या मनातील चुकीचे चरित्र निरर्थक म्हणून पाहू आणि देवाचे व त्याच्या राज्याचे खरे चरित्र विकत घेण्यासाठी ते चुकीचे चरित्र आनंदाने वीकू.

तेव्हा शास्त्र्यांपैकी एक जण त्यांचा वाद ऐकून आणि त्याने त्यांना समर्पक उत्तर दिले हे पाहून पुढे आला आणि त्याने त्याला विचारले, सर्वांत पहिली आज्ञा कोणती? येशूने उत्तर दिले, सर्वांत पहिली ही की, हे इस्राएला, ऐक; आपला देव परमेश्वर हा अनन्य परमेश्वर आहे; आणि तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपूर्ण मनाने, संपूर्ण जिवाने, संपूर्ण बुद्धीने व संपूर्ण शक्तीने प्रीती कर. दुसरी ही की, जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती कर. ह्यांपेक्षा मोठी अशी दुसरी कोणतीही आज्ञा नाही. तो शास्त्री त्याला म्हणाला, गुरूजी, आपण ठीक व खरे बोललात की, देव एकच आहे आणि त्याच्याशिवाय दुसरा कोणी नाही; आणि संपूर्ण मनाने, संपूर्ण बुद्धीने, संपूर्ण जिवाने व संपूर्ण शक्तीने त्याच्यावर प्रीती करणे आणि जशी स्वतःवर तशी आपल्या शेजाऱ्यावर प्रीती करणे हे सर्व होमार्पण व यज्ञ ह्यांपेक्षा अधिक आहे. त्याचे हे सुज्ञपणाचे उत्तर ऐकून येशू त्याला म्हणाला, तू देवाच्या राज्यापासून दूर नाहीस. तेव्हापासून त्याला आणखी काही विचारण्याचे कोणालाही धैर्य झाले नाही. (मार्क १२:२८-३४)

ज्या शास्त्रीने त्याच्या प्रश्नाचे उत्तर दिले त्याला येशूने प्रोत्साहन दियुन म्हणाला: तू देवाच्या राज्यापासून दूर नाहीस. त्या शास्त्रीने इतरांपेक्षा सर्वाधिक अध्यात्मिक वास्तवाची सखोल समज दर्शविली. तो शास्त्रवचनाच्या उथळ वाचनाच्या पलीकडे गेला आणि येशूने जी प्रीती पहिली त्या प्रेमाची त्याला खात्री मिळाली.

जेव्हा प्रीतीचा नियम हा एकच नियम असेल तेव्हा नवीन पृथ्वी कशी असेल? देवाचे इतर-केंद्रित प्रेम सर्व मानवतेमध्ये प्रतिबिंबित होईल. प्रत्येक व्यक्ती इतरांना 'स्वत:पेक्षा चांगले' म्हणून प्रेम करेल आणि त्यांचे मूल्य करेल. (फिलिप्पै २:३) आपण कल्पना करू शकत नाही त्या पलीकडे आनंदाची आणि सुरक्षिततेची स्थिती असेल.

**हे तर ह्या शास्त्रलेखाप्रमाणे आहे, डोळ्यानहले नाही, कानाने जे ऐकले ने नाही व माणसाच्या ङ्कमनात जे अले नाही, ते आपणावर प्रीत करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केल आहे**; (**१ करिंथ** २:९)

## 27. देव आम्हाला खरे स्वातंत्र्य देऊ पाहतो



आणि देव म्हणाला, मग देव बोलला, आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, ग्रामपशू, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी ह्यांवर ते सत्ता चालवतील.' (उत्पत्ती १:२६)

देवाने मानवांना दिलेली पृथ्वीवरील सत्ता गैरवर्तन किंवा शोषण करण्यास परवानगी देत नव्हती. आदम आणि हव्वा आणि त्यांचे वंशज पृथ्वी आणि पृथ्वीवर असणाऱ्या सर्व जीवांची काळजी घेणारे असे हवे होते. पवित्र शास्त्रात असे लिहिले आहे, पृथ्वी त्याने मनुष्यांच्या मुलांसाठी दिली आहे. (स्तोत्र ११५:१६).

जेव्हा आपल्या पहिल्या पालकांनी देवाविरुद्ध सैतानाच्या खोट्या गोष्टींवर विश्वास ठेवला, तेव्हा सैतानाने त्याच्या फसवेगिरीने त्यांच्यावर विजय मिळविला आणि त्यांची मने सैतानाची गुलाम बनली. "कारण मनुष्य ज्याच्या कह्यात जातो त्याचा तो दासही (गुलाम) बनतो" (२ पेत्र २:१९). एकेकाळी जेथे आदम आणि हव्वा यांना स्वातंत्र्य होते आता ते आणि त्यांची मुले सैतानाची गुलाम बनली आहेत. मानव पापात पडल्यानंतर, सैतान आणि त्याच्यामागे येणाऱ्या देवदूतांप्रमाणे मानवजात असहाय्यपणे नाश पावेल असे आदम आणि हव्वाला वाटत होते.

तरीही एक चांगली बातमी आहे; देवाने त्यांच्यासाठी आणि त्यांच्या वंशजांसाठी गुलामीतून मुक्त होण्याचा मार्ग दिला आहे. या आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी देव हे शब्द सैतानाला म्हणाला: आणि तू व स्त्री, तुझी संतती व तिची संतती ह्यांच्यामध्ये मी परस्पर वैर स्थापीन; (उत्पत्ती ३:१५). हे वैर काय आहे?

जेव्हा सैतान आणि त्याच्या अनुयायांनी स्वर्गात देवाविरूद्ध बंड केले, त्यांनी ते पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा यांच्यासमवेत असलेल्या दीर्घ काळाच्या नातेसंबंधातून केले. त्यांच्याकडे देवाचे प्रेम जाणून घेण्यासाठी पुष्कळ वेळ होता आणि त्याच्या चांगुलपणावर शंका करण्याचे कारण नव्हते. जेव्हा त्यांनी स्वतःला देवापासून दूर केले, त्यांनी पवित्र आत्म्यास उत्तर देण्यास असमर्थता दर्शविली. त्यांच्या आडमुठपणामुळे त्यांनी पश्चाताप करू नये, अंधारात राहावे आणि आपल्या निर्मात्या कडे पुन्हा वळू नये अश्या अवस्थेत स्वतःला मोडले.

जेव्हा आदाम आणि हव्वेने पाप केले, तेव्हा त्यांचे देवाबद्दलचे ज्ञान आणि त्याच्या चरित्राविषयीचा अनुभव मर्यादित होता. ते सैतानाकरवी फसविले गेले होते; त्यांनी त्यांच्या निर्मात्यास नकारण्याचा निर्णय विचारपूर्वक किंवा मोजमापून केला नव्हता. मानवजात देवापासून दूर गेली. पण देवाकडे एक उपाय होता. देवाचे वचन की तो सैतान आणि स्त्री यांच्यामध्ये वैर ठेवेल. देवाच्या तारणाच्या योजनेच्या तरतुदीची ही पहिली घोषणा होती.

यामध्ये देवाने दयाळूपणे आपलेया पहिल्या पालकांना आणि आपल्याला आशा व्यक्त केली की आमची अंतःकरणे आणि मन अजूनही पवित्र आत्म्याला प्रतिसाद देण्यास सक्षम आहे. मानवजातीवर सैतानाचे बंधन कायमचे राहणार नाही याचा तो पुरावा होता. याचा अर्थ देव सैतानाला देवाशी समेट करण्याचे निवडण्याच्या आपल्या स्वातंत्र्यात अडथळा आणू देणार नाही.

सृष्टी ही स्वतः नश्वरतेच्या दास्यातून मुक्त होऊन तिला देवाच्या मुलांची गौरवयुक्त मुक्तता मिळावी ह्या आशेने वाट पाहते. (रोम.८:२१)

ह्या स्वातंत्र्याकरता ख्रिस्ताने आपल्याला मुक्त केले आहे म्हणून त्यात टिकून राहा, गुलामगिरीच्या जुवाखाली पुन्हा सापडू नका. (गलती ५:१)

म्हणून जर पुत्र तुम्हांला बंधमुक्त करील तर तुम्ही खरेखुरे बंधमुक्त व्हाल. (योहान ८:३६)

त्यांची म्हणजे विश्वास न ठेवणाऱ्या लोकांची मने ह्या युगाच्या दैवताने आंधळी केली आहेत, अशा हेतूने की, देवाची प्रतिमा जो ख्रिस्त त्याच्या गौरवी सुवार्तेचा प्रकाश त्यांच्यावर प्रकाशू नये. कारण आम्ही आपली घोषणा करत नाही; तर ख्रिस्त येशू हा प्रभू आहे अशी आणि येशूप्रीत्यर्थ आम्ही तुमचे दास आहोत अशी स्वतःची घोषणा करतो. कारण अंधारातून उजेड प्रकाशित होईल, असे जो देव बोलला तो येशू ख्रिस्ताच्या मुखावरील देवाच्या गौरवाच्या ज्ञानाचा प्रकाश पाडण्यासाठी आमच्या अंतःकरणात प्रकाशला आहे. (२ करिंथ ४:४-६)

सैतानाने ख्रिस्ताच्या सुवार्तेला आच्छादित केलेल्या नियमबद्दलेचे आणि चुकीचे चरित्र याचे आवरण काढून टाकण्याची आणि आपल्या सौम्य देवाच्या प्रचलित गैरसमजात सहभागी न होण्याचे ही वेळ नाही का?

सैतानाने ख्रिस्ताच्या सुवार्तेला कायदेशीरपणाचे गडद आवरण घातले आहे. त्याने देवाला स्वतःसारखेच अंधकारमय आणि दुष्ट असे चित्रित केले आहे. आपल्या सौम्य स्वर्गीय पित्याविरुद्ध सैतानाच्या सर्व खोट्या गोष्टी फेकून देण्याची वेळ आली नाही का?

***ज्या यहूद्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला त्यांना येशू म्हणाला, तुम्ही माझ्या वचनात राहिलात तर खरोखर माझे शिष्य आहात; तुम्हांला सत्य समजेल व सत्य तुम्हांला बंधमुक्त करील. -येशू (योहान ८:३१-३२)***

**आपल्या सभ्य देवाबद्दलची चांगली बातमी हेच सत्य आहे!**

***परमेश्वर म्हणतो, ज्ञान्याने आपल्या ज्ञानाचा अभिमान बाळगू नये; बलवानाने आपल्या बळाचा व श्रीमंताने आपल्या श्रीमंतीचा अभिमान बाळगू नये; बाळगायचा असला तर, मी दया करणारा व पृथ्वीवर प्रेमदया, न्याय आणि नीतिमत्ता चालवणारा परमेश्वर आहे, ह्याची त्याला जाणीव आहे, ओळख आहे, ह्याविषयी बाळगावा; ह्यात मला संतोष आहे, असे परमेश्वर म्हणतो. (यिर्मया ९:२३-२४)***



"आपल्या सौम्य पित्याचे कार्य"  हे पुस्तक देवाला बेफिकीर, अनियंत्रित, अन्यायी, वाईट स्वभावाचा किंवा हिंसक असल्याच्या आरोपांपासून मुक्त करण्यासाठी बायबलमधून ठळक पुरावे सादर करते. हे पुस्तक आम्हाला दाखवते की जर संपूर्ण बायबलचा चांगल्या प्रकारे अभ्यास केला गेला तर दिसून येते की देव प्रेम आहे  (1  योहान  4:8) आणि तो कधीही बदलत नाही."



जय ए. शुलबर्ग, ह्या पुस्तकाचे लेखक 50 वर्षांहून अधिक काळ आपल्या कोमल देवाला जाणून घेण्याच्या प्रवासात आहेत. ते व त्यांची पत्नि ज्युली हे सोबत उत्तर मिनेसोटा, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका येथील वॉल्डन-प्रेरित केबिनमध्ये राहतात. जयला प्राण्यांच्या आजूबाजूला राहायला आवडते आणि ते त्यांना आपला मित्र समजतात.